बुधवार, ३१ मे २०२३
⊙ किंमत ५ रुपये | छत्रपती संभाजीनगर (महाराष्ट्र)
⊙ मराठी ⊙ दैनिक
⊙ वर्ष - ०२ ⊙ अंक -२६१
⊙ आरएनआय : एमएएचएमएआर/२०२१/८२५६६

# आधुनिक केसरी

विश्वव्यापी मराठी दैनिक

● MARATHI ● DAINIK ● CHHATRAPATI SAMBHAJINAGAR (MAHARASHTRA) ● WEDNESDAY 31 MAY 2023 | adhunikkesari.com | Adhunik Kesari | ● YEAR-02 ● ISSUE-261 ● RNI : MAHMAR/2021/82566 ● PAGE-12 ● PRICE-5

# आता एका रुपयात पीक विमा

## पीएम किसानच्या धर्तीवर राज्यात नमो शेतकरी योजना



आधुनिक केसरी न्यूज

**मुंबई : उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी आजपासून राज्यात नमो शेतकरी महा सन्मान निधी योजना लागू करण्यात येणार असल्याची घोषणा केली. यंदाच्या बजेटमध्ये या योजनेची घोषणा करण्यात आली होती, आजच्या मंत्रिमंडळाच्या बैठकीत त्याला मंजुरी देण्यात आली आहे. या योजनेअंतर्गत वर्षाला शेतकऱ्यांच्या खात्यावर केंद्राच्या सहा हजार रुपयांसह राज्य सरकारचे सहा हजार रुपये जमा होतील. म्हणजे वर्षाला शेतकऱ्याच्या खात्यावर 12 हजार रुपये जमा होतील. तसेच राज्यातील शेतकऱ्यांना आता केवळ एक रुपयात पीक विमा मिळणार आहे.**

उपमुख्यमंत्री आणि राज्याचे अर्थमंत्री देवेंद्र फडणवीसांनी यंदाच्या बजेटमध्ये ही योजना जाहीर केली होती. या योजनेचा फायदा राज्यातील एक कोटी नागरिकांना होणार आहे. केंद्र सरकारच्या पंतप्रधान शेतकरी सन्मान योजना या धर्तीवर ही योजना लागू करण्यात येणार आहे. तसेच राज्यातील शेतकऱ्यांना आता एका रुपयात पीक विमा मिळणार असून त्यासाठी शेतकऱ्यांना एक रुपयात रजिस्ट्रेशन करावे लागणार आहे. या आधी राज्यातील सहा जिल्ह्यांसाठी पंजाबराव देशमुख मिशन लागू होते, आता ते संपूर्ण राज्यासाठी लागू करण्यात आलं आहे. या योजनेचा फायदा राज्यातील 13 लाख शेतकऱ्यांना होणार आहे. यासाठी 1900 कोटी रुपये राखीव ठेवण्यात आल्याची माहिती आहे.

- नमो शेतकरी महा सन्मान निधी ही केंद्राच्या पंतप्रधान शेतकरी सन्मान योजनेसारखीच योजना आहे.
- या योजनेनुसार पात्र शेतकऱ्यांच्या खात्यावर महाराष्ट्र सरकार वर्षाला सहा हजार रुपये जमा करेल.
- केंद्र सरकारकडून दर तीन महिन्याला दोन हजार रुपये शेतकऱ्यांच्या खात्यावर जमा होतात.
- याप्रमाणेच आता राज्य सरकारही दर तीन महिन्याला शेतकऱ्यांच्या खात्यावर दोन हजार रुपये जमा करेल.
- यानुसार शेतकऱ्यांच्या खात्यावर वर्षाला केंद्राचे सहा हजार आणि महाराष्ट्र सरकारचे सहा हजार रुपये असे एकूण 12 हजार रुपये जमा होतील.

नैसर्गिक शेतीला प्रोत्साहन देण्याचा निर्णय सरकारनं घेतला आहे. तीन वर्षांत 25 लाख हेक्टर क्षेत्र सेंद्रीय शेतीखाली येणार आहे. 1000 जैवनिविष्ठा स्त्रोत केंद्र स्थापन करणार आहे. डॉ. पंजाबराव देशमुख जैविक शेती मिशनची व्याप्ती वाढवण्यात येणार आहे. 3 वर्षांत 1000 कोटी रुपयांचा निधी खर्च करण्यात येणार असल्याची माहिती देवेंद्र फडणवीसांनी दिली आहे.

# कुस्तीपटूंची पदके गंगेत सोडण्याची घोषणा

आधुनिक केसरी न्यूज



**दिल्ली :** कुस्ती महासंघाचे अध्यक्ष आणि भाजपा खासदार बृजभूषण शरण सिंह यांच्या विरोधात धरणे आंदोलन करणाऱ्या कुस्तीगीरांनी आता त्यांची पदके गंगेत सोडण्याची घोषणा केली आहे. बजरंग पुनिया, विनेश फोगाट आणि साक्षी मलिक या तिघांनीही सोशल मीडियावर एकसारखेच ट्वीट करत आपली या विषयीची भूमिका मांडली आहे. आम्हाला मिळालेली पदके आम्ही गंगेत विसर्जित करत आहोत. कारण ती गंगामाई आहे. आम्ही जेवढे पवित्र गंगामाईला मानतो तेवढीच मेहनत आम्ही हे पदके मिळवण्यासाठी केली होती. असेही कुस्तीगीरांनी म्हटले आहे. आम्हाला आमची पदके प्राणांहून जास्त प्रिय आहेत पण ती आता गंगेत विसर्जित करण्याशिवाय आमच्याकडे पर्याय उरलेला नाही असेही या कुस्तीगीरांनी म्हटले आहे. २८ मे रोजी आमच्या आंदोलनाबाबत पोलीस जे वागले ते सगळ्यांनी पाहिले आहे. आम्हाला अत्यंत क्रूरपणे अटक करण्यात आली, आमचे आंदोलन चिरडण्याचा प्रयत्न झाला. आम्ही शांततेच्या मार्गाने आंदोलन करत होतो. मात्र आमचे आंदोलन उधळण्यात आले. पोलिसांनी आम्ही जिथे आंदोलन करत होतो ती जागाही आमच्याकडून हिरावून घेतली. पुढचे दोन दिवस आमच्याविरोधात गंभीर स्वरुपाचे FIR दाखल करण्यात आले. महिला कुस्तीगीरांच्या लैंगिक शोषणाला आम्ही वाचा फोडली. जो दोषी आहे त्या विरोधात कारवाईची मागणी केली. आम्हाला न्याय मिळावा अशी मागणी करतो आहोत. मात्र पोलीस आम्हाला अपराध्यांसारखे वागवत आहेत. तर ज्याने लैंगिक शोषण केले तो व्यक्ती उजळ माथ्याने समाजात वावरतोय. आमच्यावर टीका करतो आहे.

टीव्हीवर महिला कुस्तीगीरांविषयी अशी वक्तव्य करतो आहे ज्यामुळे त्यांना त्याची लाज वाटेल. आज घडीला एक महिला कुस्तीगीर मनातून काय विचार करते आहे हे कुणाला कळले आहे का? या महिला कुस्तीगीराला वाटते की देशात आमचे कुणीही राहिलेले नाही. आता आम्हाला ते क्षण आठवत आहेत जेव्हा या देशासाठी आम्ही पदके जिंकली होती, असे या महिला पैलवानांनी म्हटले आहे.



# बैलगाडा शर्यतीमुळे सर्जा-राजाला सोन्याचा भाव

## बैलगाडा तयार करणाऱ्या व्यवसायाला उभारी

आधुनिक केसरी न्यूज

**बंडू खडांगळे**

**दिंडोरी :** बैलगाडा शर्यतीवरील बंदी आता उठविल्याने ग्रामीण भागातुन पंढरपुरी खिल्लार जातीच्या बैलांना मोठी मागणी वाढली असून तोंडच किंमत मोजावी लागत आहे. तसेच बैलगाडा तयार करणाऱ्या व्यावसायिक बांधवांना आता उभारीचे दिवस आल्याने आनंदाचे वातावरण तयार झाले आहे. ग्रामीण व शहरी भागातील चर्चेचा विषय असणारी बैलगाडा शर्यत अनेक वर्षांपासून बंदी च्या आदेशामुळे नाराजी व्यक्त केली जात होती. परंतु आता न्यायालयाने बैलगाडा शर्यतीवरील बंदी उठवल्याने बैलगाडा मालक, शौकीन, यांच्या मध्ये एकप्रकारे एक नवा हूरुप, नवचैतन्य निर्माण झाले आहे. कारण ग्रामीण भागातील अनेक ठिकाणी विविध दैवते, ग्रामदैवत, यांच्या धार्मिकतेची आठवण म्हणून जत्रा, यात्रा होत असतात. व धार्मिकतेचा आनंद म्हणून यात्रेमध्ये बैलगाडा शर्यत, अनेक नामवंत पैलवानांचा कुस्तीचा आखाडा निर्माण करून गावदेणगीतुन विजेत्या स्पर्धेकांस योग्य ती बक्षिसे देण्यात येत असते. त्यामुळे यात्रा म्हटली की ग्रामीण भागातील आनंदाचे प्रतिक मानले जात असते. परंतु मध्यांतरीच्या अनेक वर्षांपासून बैलगाडा शर्यत शासकीय व न्यायालयांच्या आदेशानुसार बंद केल्या होत्या. त्यामुळे ग्रामीण व शहरीभागातील यात्रेला एकप्रकारे ग्रहणच लागले होते. परंतु आता बैलगाडा शर्यत सुरू झाल्याने सर्वत्र बैलगाडा शौकीनांमध्ये नवचैतन्य निर्माण झाल्याने आपले नाव या शर्यतीत कसे मोठे होईल. यासाठी चांगल्या गतीचे पळणारे बैल खरेदीसाठी अनेकांनी मोठी गर्दी करण्यास सुरुवात केली आहे.

**खिल्लार बैलांना वाढली मागणी :** बैलगाडा शर्यतीत खिल्लार बैलांना मोठी मागणी असते. कारण खिल्लारी बैल म्हणजे एकप्रकारे बैलांचा राजा मानला जातो. पांढराधमक रंग, ऐटबाज शिंगे, काटक उंची, पाणीदार तीक्ष्ण डोळे, ताकदवान शरीर अशा खिल्लार बैलांना बैलगाडा मालकांची मोठी मागणी असते. साधारणपणे पाच हजारांपासून ते पाच लाखांपर्यंत सध्या या बैलांच्या किंमती बैलबाजारपेठेमध्ये पाहायला मिळत आहे. त्यामुळे शर्यतीमध्ये नाव कमविण्यासाठी बैलगाडा मालक, शौकीन ते खरेदी करण्यासाठी पसंती दाखवितात. त्यामुळे आता अनेक बैलगाडा मालक महाराष्ट्रांतील सोलापूर, पंढरपूर, पुसेगाव, आटपाडी, औंध, अकलूज याभागांतील बैल बाजारांना भेटी देऊन खिल्लारी बैल खरेदी वर मोठ्या प्रमाणावर पसंती देत आहे.




**बैलगाडा तयार करणाऱ्या व्यवसायांला उभारी :** सध्या बैलगाडा शर्यत सुरू झाल्याने लाकडी बैलगाडा, टांगे, इ. तयार करणाऱ्या व्यावसायिकांना यानिमित्ताने आता उभारीचे दिवस आले आहे. यामुळे अनेक कुटुंबांना यामधून रोजगार उपलब्ध होऊन आपली सुखांची रोजी रोटी आता मिळणार म्हणून आनंदाचे वातावरण ग्रामीण भागातील लाकडी काम करणाऱ्या व्यावसायिक बांधवांमध्ये दिसत आहे.


# ब्रह्मोसमुळे सरकारला चोवीस कोटींचा भुर्दंड

आधुनिक केसरी न्यूज

**नवी दिल्ली :** मार्च 2022 मध्ये एक ब्रह्मोस क्षेपणास्त्र मिसफायर झाले होते. मिसफायर झाल्यानंतर हे क्षेपणास्त्र 125 किलोमीटर अंतरावर जाऊन पाकिस्तानच्या पंजाब प्रांतात जाऊन कोसळले होते. या प्रकरणी केंद्र सरकारने हे क्षेपणास्त्र चुकून डागण्यात आले होते, तसेच यामुळे सरकारी तिजोरीला 24 कोटींचा भुर्दंड बसला असून शेजारील देशांसोबतचे संबंधही ताणले गेल्याची माहिती दिल्ली उच्च न्यायालयात दिली आहे. गेल्या वर्षी अपघाताने पाकिस्तानात डागल्या गेलेल्या ब्राह्मोस क्षेपणास्त्रामुळे सरकारी तिजोरीला 24 कोटींचा भुर्दंड बसला, तसेच शेजारी देशासोबतचे संबंधही ताणले गेले. दिल्ली उच्च न्यायालयात सुरु असलेल्या खटल्यात केंद्र सरकारने ही माहिती दिली आहे. त्या चुकीसाठी हवाईदलाच्या तीन अधिकाऱ्यांची सेवा समाप्त करण्याच्या कारवाईचे सरकारकडून समर्थन करण्यात आले आहे. केंद्र सरकारने न्यायालयात भारतीय हवाई दलाच्या तीन विंग कमांडरना बडतर्फ केल्याचे समर्थन केले आहे. दरम्यान, विंग कमांडर अभिनव शर्मा यांनी बडतर्फीविरोधात दिल्ली उच्च न्यायालयात धाव घेतली होती.









विश्वास देशपांडे
संपर्क क्र. 9403749932

आधुनिक केसरी

निसर्गाची सगळीच रूपे मला भावतात. पहाट, सकाळ, दुपार आणि दुपारच्या आधीची आणि नंतरची वेळा, संध्याकाळची विविध रूपे आणि नंतर येणारी रात्र. ऋतू कोणताही असो, त्यातील विविध प्रहरांची ही विविध रूपे मला सारखीच आकर्षित करतात. प्रत्येकच प्रहर काहीतरी नवीन घेऊन येतो. कोणीतरी एखादं छानसं गिफ्ट आकर्षक रूपात गुंडाळलेलं घेऊन यावं, ते उघडून पाहिल्याशिवाय त्यात काय आहे ही उत्सुकता जशी शमत नाही, तशाच या वेळा अनुभवल्याशिवाय त्या आपल्यासाठी काय घेऊन येतात हे नाही कळायचं. अशाच या निसर्गवेळा मला जशा भावल्या, तशा तुमच्यासमोर ठेवणार आहे. शब्दांचाच रूपाने त्यातील रूप, रस आणि गंध तुमच्यापर्यंत पोहोचवण्याचा हा अल्पसा प्रयत्न आहे. 'प्रभाती सूर नभी रंगती, दश दिशा भूपाळी म्हणती...' ही सुंदर भूपाळी आपल्यापैकी बहुतेकांच्या परिचयाची असेल. रमेश अणावकर यांचे सुंदर शब्द आशा भोसलेंनी अमर केले आहेत. या गीतात 'पानोपानी अमृत शिंपीत उषा हासरी हसते धुंदीत' असे शब्द आहेत. मला वाटतं ही प्रभात वेळा जशी पानोपानी अमृत शिंपीत येते, तसेच अमृत आशाताईंच्या स्वरातून जणू आपल्यावर शिंपडले जाते. मरगळलेल्या मनाला हे अमृतस्वर संजीवनी देऊन ताजेतवाने करतात. या भूपाळीमध्ये अप्रतिम असे निसर्गाचे वर्णन आले आहे. सकाळी आपण जशी परमेश्वराची पूजा करतो, तशीच पूजा निसर्गही पहाटेच्या रूपाने त्या परमात्म्याची बांधत असतो. त्याच्या पूजेसाठी विविध रंगांची, गंधांची फुले निसर्ग तयार ठेवतो. नदीचं, झऱ्याचं खळाळणारं संगीत असतं, वाऱ्याची बासरी आसमंतात लहरत असते, पक्ष्यांचं कूजन म्हणजे जणू मंत्रघोष ! अशी सगळी स्वागताला तयार असतात. त्यातच पूर्वेचं आकाश स्वागतासाठी गुलाबी वस्त्र परिधान करून तयार असतं. अशाच वेळी सूर्यदेव आपल्या रथावर आरूढ होऊन या निर्गुण निराकाराच्या आरतीला जणू प्रकाशाची निरांजन घेऊन हजर होतात. पाहता पाहता या निरांजनाच्या ज्योती अधिकाधिक प्रकाशमान होऊन अवघे विश्व उजळून टाकतात. पूर्वेचा गुलाबी रंग आता सोनेरी रंगात बदलतो. रात्रभर प्रकाशाच्या प्रतीक्षेत असलेली झाडं, वृक्षवेली आपले हात पसरून या प्रकाशाचं स्वागत करतात. अशा वेळी भा रा तांब्यांच्या कवितेतील ओळी सहजच ओठांवर येतात. 'पिवळे तांबूस ऊन कोवळे पसरे चौफेर...' या कवितेतलं वर्णन कवीनं जरी सायंकाळचं केलेलं असलं तरी सकाळच्या वेळेलाही ते चपखल लागू पडतच.



## आनंदी पहाट

## नकारात्मक विचार हे नैराश्याचे मूळ

आधुनिक केसरी

प्रमाणापेक्षा जास्त विचार करण्याच्या नियमित पद्धतींमुळे चिंता, चिडचिड, पॅनीक अटॅक तसेच कमी भूक, झोपेची अनियमित पद्धत, उच्च रक्तदाब आणि बरेच काही होऊ शकते. जेव्हा स्वतःला समजूतदार ठेवायचे असते तेव्हा भावना महत्त्वपूर्ण भूमिका बजावतात. काळजी करणे आणि जास्त विचार करणे थांबवण्यासाठी मेंदूला फसवण्यावर लक्ष केंद्रित केले पाहिजे. नाहूत विचार हे नैराश्य, पोस्ट-ट्रॉमॅटिक स्ट्रेस डिसऑर्डर, ऑब्सेसिव्ह कंपल्सिव्ह डिसऑर्डर, बायपोलर डिसऑर्डर, अमली पदार्थांचा वापर डिसऑर्डर आणि अगदी बर्नआउट किंवा तीव्र ताण यासह इतर मानसिक आजारांचेही लक्षणे दिसून येऊ शकतात. मेंदूतील रसायने गोंधळ निर्माण करणे, विस्मरण होणे आणि लक्ष विचलित करणे तसेच मानसिक स्पष्टतेचा अभाव तयार होणे हे या द्वारे दर्शविले जाते. अनेकदा हे सर्व जास्त काम करणे, झोप न लागणे, तणाव आणि संगणकावर जास्त वेळ घालवणे यामुळे देखील होऊ शकते. नकारात्मक विचारांची भिन्नविभिन्न कारणे असतात. अनाहूत नकारात्मक विचार हे ऑब्सेसिव्ह-कंपल्सिव डिसऑर्डर, सामान्यीकृत चिंता विकार किंवा इतर मानसिक आरोग्य स्थितीचे लक्षण असू शकतात. नकारात्मक विचार हे देखील नैराश्याचे लक्षण आहे. अतिविचार हा स्वतःहून निर्माण केला जाणारा केवळ मानसिक विकार नाही. ते सहसा इतर मानसिक आरोग्य स्थितींशी संबंधित असते. नैराश्य, चिंता विकार, आजारपण चिंता विकार, ज्याला काहीवेळा हायपोकॉन्ड्रियासिस किंवा आरोग्य चिंता म्हणतात, आपण गंभीरपणे आजारी आहात किंवा होऊ शकता याची जास्त काळजी करत बसण्याने देखील नैराश्य आणि नकारात्मकता बळावते. त्याबाबतीत तुम्हाला कोणतीही शारीरिक लक्षणे नसतील, अतिविचार हा स्वतःचा मानसिक आजार नसला तरी देखील तो नैराश्य, चिंता, खाण्याचे विकार आणि पदार्थांच्या वापरातील विकार यासारख्या परिस्थितींशी संबंधित असू शकतो.



विद्यावाचस्पती विद्यानंद
संपर्क क्र. 7709612655



आधुनिक केसरी

**राम कृष्ण हरि | दिव्य मंत्र ||**
काय सांगु तुम्हा | महिमा नामाचा ||
उध्दार जन्माचा | कर्मासंगे ||१||
राम भजनाने | वाल्या मुक्त केला
ऋषीमुनी झाला | मारेकरी ||२||
नृसिंह अवतरे | प्रल्हादाच्या भेटी ||
शबरीच्या कुटी | देव आले ||३||
रामनाम घेता | तरले दगड ||
काय अवघड | नामा पुढे ? ||४||
घेऊनिया आन | सांगे तुका भारी ||
राम कृष्ण हरि | दिव्य मंत्र ||६||



प्रा.ज्ञानेश्वर कुलकर्णी (वतनी)
संपर्क क्र. ९४०३०२९१७८

## निरूपण

आधुनिक केसरी

सुहास्यवदनामम्बां
चारुनयनशोभिताम् |
तापत्रयविनाशाय दुर्गां देवीं नमाम्यहम् ||
१० ||
सुहास्यवदन, सुंदर नयनांनी सुशोभित
अशा अम्बेला, दुर्गा देवीला तीनही
तापांच्या शांतीसाठी मी नमन करतो.




डॉ. चन्द्रहासशास्त्री सोनपेठकर

## घराघरात स्वर्वेद, मनामनांत स्वर्वेद, जनमनांत स्वर्वेद !

पूर्ब कर्म इस देह का,
कारण यौगिक भोग ।
तीन भोग इह भोगता, केवल पूर्व न भोग
।।०८।।(स्वर्वेद द्वितीय मण्डल सप्तम अध्याय) ०२/०७/०८

**मूळ भाष्याचा मराठी अनुवाद :**
पूर्व कर्मांचा भोग, या देहाचे कर्म आणि संयोगिक भोग अशा तीन भोगांना आत्मा या शरीरात भोगतो. केवळ पूर्व कर्मांचा भोगच भोगत नाही.



स्वर्वेद रचनाकार
अनन्त श्री सद्गुरू सदाफल देवजी महाराज

संदर्भ : हा ग्रंथ तुम्हाला हवा असल्यास वॉट्सअॅप करा ८५५४८८३१६६.

## सुक्ष्म आशंकानिरूपण

आधुनिक केसरी

आपण तिसऱ्या समासातील 38 व्या ओवी पर्यन्त पोहचलो आहोत. यात समर्थांनी आपल्या सगळ्यांनाच अलिप्त रहायला सांगितले आहे कसे ते पहा. आभाळ गच्च भरून आले आहे, काळेकुट्ट ढग जमा झाले आहेत. आकाशात ढगांचीच एवढी दाटी झाली आहे की त्यामुळे सूर्यप्रकाश थांबला आहे. सगळीकडे काळोख दाटला आहे. कधी जलधारा कोसळेल अशी अवकाशात स्थिती झाली आहे. आता भरपूर पाऊस पडला. आकाशाने आपली पूर्वस्थिती धारण केली आहे. आकाश पूर्वस्थितीत आले आहे ,आकाश आता निरभ्र झाले आहे. सगळीकडे निळेशार आभाळ दिसत आहे मघाशी जी आकाशाची स्थिती होती ती आता बदलली आहे. एकदम शांत वातावरण निर्माण झाले आहे. मित्रांनो या ओवी वरून आपण काय शिकायचे ? मायेमुळे द्रुष्य विश्व आले आणि गेले तरी निर्गुण ब्रम्ह सगुण न होता जसेच्या तसेच राहिले आहे. आपल्याही आयुष्यात अशा प्रकारच्या घडामोडी घडल्या तरी त्यात गुंतून पडायचे नाही, अलिप्त रहायचे.जणू काही घडलेच नाही असे समजून जीवन जगायचे.




सौ. उज्ज्वला धर्माधिकारी
संपर्क क्र. 7588235646

## निश्चयपूर्वक नामस्मरण आणि चित्तशुद्धी

आधुनिक केसरी

मला अजून अमुक करायचे आहे ही कल्पना सोडून द्यावी. आता मी परमेश्वराचा झालो, आता मला काही करायचे राहिले नाही, अशी मनाची स्थिती झाली पाहिजे. 'हे परमेश्वरा, आता तुझ्याकरताच मी जगेन, तुझ्या नामस्मरणाशिवाय मला काही कर्तव्य उरले नाही.' असा निश्चय केला तर मनाला समाधान झालेच पाहिजे. 'नामस्मरण होत नाही, कारण वयामुळे मन थकले,' हे म्हणणे बरोबर नाही. शरीर थकेल, कारण लहानपणी वाढणे आणि वृद्धपणी थकत जाणे, हा शरीराचा निसर्गक्रमच आहे; परंतु मन थकले हे मात्र सयुक्तिक नाही. मन हा परमेश्वराचा अंश आहे, असे आपल्या दिव्य विभूती सांगताना भगवंतांनी सांगितले आहे. मनाची अत्यंत क्षीणतेची अवस्था म्हणजे मृत्युसमयीची; परंतु त्या समयीही माझे स्मरण ठेवावे असे भगवंतांनी सांगितले असताना, त्यापूर्वी केव्हाही, मन थकले आणि स्मरण करू शकत नाही असे होणे शक्य नाही. पूर्वी सहा-सहा तास बसून जप केलेला असेल, तितका आता होत नसेल, तितके बसवणार नाही. मध्ये-मध्ये झोप लागत असेल, हे मान्य आहे; पण स्मरण राहू शकत नाही असे नाही होणार. मन थकले ही खरी अडचण नसून मनाचा इतर व्याप फार आहे हे खरे कारण आहे. तेव्हा, सर्व व्यापांतून आणि काळजीतून लक्ष काढून ते भगवंताकडे लावणे जरूर आहे. पैसाअडका, प्रपंचातल्या सर्व गोष्टी, यांचा मनाने त्याग करावा. असा त्याग केला तर कार्यभाग निश्चित होतो हे मी खात्रीने सांगेन.



पैशाची वासना आणि लौकिकाची लालसा, माणसाला भगवंतापासून दूर नेतात; त्यांच्या तावडीत सापडता कामा नये. लोकेषणा आणि धनेच्छा या दोन्ही गोष्टींचा संबंध प्रपंचात वावरत असताना येणारच. तो टाळता येणे कठीण आहे. पण ज्याला भगवंताचे प्रेम पाहिजे आहे, त्याने त्यांचा गुणधर्म ओळखून त्यांना वापरावे, म्हणजे त्यांच्यापासून उत्पन्न होणारे दोष त्याला बाधणार नाहीत. धर्माचरण, भगवद्भक्ती, नामस्मरण आणि सत्संग हे चित्तशुद्धीचे उपाय होत. किंवा एकाच शब्दात असे म्हणता येईल की, सत्संग हाच याला तोडगा आहे. चित्तशुद्धीचे लक्षण हे की, आपल्यासारखेच सर्व जग सुखी असावे ही भावना असणे. ही भावना वाढण्यासाठी, 'सर्व जग सुखी असावे' अशी प्रार्थना करण्याचा नेहमी परिपाठ ठेवावा, म्हणजे हळूहळू भगवत्कृपेने साधेल. अभिमान हा मात्र चित्तशुद्धीत बिघाड करणारा आहे, आणि तो केव्हा डोके वर काढील आणि घात करील याचा पत्ता लागणार नाही. पण भगवंताच्या स्मरणामध्ये अभिमानाचे मरण आहे. म्हणून आपण भगवंताचे स्मरण अखंड टिकवूया आणि आनंदाने राहूया. **आजचे बोधवचन आहे -नामाशिवाय जगात दुसरे सत्य नाही अशी दृढ भावना करावी. श्रीराम समर्थ**

## तुकाराम गाथा

आधुनिक केसरी

देती घेती परज गेली । घर खालीं करूनियां ॥१॥
धांवणियाचे न पडे हातीं । खादली राती काळोखी ॥ध्रु.॥
वघियांचे अवघें नेलें । काहीं ठेविलें नाहीं मागें ॥२॥

## निवडक सुभाषिते

आधुनिक केसरी

**तक्षकस्य विषं दंशे मक्षिकायाच मस्तके ।**
**वृश्चिकस्य विषं पुच्छे सर्वांगे दुर्जनस्य तत् ॥**
**स्पष्टीकरण - या श्लोकाचा रोख दुर्जनांकडे आहे. कोणत्याही परिस्थितीत दुर्जनांपासून सावध राहावे असे यात सांगायचे आहे. दुर्जन हा शरीर, मन, वाणी, बुद्धी या सर्वांगांनी विषारी असतो.**

पं. महादेवशास्त्री जोशी, पुणे

आधुनिक केसरी
विश्वव्यापी मराठी दैनिक
बुधवार, ३१ मे २०२३
adhunikkesari.com Adhunik Kesari

# शिंदे-फडणवीसांमध्ये आलबेल आहे का ?

## नाना पटोले यांचा पत्रकारांना प्रतिप्रश्न

आधुनिक केसरी न्यूज



**मुंबई :** महाविकास आघाडीत बिघाडी झाल्याचे दावे शिवसेनेच्या शिंदे गटाकडून सातत्याने होत आहेत. त्याचबरोबर भाजपाकडूनही अशी टोलेबाजी अधून मधून होत आहे. कधी लोकसभेच्या जागांवरून, तर कधी वीर सावरकर मुद्यावरून आघाडीत बिनसल्याच्या बातम्या समोर येत असतात. आता पुणे लोकसभा पोटनिवडणुकीवरून राष्ट्रवादी काँग्रेस आणि काँग्रेसमध्ये सारंकाही आलबेल नसल्याच्या चर्चा आहेत. याबद्दल प्रसारमाध्यमांच्या प्रतिनिधींनी थेट काँग्रेस प्रदेशाध्यक्ष नाना पटोले यांना प्रश्न केला. त्यावर नाना पटोले यांनी पत्रकारांना प्रतिप्रश्न केला की, एकनाथ शिंदे आणि देवेंद्र फडणवीसांमध्ये सारंकाही आलबेल आहे का ?

नाना पटोले म्हणाले, मला तुम्हाला (प्रसारमाध्यमांचे प्रतिनिधी) एक प्रश्न विचारायचा आहे. महाविकास आघाडीतल्या नकारात्मक बातम्या आपल्याला जास्त दाखवल्या जातात. माध्यमांवर तेच जास्त पाहायला मिळते, अनेकदा त्याचेच जास्त दर्शन घडवले जाते. परंतु भाजपा आणि शिंदे गटात फार आलबेल आहे का ? नाना पटोले म्हणाले, खरंतर जेव्हा दोन किंवा तीन पक्ष एकत्र येतात तेव्हा अशा गोष्टी चालतात. परंतु आमची सगळ्यांनीच (महाविकास आघाडी) एक भूमिका घेतली आहे आणि आम्ही पुढे जाणार आहोत. कारण आम्हाला देश वाचवायचा आहे. देशाची सांविधानिक व्यवस्था वाचवायची आहे. काँग्रेसची भूमिका प्रामाणिक आहे. काँग्रेस सर्वात आधी देशाचा आणि संविधानाचा विचार करते. त्यानंतर सत्ता अशी आमची भूमिका आहे. काँग्रेस त्यासाठीच लढत राहिली आहे आणि यापुढेही लढत राहील. नाना पटोले म्हणाले, या अशा घडामोडी चालत राहणार. परंतु आम्ही तिन्ही पक्ष एकत्र निवडणुकांना सामोरे जाणार आहोत. एका वृत्तसमूहाने आगामी लोकसभा निवडणुकीबद्दल जे सर्वेक्षण केले आहे. त्यात जनतेने ४३ टक्के कौल महाविकास आघाडीच्या बाजूने दिला आहे. त्यातही काँग्रेस मोठा भाऊ आहे.

# जिजाभाऊ मिसाळ यांना धनगर समाजभूषण पुरस्कार

आधुनिक केसरी न्यूज

**पैठण :** अहिल्यादेवी होळकर जन्मोत्सव व धनगर माझा न्युज पोर्टल व साप्ताहिकाच्या ८ व्या वर्धापन दिनानिमित्त पुणे येथे आयोजित कार्यक्रमात, धनगर समाजासाठी उल्लेखनीय कार्य केल्याबद्दल, जिजाभाऊ बाळाजी मिसाळ ग्रामविकास अधिकारी पंचायत समिती पैठण रा. आपेगाव ता.पैठण यांना राज्यस्तरीय "समाजभूषण" पुरस्कार देऊन सन्मानित करण्यात आले. "समाजभूषण" पुरस्कार माजी मंत्री दत्ता मामा भरणे, माजी मंत्री प्रा.राम शिंदे , माजी खासदार विकास महात्मे , पट्टनकडोलीचे मुख्य भाकणुककार फरांदे महाराज, व ग गणेश महाराज वाघ, माजी आमदार पोपटराव गावडे, माजी आमदार प्रकाश अण्णा शेंडगे, पोलीस उप आयुक्त रुक्मिणी गलांडे , उज्वला हाके या प्रमुख मान्यवर हस्ते व धनगर माझा चे धनंजय ताणले विवेक बिडगर बाबुराव बनसोडे उपस्थितीत प्रदान करण्यात आला. जिजाभाऊ मिसाळ हे धनगर समाजासाठी नेहमीच तन-मन-धनाने सामाजिक कार्य करतात, याची दखल घेऊन हा समाजभुषण पुरस्कार देऊन गौरविण्यात आले. यापूर्वीही त्यांना ग्रामविकासामध्ये उत्कृष्ट कार्याबद्दल जिल्हास्तरीय आदर्श ग्रामसेवक पुरस्काराने गौरविण्यात आलेले आहे, जीजाभाऊ मिसाळ यांनी औरंगाबाद जिल्हा ग्रामसेवकांची सहकारी पतसंस्थाचे अध्यक्ष पद देखील भूषवलेले आहे.

जिजाभाऊ मिसाळ यांना समाज भूषण पुरस्कार मिळाल्याबद्दल पंचायत समिती पैठण चे गट विकास अधिकारी शिवाजी वने विस्तार अधिकारी दशरथ खराद, सुनील इंगळे, कक्ष अधिकारी अरविंद चव्हाण, ग्रामविकास अधिकारी ईश्वर सोमवंशी, कैलास नलावडे, वसंत इंगळे, भीमराव गाढे, कनिष्ठ प्रशासन अधिकारी किशोर निकम वरिष्ठ सहाय्यक जे जी एलपलवआड, एस आर इंगळे, कनिष्ठ सहाय्यक मथुरा बडे, शोभा शिंदे, वैशाली साळवे, स्थापत्य अभियांत्रिकी सहाय्यक अविनाश चपडे, बालानगर येथील मिठाईचे प्रसिद्ध व्यापारी संभाजी चव्हाण, सेवानिवृत्त कनिष्ठ प्रशासन अधिकारी बीबी हाके , जगदीश वीर, ज्ञानेश्वर वाघमारे आदींनी त्यांचे समाज भूषण पुरस्कार प्राप्त बद्दल अभिनंदन केले.

# निळू फुलेंची लेक गार्गी फुले राष्ट्रवादी काँग्रेसमध्ये



आधुनिक केसरी न्यूज

**मुंबई :** चित्रपटसृष्टीमध्ये ज्येष्ठ अभिनेते निळू फुले यांचे नाव आदराने घेतले जाते. १३ जुलै २००९ रोजी निळू फुले यांचे निधन झाले. त्यांच्या निधनानंतर १४ वर्षांचा काळ लोटला तरी निळू फुले यांच्या आठवणी कायम आहेत. निळू फुले यांची मुलगी गार्गी फुले यांनीही वडिलांच्या पावलावर पाऊल ठेवत कलाक्षेत्रामध्ये काम करण्याचे ठरवले आणि आता त्या मराठीमधील एक उत्तम अभिनेत्री आहे. मराठी मालिकांमध्ये उत्तम काम करत त्यांनी प्रेक्षकांची मनं जिंकली.

'तुला पाहते रे' या लोकप्रिय मालिकेत अभिनेत्री गायत्री दातारच्या आईची भूमिका गार्गी फुले यांनी साकारली. आता अभिनयाबरोबरच गार्गी यांनी राजकारणात यायचे ठरवले आहे. गार्गी फुले यांनी नुकताच राष्ट्रवादी काँग्रेसमध्ये प्रवेश केल्याचे वृत्त समोर आले आहे. प्रदेशाध्यक्ष जयंत पाटील आणि विरोधीपक्ष नेते अजित पवार यांच्या उपस्थितीमध्ये गार्गी फुले यांनी पक्षप्रवेश केला आहे. पक्षात प्रवेश केल्यावर गार्गी म्हणाल्या, "मला बऱ्याच दिवसांपासून अजित पवार यांच्यासह काम करायची इच्छा होती. या पक्षाचे विचार आणि माझ्या बाबांचे विचार फारच मिळते जुळते आहेत, त्यामुळे माझ्या वडिलांच्या विचारांना राष्ट्रवादी काँग्रेस न्याय देईल. इतकेच नव्हे तर मुख्य प्रवाहात येऊन काम करण्यासाठी त्या फार उत्सुक आहेत. गार्गी फुले यांनी स्त्रीमुक्ती या विषयात पदवीपर्यंतचे शिक्षण घेतले आहे. अभिनयाचे संस्कार तर त्यांच्यावर वडिलांनीच केले आहेत. सत्यदेव दुबे यांच्याकडून गार्गी यांनी अभिनयाचे रीतसर प्रशिक्षण घेतले. मराठी नाटक, मालिका, चित्रपट तसेच वेबसीरिजमध्येही त्यांनी काम केले आहे.




# भुजबळांनी आमदारकीचा राजीनामा द्यावा : आंबेडकर

आधुनिक केसरी न्यूज

**नाशिक :** दिल्लीतील महाराष्ट्र सदनात दोन दिवसांपूर्वी (२९ मे) पहिल्यांदाच स्वातंत्र्यवीर विनायक दामोदर सावरकर यांच्या जयंतीनिमित्त कार्यक्रम आयोजित करण्यात आला होता. या कार्यक्रमाला महाराष्ट्रातील अनेक खासदारांसह राज्याचे मुख्यमंत्री एकनाथ शिंदे आणि उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस हेसुद्धा उपस्थित होते. तसेंच केंद्रातल्या अनेक नेत्यांनी या कार्यक्रमाला हजेरी लावली होती. परंतु या कार्यक्रमावेळी महाराष्ट्र सदनातील क्रांतीज्योती सावित्रीबाई फुले आणि पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर यांचे पुतळे हटवले होते.

महाराष्ट्र सदनात घडलेल्या त्या घटनेमुळे देशभरातून राज्य सरकारवर टीकेची झोड उठली आहे. शिवसेनेचा ठाकरे गट, राष्ट्रवादी काँग्रेस आणि काँग्रेस नेत्यांनी यावरून सत्ताधाऱ्यांना धारेवर धरले आहे. परंतु वंचित बहुजन आघाडीचे अध्यक्ष प्रकाश आंबेडकर यांनी वेगळी भूमिका मांडली आहे. टीव्ही ९ मराठीला दिलेल्या मुलाखतीत आंबेडकर म्हणाले, एक लक्षात घ्या राष्ट्रपतीपदावर असलेल्या द्रौपदी मुर्मू यांना हे सरकार डावलते. त्या अजून जीवंत आहेत, त्यांना हे लोक डावलू शकतात. देशाच्या सर्वोच्च पदावर बसलेल्या व्यक्तीला हे लोक डावलू शकतात. तिथे आहिल्याबाई होळकर किंवा सावित्रीबाई फुले यांच्यासारखी हयात नसलेली माणसं या आरएसएस (राष्ट्रीय स्वयंसेवक संघ) आणि भाजपाच्या खिजगणतीतच नाहीत. त्यामुळे महाराष्ट्र सदनात घडलेला प्रकार काही नवीन नाही. या घटनेचा निषेध म्हणून छगन भुजबळ यांनी आपल्या आमदारकीचा राजीनामा दिला पाहिजे. कारण महाराष्ट्र सदनात जे घडले तो ओबीसींचा अपमान आहे.

# सचिन करणार मौखिक आजारांवर जनजागृती

आधुनिक केसरी न्यूज

**मुंबई :** प्रसिद्ध क्रिकेटपटू सचिन तेंडुलकरची राज्याच्या स्वच्छ मुख अभियानासाठी महाराष्ट्राचा 'स्माइल ॲम्बेसेडर' म्हणून नियुक्ती करण्यात आली आहे. मुख्यमंत्री एकनाथ शिंदे, उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस आणि इतरांच्या उपस्थितीत महाराष्ट्र सरकारकडून त्यांची स्माइल ॲम्बेसेडर म्हणून नियुक्ती करण्यासाठी आज सामंजस्य करार करण्यात येणार आहे. विशेष म्हणजे सचिन तेंडुलकरनं पुढच्या पाच वर्षांसाठी या अभियानात स्माइल ॲम्बेसेडरच्या स्वरूपात नियुक्त होण्यास सहमती दर्शवली आहे. स्वच्छ मुख अभियान दूरपर्यंत पसरेल आणि त्याला चांगला पाठिंबा मिळेल, असेही सचिन तेंडुलकरचे म्हणणे आहे. यासंदर्भात आज झालेल्या कार्यक्रमात बोलताना सचिन तेंडुलकरने गुटखा, तंबाखू अशा गोष्टींपासून लांब राहण्याचे आवाहन उपस्थितांना केले आहे. सचिन तेंडुलकरने अभियानाचे स्माइल ॲम्बेसेडर होण्याचे मान्य केल्यामुळे या अभियानाला चांगला प्रतिसाद मिळणार आहे.



## आम्ही मागे हटलो नाही

आधुनिक केसरी

कुस्तीगीरांचे आंदोलन सुरुच राहणार आहे असा पुनरुच्चार ऑलिम्पिक पदक विजेत्या साक्षी मलिकने केला आहे. भारतीय कुस्तीमहासंघाचे अध्यक्ष बृजभूषण सिंह यांच्यावर लैंगिक छळाचा आरोप आहे. त्यांना अटक करण्यात यावी यासाठी हे आंदोलन सुरु केले होते. २८ मे रोजी दिल्ली पोलीस आणि कुस्तीपटूंमध्ये झटापट झाली. यानंतर कुस्तीगीरांना ताब्यातही घेण्यात आले. त्यांच्याविरोधात FIR दाखल करुन त्यांना सोडण्यात आले. आता साक्षी मलिकने एक व्हिडीओ पोस्ट करत आंदोलन संपले नाही असे म्हटले आहे एक आवाहनही केले आहे. आम्ही शांततापूर्वक आंदोलन करत होतो. पण पोलिसांनी आम्हाला ताब्यात घेतले. त्यानंतर आमच्या विरोधात FIR केला. आम्ही कुठल्याही सार्वजनिक मालमत्तेचे नुकसान केले नाही तरीही गुन्हा दाखल करण्यात आला. एका महिलेला २०-२० जणांनी धरुन ठेवले होते. त्यावरुनच तुम्हाला अंदाज येईल की आमच्याशी नेमके कसे वर्तन पोलिसांनी केले असेल. मी आज व्हिडीओतून सांगते आहे की जे आमचे समर्थक त्यांना सांगू इच्छिते की सोमवारी आम्ही आंदोलनाची पुढची दिशा काय असेल? याची रुपरेषा ठरवली. मात्र आम्ही मागे हटलेलो नाही. आंदोलन सुरुच राहणार आम्ही कुठल्याही परिस्थितीत मागे हटणार नाही. असे साक्षी मलिकने म्हटले आहे. २८ मे रोजी एकीकडे नव्या संसदेचे उद्घाटन करण्यात आले तर दुसरीकडे विनेश फोगाट, बजरंग पुनिया, संगिता फोगाट, साक्षी मलिक यांच्यासह अनेकांना दिल्ली पोलिसांनी ताब्यात घेतले होते. आंदोलकांचे जंतरमंतरवरचे सामानही हटवण्यात आले होते. कुस्तीपटून रविवारी ताब्यात घेतल्यानंतर सोमवारी सोडण्यात आले आहे. या कुस्तीपटूंना जंतरमंतर वगळता इतर कोणत्याही ठिकाणी आंदोलन करता येईल असे पोलिसांनी स्पष्ट केले आहे. कुस्तीपटू गेल्या ३४ दिवसांपासून जंतरमंतरवर निदर्शन करत आहेत आणि WFI प्रमुख बृजभूषण शरण सिंह यांच्या अटकेची मागणी करत आहेत.



श्रीकृष्णदास निरंकारी (बापू)
संपर्क क्र. 9423714883

## स्त्रीकर्तृत्व आणि विचारांची उंची!

आधुनिक केसरी

**अहिल्याबाईंनी जनावरांसाठी डोण्या बांधून घेतल्या. पशुपक्ष्यांसाठी रुग्णोपचारांची व्यवस्था केली. सर्पदंशावर लगोलग उपचार व्हावेत म्हणून हकीम-वैद्य नेमले. स्त्रियांना सुरक्षित स्नानासाठी, कपडे बदलण्यासाठी बंदिस्त ओवऱ्या ठेवल्या. मुंग्यांना साखर आणि जलचरांना कणकेच्या गोळ्या खाऊ घालण्यापर्यंत त्यांचा दानधर्म सढळ होता. गोरगरिबांना सणासुदीला त्या अन्नदान करीत, कपडे वाटत, थंडीच्या दिवसात घोंगड्या वाटल्या जात. त्यांनी प्रमुख तीर्थक्षेत्री विशेषतः अयोध्या, नाशिक, द्वारका, पुष्कर, हृषीकेश, जेजुरी, पंढरपूर, गया, उदेपूर, चौंढी येथे मंदिरे बांधली. यांशिवाय सोरटी सोमनाथ, ओंकारेश्वर, मल्लिकार्जुन, औंढानागनाथ, काशीविश्वेश्वर, विष्णुपाद, महाकाळेश्वर आदी मंदिरांचा जीर्णोद्धार केला.**

वाराणसी, प्रयाग, पुणतांबे, चौंढी, नाशिक, जांब- इंदूर, त्र्यंबकेश्वर येथे नदीला विस्तीर्ण घाट बांधले आणि गोकर्ण महाबळेश्वर, उज्जयिनी, रामेश्वर, भीमाशंकर आदी ठिकाणी अन्नछत्रे उघडली. सप्तपुरे-चार धामेया ठिकाणी घाट, बाग, मंदिरे, कुंडे, धर्मशाळा बांधून यात्रिकांची सोय केली. शिवाय त्यांनी जेजुरी येथे श्री मल्हारी गौतमेश्वराची छत्री, इंदूरला मालेराव व गौतमीबाई यांच्या छत्र्या आणि महेश्वरला मुक्ताबाईंच्या स्मरणार्थ नाजूक कारागिरी केलेले मंदिर बांधले व कुंभेरीजवळ खंडेरावांच्या स्मरणार्थ छत्री बांधली. मध्यम उंचीची, सावळ्या वर्णाची, डोईवर पदर घेतलेली ही स्त्रीकर्तृत्व आणि विचार या दोन्ही दृष्टींनी केवढ्या उंचीची होती, हे त्यांचे आयुष्यच सांगते. एक अतिशय दानशूर, कर्तृत्ववान, धर्मपरायण व कार्यक्षम राज्यकर्ती म्हणून अहिल्याबाई होळकर हे नाव मराठ्यांच्या इतिहासात सुवर्णाक्षरांनी लिहिले गेले आहे. त्याला त्यांची धर्मपरायण आणि उदारवृत्ती कारणीभूत ठरली. बाई काय राज्य कारभार करणार ? ही दरबारी मंडळींची अटकळ त्यांनी सपशेल खोटी ठरविली. अशी शंका घेणाऱ्यात त्यांचा जुना दिवाण गंगाधर यशवंत चंद्रचूड उर्फ गंगोबा तात्या हा प्रमुख होता. राघोबा दादांशी त्यांनी अहिल्याबाईंविरुद्ध संधान बांधले आणि इंदूर बळकावण्यासाठी त्यांना प्रोत्साहित केले होते. अहिल्याबाईंना कळले, तेव्हा त्या युद्धास तयार असल्याचे त्यांनी राघोबा दादास कळविले. राघोबांना ते अडचणीचे झाले. हरलो तर बाईकडून हरलो आणि जिंकलो तरी बाईशी युद्ध करण्यात कोणती मोठी मर्दुमकी ? शेवटी राघोबांना माघार घ्यावी लागली. त्यांचा उत्तम पाहुणचार अहिल्याबाईंनी इंदुरात केला. अशा रीतीने बाईंच्या लौकिकात आणखीच भर पडली. अहिल्याबाईंचा जन्म जिल्हा बीड येथील चौंडी या छोट्याशा गावात दि.३१ मे १७२५ रोजी माणकोजी शिंदे व सुशिलाबाई या दांपत्याच्या पोटी झाला. धनगर समाजात जन्मलेल्या अहिल्याबाईंचे लग्न वयाच्या आठव्या वर्षी सुभेदार मल्हारराव होळकर यांचा मुलगा खंडेराव यांचेशी झाले. खंडेरावांच्या आईचे नाव गौतमीबाई होते. ते व्यसनी, छंदीफंदी होते. पण अहिल्याबाईंनी याबाबतीत तक्रार न करता सासऱ्यांनी नेमून दिलेल्या कामात लक्ष घातले. कुशाग्र बुद्धीची देणगी लाभलेल्या या सूनबाईंवर सासऱ्यांचा मोठा विश्वास होता.



खुप महत्त्वाचा पत्रव्यवहार ते अहिल्याबाईंवरच सोपवीत असत. खंडेरावांपासून त्यांना दोन अपत्ये झाली. ती मालेराव हा मुलगा आणि मुक्ताबाई ही कन्या ही होत. अहिल्याबाईंना वयाच्या अठ्ठाविसाव्या वर्षी वैधव्याला सामोरे जावे लागले. पती खंडेराव कुंभेरी येथे लढाईत मरण पावले. त्यावेळच्या प्रथेप्रमाणे त्या सती जायला निघाल्या. पण सासरे म्हणाले- प्रजाहितासाठी तरी तुम्ही सती जाऊ नये. हे राज्य सांभाळायचे आहे. आपल्या सासऱ्यांच्या इच्छेचा त्यांनी मान राखला. त्यांनी सती न जाता राज्यकारभारावर आपले लक्ष केंद्रित केले. मल्हारराव ज्यावेळी मोहिमेवर असत, तेव्हा स्वतः अहिल्याबाई राज्याचा बंदोबस्त चोख राखीत असत. मल्हाररावांच्या सल्ल्यानुसार वागत असत. मल्हारराव होळकरांना पेशव्यांनी इंदूर संस्थानची जहागीर दिली होती. दौलतीचा कारभार मोठा होता. पण सन १७६६मध्ये त्यांचे निधन झाले. अहिल्याबाईंवर फार मोठी जबाबदारी येऊन पडली. त्यांचा पुत्र मालेराव यांना जरी सुभेदारीची वस्त्रे मिळाली, तरी ती सांभाळण्याची त्यांच्यात कुवत नव्हती. लवकरच त्यांचे देहावसान झाले. अहिल्याबाई आता खऱ्या अर्थाने राज्यकर्ती झाल्या. पुढील अठ्ठावीस वर्षे त्यांनी राज्यकारभाराचा गाडा सैन्याच्या सहकार्याने अतिशय कुशलपणे चालविला. तिजोरीत भर घालत त्यांनी प्रजाहिताकडे जाणीवपूर्वक लक्ष दिले. अहिल्याबाईंच्या आयुष्यातील एक अविस्मरणीय घटना त्यांचा लौकीक वाढविणारी आहे. आपली कन्या मुक्ताबाई हिचे स्वयंवर घोषित करताना त्यांनी जाहीर केले की, जो कोणी चोर, लुटारु, दरोडेखोर यांचा राज्यात बंदोबस्त करील, त्या शूर व्यक्तीशी मुक्ताबाईचा विवाह लाविला जाईल. त्यावेळी जातपात बघितली जाणार नाही. हा अलौलिक विचार जाहीर करून त्या थांबल्या नाहीत, तर त्यांनी कृतीही तशीच केली. यशवंतराव फणसे या गुणी, शूर तरुणाशी त्यांनी मुलीचा विवाह करून दिला. त्या एक चाणाक्ष आणि सुधारणावादी राज्यकर्ती होत्या. पूर्वीच्या कायद्यांमध्ये त्यांनी परिस्थितीनुसार काही सुधारणा केल्या. करपद्धती सौम्य केली; मात्र शेतकऱ्यांकडून सारा घेणे चालू ठेवले. पाटील कुळकर्ण्यांच्या वतन हक्कांचे संरक्षण करून गावोगावी न्याय देणारे पंच अधिकारी नेमले. त्यावेळी डोंगर मुलखातून भिल्ल व गोंड आदिवासी प्रवाशांना उपद्रव देत आणि त्यांच्याकडून भीलकवडी नावाचा कर वसूल करीत. तेव्हा बाईंनी त्यांच्याशी संवाद साधून त्यांचा कर घेण्याचा हक्क मान्य केला. त्यांच्याकडून पडिक जमिनींची लागवड करून घेतली. शिवाय त्यांना विशिष्ट हद्द नेमून दिली. जमीन करार- पट्ट्याने देण्याची पद्धत सुरू केली.

अहिल्यादेवींनी सन १७७२ साली राजधानी इंदूरहून नर्मदातीरी महेश्वरला हलविली. तिथे अनेक वास्तू बांधल्या. राजवाड्यात प्रशस्त देवघर होते. नदीला घाट बांधले. मंदिरांचा जीर्णोद्धार केला व पूर्वजांच्या स्मरणार्थ छत्र्या बांधल्या. महेश्वर हे विणकरांचे मध्यवर्ती केंद्र होते. त्यांनी वस्त्रोद्योगास उत्तेजन दिले. कोष्ट्यांची वसाहत स्थापन केली आणि उत्तम हातमागाची सणंगे तयार होतील, अशी पेठ कायम केली. त्यांचा मूळ स्वभाव सौम्य असला, तरी राज्यकारभारात त्यांनी मनरूपसिंगसारख्या कुविख्यात डाकूला फाशी दिली. त्यांच्या टांकसाळीतील नाण्यांवर बिल्वपत्र व शिवलिंग यांचे छाप असत. त्यांच्या धर्मपरायणतेला प्रांत मर्यादा नव्हती. त्यामुळे त्यांचे नाव आसेतू हिमाचल घेतले जाते. त्यांनी अन्नछत्रे उघडली, राज्यातून विहिरी खोदून त्या चिरेबंद बांधून दिल्या. उन्हाळ्यात राज्यातून प्रवास करणाऱ्यांसाठी पाणपोया, धर्मशाळा, पांथशाळा, आश्रयशाळा आदी बांधल्या.

अहिल्याबाईंचा ग्रंथसंग्रह मोठा व दुर्मिळ होता. त्यात निर्णयसिंधू, द्रोणपर्व, ज्ञानेश्वरी, मथुरा माहात्म्य, मुहूर्त चिंतामणी, वाल्मिकी रामायण, पद्मपुराण, श्रावणमास माहात्म्य इत्यादी ग्रंथांच्या हस्तलिखित प्रती होत्या. विद्वानांना त्यांच्या योग्यतेप्रमाणे मानसन्मान दिला जाई. मोरापंत व शाहीर अनंत फंदी यांचा अहिल्याबाईंनी आदर-सत्कार करून अनंत फंदीस सल्लाही दिला आणि तमासगिरीपासून परावृत्त केले. अखेरच्या दिवसांत त्यांना दुःख आणि संघर्षाला तोंड द्यावे लागले. त्यांचे दोन भाऊ वारले. मुलीचा मुलगा नाथ्याबा ऐन तारुण्यात गेला, तुकोजी होळकरांची सून आनंदीबाईचे देहावसान झाले. त्यानंतर जावई यशवंतराव फणसे अचानक गेले आणि मुक्ताबाई सती गेली. अशा बिकट परिस्थितीत शिंद्यांचा सरदार गोपाळराव याने सन १७९२मध्ये होळकरांच्या फौजेवर हल्ला केला. तेव्हा तरुणासही लाजवील, अशा तडफदारीने त्यांनी शिंद्यांचा पराभव केला. त्यांच्या राज्यात सुबत्ता, संपन्नता व शांती होती. त्या अजातशत्रू होत्या; पण राज्यावर गुदरलेल्या संकटांना त्यांनी चोख उत्तर दिले. दि.१३ ऑगस्ट १७९५ रोजी महेश्वर येथे वृद्धापकाळाने त्यांचे निधन झाले.



डॉ. सुधीर अग्रवाल
संपर्क क्र. 9561594306

## हुंडा प्रथा हा समाजासाठी शापच

आधुनिक केसरी

**हुंडापद्धती पद्धती बंद झाली (कागदावर) झाली असली तरी आजही ही कुप्रथा समाजात दिसते.अनेक कुटुंबात या प्रथेने अनेक महिलांचे आयुष्य उद्धस्वस्त केले आहे.नागपूर जिल्ह्यातील कोरडी येथील एका वर मुलाने रिसॉर्ट बुक करण्यासाठी मुलीकडे १ कोटी रुपयांची मागणी केल्याची बातमी समोर आली आहे.या प्रकरणी वर मुलावर गुन्हा दाखल झाला आहे.आपल्या सामाजिक संस्थेत, विवाह ही एक सुसंस्कृत सामाजिक व्यवस्था मानली गेली आहे, जी दोन व्यक्तींमधील बंधन आहे, जिथे त्यांनी सामाजिक मूल्ये आणि वैवाहिक मूल्यांचा आदर करण्याची शपथ घेतली आहे. हे मानवजातीचे निरंतरता म्हणून देखील कार्य करते.**

वैवाहिक समारंभाच्या विविध प्रसंगी दिलेली सर्व आश्वासने असूनही, वैयक्तिक विसंगती आणि समायोजन न करणे ( वृत्तीतील फरक ) किंवा सामावून घेण्यास नकार देऊन मतभेद संपू शकतात, परंतु काही विशिष्ट परिस्थिती आहेत जेव्हा पती आणि त्याचे कुटुंब हुंड्याची मागणी करतात, परंतु भेटत नाही आणि कधी कधी त्याच्यात सूडाची भावना निर्माण होते. आज लाखो मुली हुंड्यामुळे अन्यायाच्या बळी ठरत आहेत. हुंड्यामुळे जिथे मुलींचा बळी दिला जात आहे. त्याचबरोबर मुलींच्या शिक्षणावरही याचा परिणाम होत आहे. हुंड्याच्या खर्चामुळे आज गरीब लोक मुलीला जन्म देण्यापासून आणि तिला उच्च शिक्षण देण्यास टाळाटाळ करत आहेत. त्यासाठी समाजाने जागरूक होऊन ही हुंडा प्रथा संपवायला हवी. आज हुंडा हा समाजासाठी असाध्य रोग झाला आहे. ही प्रथा चांगल्या विचाराने सुरू झाली, पण आता तिने वाईट प्रथेचे रूप धारण केले आहे. हुंड्याबाबत एक अतिशय रोचक तथ्य आहे. असे म्हणतात की जेव्हा राजे आणि सम्राटांच्या ठिकाणी विवाह होत असत तेव्हा ते आपल्या मुलींसाठी मालमत्ता दान करत असत, आपल्या मुलींना भेट म्हणून, जेणेकरून त्यांचे वैवाहिक जीवन आनंदाने सुरू होईल. पण काही लोकांच्या कमी विचाराने त्याचे रुपांतर वाईट प्रथेत झाले. आता मुलाच्या लग्नात हुंडा मागणे हा परंपरेचा भाग झाला आहे. पूर्वजांची परंपरा सांगून मुलीकडून तिच्या दर्जाच्या पलीकडे जाऊन हुंडा मागितला जातो. समाजही त्याच्या दृष्टीकोनातून पाहतो. त्याने आपल्या मुलीसाठी जितका जास्त हुंडा दिला तितकाच त्याचे स्थान अधिक. आणि वडिलांना हुंडा देण्याची क्षमता नसलेल्या मुलीकडे तुच्छतेने पाहिले जाते. एकूणच आपण पैशाच्या जोरावर हुंड्याच्या रोगाला चालना देत आहोत, असे बोलले जाते. हा आजार असा आहे की किंमत मोजूनही तो नाहीसा होऊ शकत नाही. हा रोग समाजाला आतून पोकळ करत आहे आणि आपण काहीच करू शकत नाही. ते आपल्या समाजासाठी कुष्ठरोग ठरत आहे. हुंडा हा असा आजार आहे, ज्याला प्रार्थना किंवा किंमत दोन्हीही बरे करू शकत नाहीत. कधी कोणी बळजबरीच्या नावाखाली हुंडा देतो तर कोणी अभिमान व्यक्त करण्यासाठी. यातून आपली सनातनी विचारसरणी दिसून येते. नात्याचे रुपांतर सौदेबाजीत कधी होते ते कळत नाही. असे असूनही लोकांच्या विचारसरणीत बदल झाला तर या असाध्य आजारावर उपचार शक्य आहेत. रोगापासून मुक्त होण्यासाठी थोडासा त्रास होतो. समाजाला ते सहन करावे लागेल. ज्या दिवशी हुंडा प्रथा संपेल, मुलगा-मुलगी हा भेदभाव नाहीसा होईल. केवळ महिला दिन साजरा करून काहीही होणार नाही. हुंडा प्रथेचा अंत तेव्हाच शक्य आहे जेव्हा लोकांच्या विचारात बदल होईल. भारतातील हुंडा पद्धतीमुळे वधूच्या कुटुंबावर मोठा आर्थिक भार पडतो. या समस्येचे गांभीर्य आणि परिणाम लक्षात घेऊन कायदा निर्मात्यांनी कायद्यातील त्रुटी दूर करण्यासाठी तसेच कायदा प्रभावी करण्यासाठी नवीन तरतुदी करण्यासाठी अनेक उपाययोजना केल्या आहेत. हुंडा बंदी कायदा, हुंडा या सामाजिक दुष्प्रवृत्तीला सामोरे जाणारा पहिला राष्ट्रीय कायदा १९६१मध्ये मंजूर करण्यात आला. हुंडा घेणे आणि देणे याला प्रतिबंध करणे हा या कायद्याचा उद्देश आहे. कायदा अनेक उपचारात्मक आणि दंडात्मक तरतुदी आणतो परंतु, आधीच निश्चित केल्याप्रमाणे, उद्दिष्टे साध्य झालेली नाहीत. हुंड्याची समस्या गुन्हेगारी कायद्याचे योग्य लक्ष्य नसली तरी हुंड्याशी संबंधित हिंसा, काहीवेळा धोकादायक, निश्चितपणे फौजदारी कायद्यात येते. हुंडासंबंधित मृत्यूचे वाढते प्रमाण आणि हुंडाबंदी कायदा अयशस्वी झाल्यामुळे फौजदारी कायद्यात काही महत्त्वाचे बदल करण्यात आले आहेत जसे की,फौजदारी कायदा दुरुस्ती अधिनियम ( गुन्हेगारी कायदा दुरुस्ती अधिनियम ), १९८३ आणि १९८६ . भारतीय दंड संहितेत कलम ३०४-बी आणि ४९८-अ असे दोन नवीन गुन्हे तयार करण्यात आले आहेत. कलम ४०४-बी अंतर्गत गुन्ह्याला हुंडाबळी असे म्हणतात, तर कलम ४९८-ए पती किंवा पतीच्या नातेवाईकाने स्त्रीवर अत्याचार करणाऱ्यांशी संबंधित आहे. फौजदारी प्रक्रिया संहितेत कलम १७४ आणि १७६ पोलिस आणि दंडाधिकाऱ्यांकडून अनैसर्गिक मृत्यूची कारणे आणि चौकशी आणि भारतीय पुरावा कायद्यातील नवीन कलम ११३-बी यांचा समावेश आहे .हुंडाबळीच्या प्रकरणांमध्ये असे गृहित धरले जाते की ज्या व्यक्तीने महिलेला तिच्या मृत्यूपूर्वी क्रूरता किंवा छळ केला असेल, तो हुंडा मृत्यूसाठी दोषी मानला जाऊ शकतो.

भारतीय फौजदारी कायद्यात बदल होऊनही, हुंडाबळी मोठया प्रमाणात वाढत आहे.

हे पत्र संपादक, मालक, मुद्रक व प्रकाशक डॉ. प्रभू व्यंकटराव गोरे* यांनी सोलापूर तरुण भारत मीडिया लि., प्लॉट नं ए -३२, छत्रपती संभाजीनगर इंडस्ट्रीयल को-ऑप., सोसायटी, स्टेशन रोड, छत्रपती संभाजीनगर ४३१ ००५ (महाराष्ट्र) येथे मुद्रित करून प्लॉट नं. २०५, १३ वी योजना, जिजामाता कॉलनी, एन - २, सिडको, जि. छत्रपती संभाजीनगर (महाराष्ट्र) येथून प्रकाशित केले. ( * पीआरबी कायद्यानुसार संपादकीय जबाबदारी यांची आहे. या अंकात प्रसिद्ध झालेल्या प्रत्येक बातमी, लेख व जाहिरातींशी संपादक सहमत असतीलच असे नाही. सर्व वाद छत्रपती संभाजीनगर न्यायालयाच्या कक्षेत)आरएनआय : एमएएचएमएआर/२०२१/८२५६६, ई-मेल : aadhunikkesari@gmail.com, संपर्क : +९१ ९०७५७ १६७३९

Printed at Solapur Tarun Bharat Media Ltd., Plot No. A-32, Chhatrapati Sambhajinagar Industrial Co-op, Society, Station Road, Chhatrapati Sambhajinagar 431005 (Maharashtra) Plot No. 205, 13th Plan, Jijamata Colony, N - 2, CIDCO, Dist. Chhatrapati Sambhajinagar (Maharashtra) and published by editor, owner, printer, and publisher Dr. Prabhu Venkatrao Gore * (* According to the PRB Act, it is the responsibility of the editor. The editor does not necessarily agree with every news, article, and advertisement published in this issue. All disputes are within the purview of the Chhatrapati Sambhajinagar court.) RNI : MAHMAR/2021/82566, E-mail: aadhunikkesari@gmail.com, Contact : +91 90757 16739

# मच्छी बाजार परिसरात आमदारांच्या हस्ते झाले रस्ते कामाचे उद्‌घाटन

आधुनिक केसरी न्यूज



**धुळे :** प्रभाग क्रमांक ८ मध्ये मौलवीगंज येथे आबिद सांबरवाले यांच्या घरापासून ते मिया बिडीवाले, वसिम यांच्या घरापासून ते छोटी बाई यांचे घर, बजरंग पुल ते खानदेश बेकरी पर्यन्त कॉंक्रिट रस्ता करणे. कामाचा शुभारंभ आ.फारुख शाह यांचे हस्ते संपन्न झाला. धुळे शहरातील अल्पसंख्याक भागात मुलभूत सुविधा जसे रस्ते, गटारी, पाण्याची पाईप लाईन यासाठी आजपर्यंत लोक प्रतिनिधींनी दुर्लक्ष केल्यामुळे या भागाचा विकास थांबलेला होता. कॉलनी व वस्त्यांमध्ये रस्ते नसल्यामुळे पावसाळ्यात नागरीकांचे हाल होत होते. त्या सगळ्या गोष्टींचा आमदार फारुख शाह यांनी अभ्यास करून ज्या भागात रस्ते नाही. गटारी नाही,पाईप लाईन नाही. यासाठी निधी उपलब्ध करून कामाचा सपाटा लावलेला आहे.शहराच्या मध्यवर्ती भागात असलेल्या मच्छी बाजार परिसरातील नागरिकांनी मागणी केल्यानुसार महाराष्ट्र सुवर्ण जयंती नगरोत्थान महाअभियान अंतर्गत रस्ते कॉंक्रीटीकरण करण्यासाठी एक कोटी चा निधी आ.फारुख शाह यांच्या विशेष प्रयत्नाने मंजूर करण्यात आला असून या कामाचा शुभारंभ आ.फारुख शाह यांचे हस्ते करण्यात आला. मीया बिडी कारखान्याजवळ संपन्न झालेल्या शुभारंभ कार्यक्रमाच्या वेळीआ.फारुख शाह यांचे सोबत सलीम शाह, गुफरान पोपटवाले, जलील फर्हाद अन्सारी, कय्युम अन्सारी, हाजी इरफान अन्सारी, महेमुद अन्सारी पहिलवान, मुण्णा अन्सारी,निजाम सय्यद, छोटू बशीर अहमद, डॉ. शराफत अली, अब्दुल मजीद मुकादम, मुनीर अहमद,लड्डू मामु अन्सारी, इकबाल शाह,अनिस शाह, सउद सरदार, फैसल अन्सारी, इब्राहीम पठाण,हासिम अन्सारी, फारुख अन्सारी, गुलाम रब्बानी,मोहम्मद युसुफ, जुबेर अन्सारी, छोटू मच्छीवाले,साजीद खणसा,फहीम अन्सारी, आसिफ पोपट शाहआदी उपस्थित होते. कार्यक्रमाचे आयोजन निसार अन्सारी,वासिम अक्रम,रिझवान हाजी अन्सारी, यांनी केले तर सूत्रसंचालन इलियास अन्सारी यांनी केले.



# 'हल्लेखोरांवर कार्यवाही करा'

आधुनिक केसरी न्यूज

**जळगाव जा :** २७ मे रोजी आंबेडकर भवन दादर येथे वंचीत बहूजन आघाडीचे प्रदेश कार्यकर्त्यांची बैठक होतीत्यावेळी वंचित बहुजन युवा आघाडी चे मुंबई प्रदेश याअध्यक्ष परमेश्वर रनशूर आणि वार्ड अध्यक्ष गौतम हराळ यांच्यावर आंबेडकर भवन परिसरात प्राणघातक हल्ला लोखंडी रॉड,तलवार आणि चोपरने 4 अज्ञातखोरांनी जीवघेणा हल्ला केला. या प्रकरणी संपूर्ण राज्यभर पोलीस स्टेशन मार्फत गृहमंत्री महाराष्ट्र राज्य यांना निवेदन देऊन निषेध नोंदवत आहेत. याचप्रमाणे वं ब यु आ जळगाव जा च्या वतीने पोलीस स्टेशन जळगाव जा मार्फत गृहमंत्री महाराष्ट्र राज्य यांना निवेदन सादर करण्यात आले.या हल्ल्या मुळे संपूर्ण महाराष्ट्रात तीव्र संताप व्यक्त होत आहे.हल्लेखोरांवर तातडीने कार्यवाही न झाल्यास वंचित बहुजन युवा आघाडीच्या वतीने तीव्र जनआंदोलन करण्यात येईल.असा इशारा निवेदन देते वेळी करण्यात आला. निवेदन देते वेळी वंचित बहुजन युवा आघाडीचे जि उपाध्यक्ष प्रा अनिल रणीत,ता युवा अध्यक्ष राजरत्न वाकोडे,युवा शहराध्यक्ष प्रवीण तायडे,धम्मपाल नितवने युवा महासचिव जळगाव जा ता उपा वं ब आ श्रीकृष्ण गवई,अमर भीमराव वानखडे,सुनील इंगळे, अक्षय इंगळे आदी कार्यकर्ते व पदाधिकारी उपस्थित होते.

# दिल की बात बताकर तो देखो

## बेळगाव लोकमान्य ग्रंथालयात गोमंतकीय कविता गाजल्या

आधुनिक केसरी न्यूज

**बेळगाव :** येथील लोकमान्य ग्रंथालयातील साने गुरुजी सभागृहात झालेल्या गोमंतकीय कविता या सदरातील कविसंमेलन रंगतदार झाले. ग्रंथालयाचे जगदीश कुंटे यांनी प्रास्ताविकात ग्रंथालयाची व विविध उपक्रमांची माहिती दिली. गोवा म्हणजे केवळ मौजमस्ती व खाओ पिओ मजा करो असे नसून येथील मंदिरे, चर्च आणि निसर्गसौंदर्य पाहण्यासाठी गोव्यात यावे, असे आवाहन गोमंतकीय कवी- कवयित्रींनी केले. वाङ्मय चर्चा मंडळ, बुक लव्हर्स क्लब, शब्दगंध कवी मंडळ, सरस्वती वाचनालय, राणी पार्वतीदेवी महाविद्यालय या संस्थांनी एकत्र येऊन हे कविता वाचन आयोजित केले होते. नजर से नजर मिला कर तो देखो दिल की बात बताकर तो देखो अशी बहारदार शब्दफेक करीत संयोजक चित्रा प्रकाश क्षीरसागर यांनी कविसंमेलनात रसिकांची मने जिंकली. प्रकाश रामचंद्र क्षीरसागर यांनी गोव्याची महती सांगणारी व जीवनदायी नद्यांवरील कविता व गझल सादर केली. मोहनराव कुलकर्णी यांनी तो आणि ती ही कविता सादर केली. आसावरी कुलकर्णी यांनी गोव्यात वाहणाऱ्या मांडवी नदीची व्यथा कवितेतून मांडली. शर्मिला प्रभू यांनी गोव्यातील मंदिरावर माहिती देणारी कविता सादर केली. रजनी रायकर यांनी गोव्याची आणि माशांची माहिती कवितेतून दिली. अंजली चितळे यांनीही कविता सादर केल्या. आताशा पोरी भातुकली खेळत नाहीत अशी सद्यस्थितीवरील कविता चित्रा क्षीरसागर यांनी सादर केली. गोमंतकीय कवींनी सर्व संस्थांच्या प्रतिनिधींचा सन्मान केला. यावेळी सुभाष सुंठणकर, श्रीमती ओगले, कादंबरीकार माधुरी शशानभाग, सुधीर जोगळेकर, डॉ. विनोद गायकवाड, नीलेश शिंदे, प्रा. परसू गावडे आदी उपस्थित होते. शब्दगंध मंडळाचे अशोक अलगोंडी यांनी स्वागत केले व आभारही मानले. कार्यक्रमाला श्रोते बहुसंख्येने उपस्थित होते. श्रोत्यांनी गोमंतकीय कवितांना चांगली दाद दिली.




# डॉक्टरची ३ लाखांची फसवणूक

आधुनिक केसरी न्यूज

**नागपूर :** मेडिकल रुग्णालयाच्या एका डॉक्टरला सायबर गुन्हेगारांनी एमडी तस्करीची भीती दाखवून तीन लाखांनी फसवणूक केली. या प्रकरणी अजनी पोलिसांनी सायबर गुन्हेगारांवर गुन्हा दाखल केला. यावेळी आरोपींनी थेट सायबर पोलीस ठाण्यातून बोलत असल्याचे सांगून रक्कम लुबाडली हे विशेष. डॉ. कौशिकी हलदर हे मेडिकल रुग्णालय आणि महाविद्यालयात वैद्यकिय शिक्षण घेतात आणि नोकरी करतात. वसतीगृहात आराम करीत असताना बुधवारी एक फोन आला. 'मी फेडेक्स कुरिअर कंपनीतून बोलत असून तुमचे एक पार्सल पोलिसांनी जप्त केले आहे.' अशी माहिती दिली. पोलीस अधिकारी असल्याचे सांगून डॉ. हलदर यांना अटक करण्याची भीती दाखवली. 'तुमचे पार्सल मुंबई ते तायवान जात असून त्यात १४० ग्रॅंम एमडी ड्रग्स आहे. त्यामुळे तुमचे बँक खाते आरबीआयला तपासायचे आहे.




नक्षत्रवाडी येथील गट क्र. 8/1, समर्थ एलक्लेव्हमध्ये पहिल्या मजल्यावरील 2 बीएचके फ्लॅट अर्जंट विकणे आहे. एकूण क्षेत्रफळ 910 स्क्वेअर फूट, क्लिअर टायटल, सीएसएमएसएस कॉलेजपासून पाच ते सात मिनिटांच्या अंतरावर, रम्य वातावरणात, मेन रोडच्या अगदी जवळ,
संपर्क : मो. 7588818406

महाराष्ट्र Business Katta












# कु. राधा जोशीचा कवितासंग्रह 'कुहूकुहू'

आधुनिक केसरी


**कु. राधा जोशी ही नागपूरचे सिद्धहस्त चित्रकार विकास जोशी यांची कन्या. राधेला नववीत शिकत असल्यापासून कविता लिहिण्याचा छंद आहे. ती छान छान चित्रंही काढते. कविता आणि चित्र ही दोन्ही तिची अभिव्यक्त होण्याची सशक्त माध्यमं आहेत. राधेचा 'कुहूकुहू' हा देखणा बालकवितासंग्रह नांदेडच्या इसाप प्रकाशनाने नुकताच प्रकाशित केला आहे. ३२ पृष्ठांच्या ह्या संग्रहात एकूण १६ बालकविता आहेत. ह्या कवितांमध्ये विषयांची विविधता आहे. यात राधेच्या मनाचं फुलपाखरू मनसोक्त भिरभिरताना दिसतं. 'केशरी आकाश निळे निळे पाणी' असे ह्या कवितेचे जग रंगीबेरंगी आहे. राधेच्या कवितेच्या हिरव्या जंगलात वनराणीही हिरवीच आहे. ह्या कवितेच्या तळ्यात लाल पिवळ्या मासोळ्या आहेत.**

विश्वास बसत नाही ना? बसणारच नाही, कारण हे कवितेचं जग आहे. ह्या जगात काहीही घडू शकतं. आता हेच पाहा ना! गंपू आणि भूत हे दोघे बेस्ट फ्रेंड आहेत. उडालात ना? उडणारच ना! ह्या भुताला पदार्थ आवडतात दाळीचे आणि पांघरायला पान आवडते केळीचे. आता बोला! ते भूतही चांगलं आहे बरं का! राधेच्या कवितेत भुताचं जग आणि कॉप्म्प्यूटरचं जग हे दोन्ही एकत्र गुण्यागोविंदाने नांदतात. कॉप्म्प्यूटरच्या जगाचे बरेवाईट परिणाम राधेला माहीत आहेत. म्हणूनच तिला प्रश्न पडला आहे : 'जग झालेय आधुनिक कोण वाचतेय मासिक?' 'कॉप्म्प्यूटरच्या जगामुळे हरवली आहेत पुस्तके' ही राधेच्या मनातील खंत आहे. कधी फुलांचे, कधी फळांचे, कधी रंगांचे, तर कधी पशुपक्ष्यांचे संमेलन भरते, हे आपण आजवर बालकवितेत वाचले होते. पण राधेच्या कवितेत 'भाज्यांची मॉलमीट' भरली आहे. सगळ्या पालेभाज्या, फळभाज्या एकत्र जमल्या आहेत आणि त्या आपापले मोठेपण सांगताहेतः 'मेथी, पुदिना, शेवगा, बीट आरोग्य तुमचे ठेवील नीट' संमेलन असो, जत्रा असो की मीट, भाज्यांचे भोजनातील महत्त्व बालकुमारांच्या मनावर बिंबविणे महत्त्वाचे. कविता ही जणू राधेची मैत्रीण आहे. राधेनं कविता लिहायचं ठरवलं, की शब्द तिच्या मदतीला धावून येतात. म्हणून राधा म्हणतेः 'कविता ही अर्थपूर्ण अस्त्र अक्षरांचे रसायन मंत्रमुग्ध गायन कविता ही'. राधेच्या मते कवितेचं हे सामर्थ्य आहे. ह्या पुस्तकात काही कथाही कवितेच्या रूपात अवतरल्या आहेत. एकदा चंद्र आणि सूर्य यांचे भांडण झाले. दोघेही दोन्हीकडे रुसून बसले. दोघेही म्हणू लागले, मीच श्रेष्ठ! मग देवानेच वाटणी करून त्यांचे भांडण मिटविले 'सूर्याचा मान दिवसाला चंद्राचा मान रात्रीला'. राधेच्या कवितेत दिवाळी आपल्या प्रत्येक दिवसाचं महत्त्व सांगत आली आहे. एक, दोन, तीन, चार ह्या अंकांवर आपल्याकडे भरपूर बालकविता आहेत. ह्या संग्रहात राधेची एक ते शंभर अंकांवरची 'नंबरी नंबर' ह्या शीर्षकाची कविता आहे. नंबरही नंबरी असतात बरं का! ह्या कवितेत प्रत्येक अंकाचे वैशिष्ट्य सांगितले आहे. आता हेच पाहाः एक आणि नऊ जोडी नाईस झाला नंबर एकोणवीस'. ह्या कडव्यात नाईस आणि नंबर हे दोन इंग्रजी शब्द आले आहेत. याचे कारण उघड आहे. राधेचे शिक्षण इंग्रजी माध्यमातून झाले आहे. सर्कशीतील विदूषक हा बाळगोपाळांचा आवडता दोस्त. कारण तो नेहमी टिवल्याबावल्या करतो. गमजा करून हसवतो. तो कधीच रडत नाही.उलट तो सदैव हसरा चेहरा ठेवतो. म्हणून राधेला वाटते : 'विदूषक नसेल तर कोण हसेल? सर्कस पाहण्याचा बेतच फसेल'. पुस्तक हा राधेचा चांगला मित्र आहे. 'वाचन करू, करू ताठ मान' हा राधेचा विश्वास आहे. पुस्तकांत काय नाही? 'अवघे विश्व, नऊ रस कधी स्वारी, कधी वारी कधी निसर्ग, कधी परी एकदा उघडून बघा तरी' ख-या पुस्तकाशिवाय मज्जा नाही, असा विश्वास राधेने व्यक्त केला आहे. पंढरपूरची विठूमाऊली म्हणजेच सावळानाथ. ह्या सावळ्यानाथालासुद्धा राधेच्या कवितेत येऊन बसण्याच्या मोह आवरता आला नाही. 'वेड्यांचा बाजार' हे एक कथाकाव्य आहे. एकदा एका सशाच्या पाठीवर झाडाचे पान पडते. आभाळ पडले, म्हणून तो पळायला लागला. त्याला पाहून कोल्हा, वाघ, चिमणी, साप, हत्ती हे सगळेच पळायला लागले. एक घुबड मात्र नेक विचार करतं आणि म्हणतं 'इथे भरलाय वेड्यांचा बाजार ससुला झाला फक्त बेजार'. जगाने अशुभ ठरविलेल्या घुबडानेच वेड्यांच्या बाजाराचे डोळे उघडले आहेत. राधेला अपेक्षित असलेले 'कवींचे जग' मोठे मजेशीर आहे. ह्या जगात : 'प-यांची रेलचेल असावी प्राणिमात्रांना भाषा यावी दडपण कशाचे नको चिंता, काळजी काही नको माणुसकीचे दर्शन व्हावे' अद्‌भुतरम्य जगात रमतानाही राधेला माणुसकीच महत्त्वाची वाटते. 'वीज कडाडली कडकडकड आभाळ गरजले गडगडगड'
किंवा 'झरझर झरझर वाहती वारे इंद्रधनूचे रंग न्यारे' अशी अक्षरांची पुनरावृत्ती करून राधेने आपल्या कवितेत छान नाद, लय, ताल साधला आहे.
राधेचे शालेय शिक्षण इंग्रजी माध्यमातून झालेले असल्यामुळे आणि मराठीपेक्षा तिच्या ओठांवर इंग्रजी शब्दच अधिक खेळत असल्यामुळे ह्या पुस्तकात फास्ट फ्रेंड, एंड, कॉंप्यूटर, स्मार्ट, बाय हार्ट, इंटरनेट, फेसबुक, लेटेस्ट, मॉलमीट, पिझ्झा, बर्गर, इंग्लिश, डिझाईन, नाईस, ऑनलाईन अशा परभाषीय शब्दांची रेलचेल आहे. त्याने काही बिघडत नाही. भाषेपेक्षा भाव महत्त्वाचे आहेत. इंग्रजी माध्यमात शिकलेली मुले मराठी साहित्याकडे वळत नाहीत, हा सार्वत्रिक समज राधेने 'कुहूकुहू' लिहून खोटा ठरविला आहे. राधेच्या बालकवितेत कल्पनारम्यता आहे, अद्‌भुतरम्यता आहे. तिने यमक आणि प्रास साधून कवितेत नादमाधुर्य आणले आहे. 'कुहूकुहू' हे संग्रहाचे शीर्षकच मुळी नादमधुर आहे. राधेची कविता ही अल्पाक्षररमणीय आहे. ह्या कवितेत शब्दचमत्कृती आहे आणि अर्थसमृद्धीही आहे. राधेच्या कवितेत कल्पनांची तरलताही आहे आणि नवलाईही आहे. राधेची ही बालकविता म्हणजे निरागस, निखळ, निर्मळ आणि निष्पाप बालमनाचा उत्कट आविष्कार आहे. राधेच्या कवितेतला निसर्ग हा हसता, खेळता, धडपडता निसर्ग आहे. ही कविता आनंदनिर्मिती तर करतेच, शिवाय बालकुमार वाचकांसाठी काही एक मूल्यसंस्कार देऊन जाते. मुलीच्या पुस्तकाला वडलांची सजावट हा दुर्मीळ योग ह्या पुस्तकात जुळून आला आहे. खूप वर्षांपूर्वी विकास जोशी पुस्तकांची मुखपृष्ठं आणि आतील सजावट करत असत, पण हल्ली ते चित्रप्रदर्शनांत इतके व्यग्र आहेत, की त्यातून त्यांना वेळच मिळत नाही.
'कुहूकुहू'चे बोलके मुखपृष्ठ आणि आतील आनंददायी चित्रे विकास जोशी यांनी काढली आहेत. राधेने बालकवितेचे सुंदर मंदिर बांधले आणि विकास जोशी यांनी त्यावर आपल्या कुंचल्याने चित्रांचा सोनेरी कळस चढविला, असे म्हटले तर ते अतिशयोक्तीचे होणार नाही. यासाठी बापलेकीचे हार्दिक अभिनंदन! पुस्तकाची पाठराखण करताना दासू वैद्य यांनी म्हटल्याप्रमाणे राधा निरागसपणे भोवताल रंगवताना ती भोवताल समजून घेण्याचाही प्रयत्न करते.
राधेचे कलावंत मन ह्या प्रत्येक कवितेत डोकावते आहे. मुखपृष्ठावरील मुलीच्या डोक्यावर कोकिळा बसली आहे. याचा अर्थ ह्या पुस्तकात शब्द, स्वर, चित्र आणि संगीताचे मधुर मिश्रण जमले आहे. 'कुहूकुहू' म्हणजे राधेच्या नादमधुर बालकविता, विकास जोशी यांची बोलकी चित्रे आणि इसाप प्रकाशनाचे दत्ता डांगे यांनी केलेली पुस्तकाची अप्रतिम निर्मिती यांचा त्रिवेणी संगम होय. 'कुहूकुहू' ( बालकवितासंग्रह )

**कवयित्री : राधा जोशी**
**मुखपृष्ठ व सजावट : विकास जोशी**
**प्रकाशक : इसाप प्रकाशन, नांदेड**
**पृष्ठे ३२. किंमत रु. ६०**




# एकनाथ आव्हाड यांच्या बालकविता



डॉ. किशोर सानप
आधुनिक केसरी

**बालपणापासूनच एकनाथांच्या बालमनावर साने गुरुजींच्या शामच्या आईचा पगडा आहे. गुरुजींचे विचार आणि संस्कारांनी त्यांचं व्यक्तिमत्त्व गुरुजीमय झालेलं दिसतं. पुढे उमेदीतच लहान मुलांचे कवी एकनाथ गुरुजीही बनले. एकनाथ, गेल्या पंचवीस वर्षांपासून मुंबई महापालिकेच्या शाळेत शिक्षक म्हणून अध्यापनाचे, मूल्यशिक्षणाचे संस्कार बालमनावर करणारे हसमुख, विनयशील, नम्र, निगर्वी, ध्येयनिष्ठ, साने गुरूजींच्या परंपरेतले सेवाभावी समर्पित गुरुजी आणि बालसाहित्यिक - बालकवी आहेत. गेल्या अनेक वर्षांपासून एकनाथ आव्हाड बालसाहित्याच्या संस्कारशील भूमीची नैतिकतेने, निष्ठापूर्वक, साने गुरुजींच्या साहित्य परंपरेतच बालसाहित्याचे लेखन करीत आहेत.**

**(मागील अंकावरून)**

आव्हाडांच्या बालसाहित्यात बालमन केंद्रवर्ती असते. बालमन संस्कारशील आणि सृजनशील असते. नवनिर्मितीच्या प्रेरणांच्या परिघात त्यांचे व्यक्तिमत्त्व घडवणे हे खरेतर राष्ट्रीय कार्य आहे. मुलांना गोष्टींची, कवितांची, कोड्यांची मुळातच स्वभावतः आवड असते. आकर्षण असते. आजी-आजोबांकडून पुरवली जाणारी गोष्टी सांगण्याची मौखिक परंपरा हळूहळू काळाच्या ओघात लुप्त होत आहे. मुलांना सुयोग्य नागरिक बनवून मानवतावादी विचारांचे संस्कार करण्याचे आधुनिक ग्लोबल एकविसाव्या शतकात बालसाहित्यच एकमेव प्रमुख माध्यम आणि साधन म्हणून समाजाजवळ उरलेले आहे. तुलनेत आधुनिक काळातही मोठ्या प्रमाणावर बालसाहित्याची निर्मिती होत आहे. दिग्गज मोठे लेखकही बालसाहित्य लेखनात उमेदवारी करताना दिसतात. साहित्याच्या बाजारपेठेतही बालसाहित्याची पुस्तके भराभर विकली जातात. प्रौढ साहित्यात साचलेपण आल्यामुळे बालसाहित्यातील सृजनशील नवनिर्मिती आबालवृद्धांना आकर्षित करीत आहे. कोणत्याही साहित्याला बाजारपेठेची हवा लागली की व्यावसायिक लेखकांची भाऊगर्दी वाढू लागते. बालप्रतिभा नसलेलेही लोक बालसाहित्याची कृत्रिम निर्मिती करू लागतात. अस्सल बालसाहित्य लेखकाला आपले अस्तित्व सिद्ध करताना अनेक ताणतणाव सहन करावे लागतात. एकनाथ आव्हाड मात्र बालसाहित्याच्या बाजारबुणगेपणापासून शेकडो योजने दूर गुरुजींच्या बालमनांवर संस्कार करणाऱ्या संपृक्त, संस्कारशील, राष्ट्रभक्तीपर पायवाटेवर उभे आहेत. एकनाथ आव्हाडांनी बालसाहित्याच्या युगात आपली स्वतःची स्वतंत्र, संस्कारशील, समृद्ध, आनंदमय समांतर पायवाट निर्माण केली आहे. एकनाथ आव्हाड हे गुरुजी परंपरेतले निष्ठावंत आणि व्रतस्थ बालसाहित्यिक असल्यामुळे त्यांच्या संस्कारशील बालसाहित्य निर्मितीने गेल्या दीड दशकात बालमनांची सुयोग्य, समतोल जडणघडण होत आहे. आव्हाडांच्या बालसाहित्यात आबालवृद्धांना आपल्याकडे आकर्षून घेणारे विविध विषय अतिशय नियोजनबद्ध पद्धतीने हाताळले जातात. आबालवृद्धांच्या मनाचा ताबा घेतात. आव्हाड आपल्या कवितांची कथाकाव्याची रचना गेय, रंजक, अभ्यासपूर्ण, आशयघन, आटोपशील, सोपी, सुलभ, सुगम, लयबद्ध करताना ती आबालवृद्ध वाचकांच्या अपेक्षा पूर्ण करणारी असते. आव्हाड खुद्द गुरुजी परंपरेतले शिक्षक असल्यामुळे बालमनांच्या सर्वांगीण विकासासाठी अनुभवातून त्यांनी मुलांचं बालमानसशास्त्र समजून घेतलं आहे. विद्यार्थ्यांच्या शारीरिक, बौद्धिक, भावनिक, मानसिक, सामाजिक, राष्ट्रीय गरजा लक्षात घेऊन बालकांचा समतोलपणे सर्वांगीण विकास व्हावा यासाठीच त्यांची सृजनशील लेखनी आणि सृजनशील मन, सतत प्रयत्नशील असते. परिणामतः एकनाथ आव्हाडांच्या बालसाहित्याच्या आणि विशेषतः बालकवितांच्या वाचनासाठी; चिंतन, मनन, गुणगुणण्यासाठी, व्यक्तिमत्त्वाला वळण लावण्यासाठी, सर्वच स्तरातील आबालवृद्धांच्या उड्या पडतात. त्यांच्या बालकविता-बालकथा बालकोडी - बालनाट्य आदी पुस्तकांच्या आवृत्या संपल्या की लगेच पुन्हा नव्या आवृत्तीसाठी वाचकांकडून तगादा लावला जातो. वेळप्रसंगी आर्थिक निधीही उभारला जातो. याचाच अर्थ असा की, एकनाथ आव्हाडांच्या असामान्य बालसाहित्यनिर्मितीवर आबालवृद्धांचा, सर्व स्तरातील वाचकांचा उदंड विश्वास आहे. आपल्या पाल्यांना घडवणारे याही लेखकाचे बालसाहित्य बालकविता आपण आपल्या मुलांना दिल्या पाहिजेत; म्हणून पालकांमध्येही चुरस आढळते. विशेषतः बालसाहित्यकाराला कालमान- स्थलभान- वातावरणनिर्मिती पर्यावरणातील बदलांचे तीव्र भान बाळगणे आवश्यक असते. सर्वाधिक संस्कारशील- संवेदनशील मनं बालकांचीच असतात. बालमनांवर सृष्टीतील बदलांचा, कालबदलांचा, मूल्यसंकराचा, आधुनिकतेचा, वैज्ञानिक आणि तांत्रिक प्रगतीचा दूरगामी परिणाम होत असतो. प्रौढांपेक्षा बालमनं अतिसंवेदनशील, स्वीकार्यशील, नकारशीलही असतात. आधुनिकता आणि ज्ञान-विज्ञान- तंत्रज्ञानातील बदल मनोरंजक पद्धतीने बालकांच्या मनोविश्वात शिरतील, बुद्धीला चालना देतील, नवनिर्मितीच्या प्रेरणा निर्माण करतील, नवीन शोध लावण्याच्या बौद्धिक क्षमता निर्माण करतील, नवे शास्त्रज्ञ, तंत्रज्ञ निर्माण होतील; या अंगाने बालसाहित्यकाराला बालसाहित्याच्या निर्मितीतून आधुनिकता आणि परिवर्तनाच्या उद्यमशील, नवनवोन्मेषशाली प्रतिभांची निर्मिती समाजाला उपकारक होण्याच्या परिप्रेक्ष्यात करावी लागते. मनोरंजक अद्‌भुत परंतु साक्षात्कारी क्षणांची बालकांच्या मनात पेरणी करणारे बालसाहित्य निर्माण करावे लागते. एकनाथ आव्हाडांची बालसाहित्याची बालकवितांची निर्मिती ही याच कालभानाला, स्थलभानाला, परिवर्तन आणि बदलांना, नवनवीन शोधांना, शास्त्रज्ञांची आणि प्रतिभावंतांची निर्मिती बालकांतून होण्याला; उपकारक ठरणारी आहे. बालकवी - बालसाहित्यकार एकनाथ आव्हाडांनी आधुनिक, प्रगत विचारांचा, आधुनिक व वैज्ञानिक दृष्टिकोनाचा, अंधश्रद्धामुक्त विचारसरणीचा, बालमनाला विशाल बनवून देशाचे उत्तम भावी नागरिक घडवण्याचा आधारस्तंभ असलेल्या बालकांच्या निकोप व्यक्तिमत्त्व विकासाचा विचार प्रमाण मानून, बालसाहित्याची कालसापेक्ष निर्मिती केली आहे. मूल हे. अनुकरणशील आणि चिकित्सकपणे प्रश्न उपस्थित करणारे असते. चुकत चुकत शिकण्याचा मंत्र त्यांना निरीक्षणातून प्राप्त होतो. बालकांच्या जिज्ञासेला प्रतिसाद देणे, त्यांच्या मनात प्रश्न निर्माण करून, त्याची उत्तरे त्यांनाच शोधायला लावण्याची क्षमता निर्माण करणारे बालसाहित्य- बालकविता लिहिण्याचा आव्हाडांचा नेहमी प्रयत्न असतो. आव्हाडांच्या बालसाहित्याचा बालकवितेचा मुख्य हेतू आहे की, मुलांनी शिक्षणातून शहाणं माणूस व्हावं. समाजासाठी, देशासाठी नवीन काही निर्माण करावं. शास्त्रज्ञ व्हावं. समाजाला घडवणारा कलावंत व्हावं. माणसाचं जगणं हे स्वतःपासून सुरू होते. समाजाच्या व्यापक हितात ते विसर्जीत होते. शिक्षण म्हणजेच मुळात वर्तन परिवर्तन होय. माणसातल्या पूर्णत्वाचे प्रकटीकरण, सद्‌सद्विवेकाने अविचारावर मिळवलेला विजय, मनुष्यत्व जाणण्याची आणि जगण्याची प्रक्रिया, मूल्यांच्या संवर्धनाची आचरणशील कृती, माणसातल्या पशुत्वावर मात करण्याची वृत्ती-प्रवृत्ती, सुप्तगुणांच्या प्रकटीकरणास दिलेला वाव, चालना, मानसिक बौद्धिक-शारिरीक-सामाजिक-भावनिक अंगाने माणसाचा विकास करून, त्याला सुसंस्कृत नागरिक म्हणून घडवणारी प्रणाली, समाजाचा जबाबदार घटक म्हणून जगायला मदत करणारी मूलभूत बाब, स्वतःच्या पायावर स्वाभिमानाने उभे राहायला मदत करणारी क्रियाशीलता, कृतीशीलता, याच मूल्यशिक्षणासोबत जे शिक्षण जात, धर्म, पंथ, संप्रदाय, भाषा, प्रांत, लिंगभेद, वर्णभेद यांच्या जोखडातून बंधनातून माणसाला मुक्त करून, माणसामध्ये मानवतेची आणि करुणेची ज्योत पेटवते ते शिक्षण होय. हाच साने गुरुजींच्या व्यक्तिमत्त्वाचा आणि लेखनाचा पिंड होता. त्याचेच तंतोतंत अनुसरण गुरूजी परंपरेला वंदनीय मानून एकनाथ आव्हाडांनी बालसाहित्य निर्मितीतून सिद्ध केले आहे. कवी-लेखक एकनाथ आव्हाडांच्या व्यक्तिमत्त्वातून आणि त्यांच्या शिक्षकी बाण्यातून, बालसाहित्याच्या निर्मितीतून मूल्यशिक्षणासोबतच आधुनिकता आणि वैज्ञानिकता याही दृष्टिकोनातून त्यांचे बालसाहित्य- बालकविता; शिक्षण आणि संस्काराची उत्तमोत्तम शिकवण देते. जीवनाकडे सकारात्मक, नवनिर्मितीशील वृत्तीने पाहण्याचा सुयोग्य संस्कारशील दृष्टिकोनही, समाजातील बालमनांवर रुजवण्याचा कवी प्रयत्न करतो. समाजात विधायक आणि रचनात्मक दृष्टिकोनाचा वारसा पुढे नेणारे नागरिक समाजात बालकांमधूनच तयार करण्याचे राष्ट्रीय कार्य; कवी-लेखक एकनाथ आव्हाडांनी केले आहे. जिज्ञासेतूनच मुलांच्या व्यक्तिमत्त्वाचा विकास होत असतो. त्यांची विचारधाराही तयार होते. या जिज्ञासेला जर वेळीच प्रतिसाद मिळाला नाही, तर मुलांची शिकण्याची इच्छाच नाहीशी होईल. त्यांच्या व्यक्तिमत्त्वाचा विकासही खुंटेल, हे विकासाचे सूत्र श्री एकनाथ आव्हाडांनी डोळ्यांसमोर ठेवून मुलांच्या जिज्ञासेची, ज्ञानाची भूक कशी भागेल? याकडे कटाक्षाने लक्ष दिल्याचे दिसते. बालकांची नाळ आधुनिक विचाराशी जुळली पाहिजे, तो बुरसटलेल्या विचारांपासून चार हात दूर राहिला पाहिजे. त्याच्यामध्ये नैतिक मूल्यांची पेरणी करतानाच वैज्ञानिक दृष्टिकोनही अधिक सकसपणे रुजला पाहिजे. निसर्गाशी आणि पर्यावरणाशी मुलांचा सुसंवाद असतो. आभाळाचा फळा ( संस्कारक्षम कविता ) - आई बोलते छान, उंदराची फजिती, माझा नवा दोस्त, आभाळाचा फळा; गंमत गाणी ( जोडाक्षरविरहित कविता ) - चिऊताई, झाडाचे बोल, सरीवर सरी, घडी कपाट; अक्षरांची फुले ( निखळ आणि निर्मळ आनंद देणाऱ्या कविता ) - रंगांचे भांडण, पुस्तक माझ्या हाती, अभ्यास आपण करू, पावसाचे गाणे; बोधाई ( उद्‌बोधक कथाकविता ) - खोटे आश्वासन, विजयाची तयारी, गाऱ्हाणे, संताप; तळ्यातला खेळ ( आनंद वाटणारा मित्र ) - सुट्टी झाली सुट्टी, चिन्हांचा खेळ, आनंदाचे गाणे, ताईगिरी; मज्जाच मज्जा ( आनंदाची पेरणी करणाऱ्या कविता ) - पहिल्या नंबराची जादू, आजीचा सहवास, गणूचा अभ्यास, पोपटाची गोष्ट; पंख पाखरांचे ( जोडाक्षरविरहित बालकविता ) - फुलं चला वेचू, सूचना, माझी वही, माझी सायकल; हसरे घर ( मनी आनंद रुजवणाऱ्या कविता ) - ऐकूया जरा, टीव्हीचे वेड, आईचे बाळ, रेडिओ आमचा दोस्त मजेदार कोडी ( मनोरंजनातून ज्ञानाचा काव्यमय खजीना ) - एकूण ८ मजेदार कोडी; खरंच सांगतो दोस्तांनो ( वयाबरोबर वाढणाऱ्या कुमारांसाठी ) कहाणी एका कवितेची, नवी दिवाळी, आनंदाच्या गाठीभेटी, ध्यास. आव्हाडांच्या समग्र बालकविता-बालकथाकविता-बालकोडी हे सर्वच बालसाहित्य-कुमारसाहित्य हे आबालवृद्धांना भावणारे आणि ज्ञानाने समृद्ध करणारे आहे. बालकांसह सर्वांनाच आनंद देणारी अनमोल अशी बालरत्नांची बालसंगीताची सौंदर्यशील खाण आहे. तात्पर्य; आभाळाचा फळा, गंमत गाणी, अक्षरांची फुले, हसरे घर, पंख पाखराचे, तळ्यातला खेळ, मज्जाच मज्जा, मजेदार कोडी हे सर्व बालकाव्य सर्वांसाठीच बोधाई मय आहे. रंजकही आहे. रमणीयही आहे. आनंदरसाची निर्मितीही आहे. जीवनात सदासर्वकाळ आनंदाची धून छेडणारे संगीत काव्यही आहे. खरेतर कवी एकनाथ आव्हाडांच्या बालकविता म्हणजे सर्वकाळ सर्वांसाठीच आनंद गाणी म्हणूनच आपल्या भावविश्वात कालातीत निनादत राहणार आहेत...

# 'आपल्याला शेत आहे' याचा काय अर्थ घेतो आपण?

## संयमाचा परीघ





चित्र : बाबूराव पाटील, भोकर

प्रा. डॉ.मुकुंद राजपंखे
संपर्क क्र. 9881294226

भाग : २८

आधुनिक केसरी

**'आपल्याला शेत आहे' याचा अर्थ... 'ग्रामिण संस्कृतीच्या संदर्भानं गावात, पाहुण्या-रावळ्यात आपली 'इज्जत' आहे'. 'रानाचा सातबारा आहे'... अर्थात जमीनीच्या मालकी हक्काचा दस्तैवज आहे, जो गहान ठेवून अडीनडीला बॅंकेकडून, खाजगी सावकाराकडून छोटं मोठं कर्ज काढायला, हातऊसणं करायला 'तारण' आहे. अडल्या-नडल्या नातलगाची, मित्राची जमानत घेण्याइतकी ऐपत आहे. 'आपल्लाला वावर आहे' याचा अर्थ... वाव आहे, लेकरंबाळं उजविण्याच्या बैठकीत मान खाली घालायचं कारण नाही, लेकरु शिकलं नाही म्हणून, करील काम, गाळील घाम, उपासी मरणार नाही. राग वैताग डोईजड झालाच तर जाईल रानात, गुराढोरांसोबत वैरण काडी करताना बोलंल, मन मोकळं करील, हालकं होईल मन. 'रान आहे' याचा अर्थ... चार पावलं चलणं होतं राहील रोज, एखाद दुसरी चक्कर हानील रानात आणि चार दोन किलोमिटर चलन्यानं चरबी साठायची नाही अंगभर. 'रान आहे आपल्याला' याचा अर्थ... मुगाच्या शेंगा आहेत, तुरीच्या शेंगा आहेत, भुईमुगाच्या शेंगा आहेत, वांगे, हिरव्या मिरच्या, पालेभाज्या आहेत, चवळी-भेंडराचा पटा पेरता येईल. 'आपल्याला शेत आहे याचा अर्थ येळवशीला आपल्या आपल्या रानात पुजा करुन आंबिल पिण्याची सोय आहे चार शेजा-या पाजा-यांसह, स्नेही-सन्मित्रांसह.**

आपल्याला रान आहे याचा अर्थ... बसायला जागा आहे. घरची भाजी-भाकर आहे किमान. आपल्याला शेत आहे याचं समाधान आहे. या समाधानाची किंमत किती ठरवायची ? या आनंदाची किंमत कशी मोजायची ? या दृष्टीनं शेताकडं आपण बघीतलेलं नाही कधीच. आपण शेतीकडं सकारात्मक नजरेनं बघण्याची आवश्यकता आहे. आपण जी शेती करतो त्या रानाचा प्रकार काय ? आपली जमीन ओलिताची की कोरडवाहू ? बागायती मळ्याची, माळव्याची की केवळ खरीपाची ? तळ्याखालची की तळ्याच्या भकीची ? नदी काठावरली, विहिर असलेली, बोअर असलेली की असली कसलीच पाण्याची सुविधा नसलेली ? बारमाही पिकणारी की खरीप-रब्बीचीच की फक्त खरिपाची ? काळीभोर की पांधरी शिपट ? चिबडाची आहे की वापस्याची ? पाणी धरून ठेवणारी की लवकर निचरा होणारी ? उगवन क्षमता असलेली आहे की नसलेली ? माती पाणी परीक्षण केलं आपण कधी आपल्या वावराचं ? लाईटची व्यवस्था आपली आपण केलेली की अशी तशीच ? बईल-बारदान्याची आहे की ट्र्याक्टरनं पेरणी-रासणी-खोडकी-नांगरणी करणारी ? पारंपारीक आवजारानं कसलेली की यंत्रा-तंत्रांनी सुधारीत ? मालकीचे आहेत यंत्र की परस्वाधीन ? पारंपारीक सेंद्रीय खताची की रासायनिक बी-बियानं-खतावर उपसलेली ? दुधा-दुपत्याच्या, कोंबड्यांच्या, जनवारांच्या खाता-मुताची की शेळ्या मेंढ्यांच्या लेंढ्यांनी भरणपोषण केलेली ? 'फक्त शेती एके शेती' अशी केवळ अंगमेहनतीवर तारलेली की शेतीला पूरक जोडधंदे असलेली ? स्वतः कधी कास धुवून धारा काढलेली की धु-यावरुन गळवट फेसाटलेलं दुधाचं कॅंड गड्याकडून घेऊन शहर गाटणारी ? कसला, शेतीचा प्रकार कसला आहे आपला ? घरचं बाई माणुस तिफणीला मागं मोगं धरुन खत पेरायला येतं की खता-बीयाची पेरणीबी ट्र्याक्टरनंच ? आपल्या घरच्या बाई-माणसाचा हात कधी शेणाला, मातीला लागलेली की रोजानंच बाया माणसं लावून खुरपणं-टुरपणं केलेली ? तिवड्या भवती मळण हानून वावडीवर मदन उधळील्याचा अनुभव पाठीशी असलेला मालक आणि खाली हातनीला बसलेली मालकीन असं गोड चित्र असलेली की सोगा धरुन खुरपणाच्या बायकांच्या मागं ढिगलं गोळा करत रान मोकळं छॅक करणारा मालक ? कोण, आहात कोण आपण शेतीचे ? कुठं जातो आपला शेतमाल ? आडकीला ? बिटाला ? आठवडी बाजाराला ? जहाजानं, विमानानं परदेशात ? काय आहे मालाचा प्रकार, मालाचा दर्जा ? तुम्ही, तमची बायको, तुम्ही तुमच्या लेकराबाळांसह कधी शेतमाल घेऊन आठवडी बाजारात गेलात की मनुष्यबळ नाही म्हणून, कोण बसा रस्त्यावर या लोकलज्जेस्तव सकाळी बिटाला देऊन टाकता गुत्तच ? तुम्हाला धार काढता येते जरशा गायींची, जाफराबादी म्हशींची ? जनवारं बांधुन बघितलीत कधी दावनीला ? बनीम रचून बघितलीय ? बनमीच्या पेंड्या उपशिल्यात कधी भीज-पावसात ? केलीय कधी दावनीला वैरण-काडी ? इच्यानं फनका मारलाय कधी ? सोड-बांध केली कधी जनवारांची ? शिंगानं माती उकरीनारं खोंड बघीतलंय कधी ? शेपुट वर करुन उधळणा-या कारवडी बघीतल्यात ? काय माहिताय शेतातलं म्हणून तुम्हाला शेतकरी म्हणायचं ? आपल्याला आपलं रान कसं आहे, काय आहे, त्यात काय येतं ? येतं तर तेच का येतं ? दुसरं कांही या साठी काय करावं लागंल ? शेतीच्या काय यौजना आहेत सरकारच्या ? त्याचा कांही घेता येईल का फायदा आपल्याला आणि सुधारीत करता येईल का शेती आपल्याला ? जे सगळेच करायलेत तेच करावं आपण की बघावा कांही दुसरा विचार करुन ? नवा कांही प्रयोग करता येईल का आपल्या वावरात ? अशा किती तरी प्रश्नांनी भंडावून सोडलंय का तुम्हाला ? आहे का रानात काम करणं कमीपणाचं ? आपला पायंच वावराला लागला नाही, हातंच मातीला लागला नाही तर मया तरी कशी लागंल रानाची ? याच वर्षी दोन चार महिन्या पुर्वी सन्मित्र कविवर्य राजेश रेवले यांच्या शेतात कृषी महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. बाबासाहेब ठोंबरे सरांसोबत जाण्याचा यौग आला.रविवारची सुट्टी होती आणि जरा तरी जिवाला विश्रांती व्हावी म्हणून मुद्दामुन वेळ काढला होता. महोदयांनी यापुर्वीही एक-दोनदा शेतीबद्दल चर्चा करत असताना त्यांच्या शेतीमातीच्या कविता गांभिर्यानं ऐकवल्या होत्या.या निमित्तानं महोदयांच्या गावी परळी गंगाखेड रोडवरील नैकोटा या गावी असलेल्या रानात जाण्याचा यौग आला. वडीलोपार्जीत जमीन आहे छान नदीच्या काठावर. भावा-भावांच्या वाटणीत महोदयांनाही आली वाटून आणि महोदयांच्या थोरल्या भावांनी आपापले घरंही मग शेतातच हालवले. आता ते दिवसरात्र मेहनत करत रानात असतात.' शेती एके शेती' हा पाढा गिरवतात. शेतात जायला पांदण रस्त्यावर मुरुम टाकून दोन-चार चाकी वाहणं ये-जा करु शकतील असं छान केलं आहे सगळं.महोदय अंबाजोगाई मुक्कामी कृषी महाविद्यालयात प्रशासकीय कार्यालयात नौकरीला असतात. महाविद्यालयाला पाच दिवसांचा आठवडा आहे. त्यामुळं सदगृहस्थ शनिवार रविवार रानात म्हणजे रानातच सापडणार. स्वतःला आपल्या वावराचा बारिक परिचय आहे आणि शेतीमातीचा पोत माहीत आहे मुळातून, सखोल आभ्यासही आहेच शेतीचा, त्यामुळं दोनही दिवस वावरातुन पाय बाहेर निघणं नाही महोदयांचा त्यामुळं रानातच छान नवीन पत्रांचा शेड मारुन निवारा केला आहे. दारात हिरवीगार झोपाळा होतील अशी सावलीची झाडं लावलीत. स्वयपाक करता येईल अशी सगळी व्यवस्थाही क्रमप्राप्तच. शेताच्या बांधाला खेटून खळाळणारी नदी आहे आणि याहून मोठा आनंद तो कोणता की याच नदीत वडीलोपार्जीत विहिरही आहे जिचं पाणी बारामहिने आटण्याचा विषयच नाही.रानं भिजतात भावंडांची आळीपाळीनं आणि सोबतीला बोरही घेतले आहेत त्यामुळं उन्हाळ्याची झळ पोंचण्याचं कारण नाही. रानात गेलं की पाटीवरुन हात फिरवला की आनंदून जाणारी जणवारं आहेत. सर आले म्हणून हमखास गावातुन भेटायला येणारे सजन- दोस्त आहेत.थोरले भाऊ, भावजया, पुतने-सुना, नातवंडं आहेत. काय नाही रानात महोदयांच्या ? सदगृहस्थाला कसं करमंल सुट्टीच्या दिवशी शहरात असं सगळं रानात उपलब्ध असताना ? मनानं प्रचंड हळवा माणुस आहे. वसंतराव नाईक कृषी विद्यापिठाच्या 'कृषी सोबती' या मुखपत्रातून मधून दर आठवड्याला गावाकडल्या अस्सल ग्रामिण कवितेचं सदर सुरु आहे जेवनासाठी समाविष्ठ केलं.माय-माऊल्या कोंड्याचा मांडा करंत म्हणजे काय याचा अनुभवही आम्ही घेतला. प्रसंग निभावून नेणं काय असतं हे ही छान कळलं सगळ्यांनाच. मोठा आनंद वाटला. हे असंच सगळं आपल्या वावरात शेड वगेरे केलेले आमचे सन्मित्र प्रा.पांडुरंग काशीद सरांनीही आपल्या गावी बोंबल्या मारुतीजवळ नदीच्या काठावर विहिर घेऊन उभं केलं आहे, आमचे स्नेही प्रा विलासराव शिंदे, मुख्याध्यापक राजाभाऊ शिंदे आणि संजीव शिंदे या व्याही गणगोतानं आपल्या कोष्टगाव या आमच्या आजोळी गावा शेजारी महादेवाच्या मंदीरा शेजारी नदीकाठी विहिर घेऊन बोर घेऊन फुलवलेली शेतीही अशीच आनंददायी आहे. या सगळ्यांच्या शेताला झुळझुळणा-या नदीचा काठ आहे, काठावर विहिरी आहेत आणि सोबतच बोर घेतलेले आहेत, अशा वेळी या सगळ्यांची आठवन होणं स्वाभाविक आहे. आमचे रेवले सर, काशीद सर आणि आमचं शिंदे गणगोताची, नाही तर अडचन.पिढी-दरपिढी सगळेजन कर्तुत्ववान निघतीलं याचा काय भरवसा ? पिढी-दरपिढी सगळेजन रानंच कसतील याची तरी कुठं आहे शास्वती ? पिढी-दरपिढी सगळ्यांनाच लागतील नौक-या याची तरी कोण देणार गॅरांटी ? बदल निसर्गाचा नियम आहे. शेती तर हमखास निसर्गाच्या आणि सरकारांच्या लहरीपणापुढं हतबल झाल्याचं फेसबुकावर नियमित वाचण्यात येतंच आपल्या. संवेदनशीलतेला अवघडलेपण येणं स्वाभाविक आहे. आज-काल सेवानिवृत्त झालेले बहुतेक सगळेजन आज एक तर शेतात रमलेत नाही तर शहरांनी कांही छोटीमोठी दुकानं टाकलेत. शेतीचा नाद असलेला माणुस वावराशिवाय जगु शकत नाही. आज गावी एखादा एकर जरी वावर घ्यायचं मनलं तर पहिलं तर विकायलाच कोणी तयार नसतं आणि कुणी घेणारं लईच नेटावर आलं तर मग पंधरा-वीस हजार रुपये एकर शिवाय चर्चाही सुरु होत नाही.इव्हन शेती



महोदयांचं.शेती संबंधीत नौकरी आहे, शेतीशीच संबंधीत कविता लिहिण्याचा छंदही आहे. लडीलोपार्जीत जमिनीत काम करायची लाज वाटंत नाही. कालामानानुसार पिकं घेतात आणि आनंदानं राहतात. आम्ही महोदयांच्या रानात गेलो तेंव्हा शेता शेजारची नदी वाहती होती.विहिरीतही नदीचं पाणी पडंत होतं.खरीपाची सुगी होवून रानं रब्बीसाठी तयार करुन पेरणीचे कामं सुरु होते. तुरी फुलोऱ्यात होत्या, लगडंत चालल्या होत्या या सिजनमधे लवंडतील बहरानं येवढा आनंद दिसून येत होता रानात. छान, नवं, आगळं-वेगळं कांही दिसलं आवडं की जपून ठेवण्याचा नाद असल्यामुळं नकळत वावराचे छान फोटो काढले. शिवार फेरीचं शुटींग करत करत छान रस्त्या शेजारच्या निवाऱ्याला आलोत.तोवर रेवले ताईनी सगळ्यांच्या दुपारच्या जेवनाची छान तयारी कलेली होती.सोबत नैकोट्याचे सरपंच महोदयही मैत्रीखातर आले होते उपवास असतानाही, हा मोठा आनंद आहे.रेवलेताईंनी तात्काळ बेसन हाटुन लोणच्यासह सरपंच महोदयांना आमच्या सोबत सन्मित्रांची शिवार श्रीमंती पाहून-ऐकून क्षणभर आपल्याला वावर नाही याचं भलतं वाईट वाटलं. परत येताना रेवले सरांच्या थोरल्या भावानं चहासाठी बोलावलं. छान आदरातिथ्य आणि आपुलकीच्या गप्पा-गोष्टी झाल्या. त्यांचा मोठा मुलगा गंगाखेडला एमपीएस्सीची जोरात तयारी करतो आहे. बोलताना या अशा 'वावरामुळं जगणं आनंदात आहे' हा उद्‌गार अनेकदा त्यांच्या तोंडुन ऐकण्यात आला. 'मन रमतं रानात' ही भावना अनेकदा जानवली त्यांच्यानसहवासात. घरातले सगळे माणसं रानातंच आहेत आणि रानातंच रमलेत. वडीलांचे रानं वारसा हक्कानं मुलांना मिळाले. घरं मिळालं पण गावात भावंडांची सगळी बिर्हाडं कांही व्यवस्थित राहू शकत नाहीत, पुरेशा जागे अभावी हे उमगल्यावर त्यांनी रानात वस्ती थाटली. पुढची पिढी पुन्हा वाटण्या करणार. घरं रानं जे वडीलोपार्जीत आहेत त्यांची वाटणी होत रहाणार. बारीक बारीक टुकड्यांनी रानं वाटंत रहाणार आणि वावरंच केवळं भाकरीचं साधन राहिलं की झाली अडचन. भरभरुन पिकलं तर बरं अजीबातंच परवडंत नाही म्हणणारे लोकही वीस पंचेवीस लाख रु एकरनं एखादा एकरचा टुकडा जरी विकायला काढायचा मनलं तरी नाही म्हणतात. मुळात ज्यांना रानाशिवाय दुसरा कुठलाच आधार नाही अशा अल्पभूधारक शेतकऱ्यांचा प्रश्न मोठा बिकंटच आहे, या बद्दल कसलीच शंका नाही. अशाही शेतीत जरासा पाण्यानं हात दिला तर नियमीत शेतीसह भाजीपाला,फळबागा, दुग्धव्यवसाय, कोंबडीपालन, पुरक जोडधंदे असलेली मंडळी टिकुन आहेत. निव्वळच मरमुमाडाच्या वावरात बाजरी आणि कुसळाशिवाय काय उगवणार आणि खरीपाला एकदाच. अशाही रानावर तळ्याचा गाळ टाकून माळं वहितीखाली आणलेत माणसांनी, हे ही तितकंच खरं. एक मात्र खरं... अंगमेहनत विसरलेल्या माणसांना शेतीच काय कुठलंही काम जडंच जातं.

**(लेखक मराठी भाषेचे साहित्यिक तथा इंग्रजी भाषा आणि वाङमयाचे संशोधन मार्गदर्शक आहेत.)**

# रणझुंजार रणरागिणी राष्ट्रमाता अहिल्यादेवी होळकर

आधुनिक केसरी

गणेश खाडे, 9011634301

नारी शक्तिची ताकद तात्कालिक साम्राज्याचे शत्रु यांना दाखवत धर्माच रक्षण करताना स्वतःच नेतृत्व आणि कृर्तृत्त्व सिद्ध करत आपल्या तलवारीच्या सामर्थ्यवर विश्वास ठेवत राज्यकारभार करताना लोकाभिमुख योजना , राबविण्यात देशभरात ज्यांच्या नावाचा डांका निर्माण झाला अशा महान तेजस्वी रणझुंजार रणरागिणी म्हणजे राष्ट्र माता अहिल्याबाई होळकर होय.हिंदवी स्वराज्याचे संस्थापक छत्रपती शिवाजी महाराज यांनी हयात असतांना सांगितलेला शब्द त्यांच्यानंतर मराठा साम्राज्यातील प्रत्येक व्यक्तीने आदेशप्रमाण म्हणून पाळला मग स्वराज्यासाठी बलिदान देणारे छत्रपती संभाजी राजे असो किंवा त्यानंतर औरंगजेबाला जेरीस आणणारी रणरागिनी शिवरायांची सुनबाई महाराणी ताराबाई त्याच प्रमाणे मोघलांच्या घोड्यांनाही जे पाण्यात दिसत होते .असे संताजी-धनाजी या सर्वांनी छत्रपती शिवाजी महाराज यांचा शब्द हा आदेश मानूनच आपले जिवन स्वराज्य रक्षाणासाठी समर्पित केले होते हाच वारसा पुढे चालवत असताना पेशवाईतील मराठा साम्राज्याचे सरदार आणि नंतर पुढे चालून इंदोरमध्ये स्थायीक झालेले मल्हारराव होळकर यांनी आपल्या कर्तबगारीने अनेक पौराणिक मंदिरे परकीय आक्रमकांपासून रक्षण केले .त्यानंतर त्यांच्या सुनबाई अहिल्यादेवी यांनीही हाच वारसा पुढे चालू ठेवत शस्त्र चालवून परकीय सत्तांना धाकात ठेवले त्याबरोबरच शास्त्र जपत हिंदु संस्कृती जपण्यासाठी अनेक मंदिरे, नदीघाट, धर्मशाळा बांधल्या आणि हिंदु संस्कृतीला जिवंत ठेवले व हिंदवी स्वराज्याचा कळस उभा केला. कर्तुत्ववान, धर्मपारायण, कार्यक्षम,उचित न्याय दान साठी सुप्रसिद्ध असणार्‍या तसेच अनेक मंदिरे निर्माण करणाऱ्या तसेच अनेक नदीघाट, धर्माशाळा बांधकाम करून एक नव्या युगाची सुरुवात करणार्‍या परम प्रतापी म्हणून आहिल्यादेवी होळकर यांचा नाव सुवर्णाक्षरांनी लिहिल जात. त्या इंदोर संस्थानाच्या प्रमुख राष्ट्र माता अहिल्यादेवी होळकर या शुर वीर कुशाग्र बुध्दी, महाप्रतापी तसेच न्याय प्रिय, धर्म रक्षक, आणि विशेष म्हणजे महिला असताना सुद्धा आपल्याला मध्ये असणारे नेतृत्व गुण सिद्ध करत देशाभरात आपलं नावलौकिक केले .महाराष्ट्रातील चौंडी ता.जामखेड जिल्हा अहमदनगर येथे त्यांचा जन्म 31 मे 1975 मध्ये झाला .तसेच पुढे चालून त्यांचा इंदोर संस्थानाचे महाप्रतापी मल्हारराव होळकर यांचे चिरंजीव खंडेराव होळकर यांच्याशी त्यांचा विवाह झाला. मल्हारराव होळकर यांनी आहिल्यादेवी यांना प्रशासन तसंच युद्धा कौशल्यात निपुण घडवले. अहिल्याबाई होळकर यांनी आपल्या कार्यकाळात देशातील आजचे अनेक ज्योतिर्लिंगा सह अनेक महत्वाची मंदिरांचे पुनर्जीवन केले . ज्या मध्ये द्वारका, अयोध्या, पुष्कर, ऋषिकेश, जेजुरी, पंढरपूर,गया, उज्जैन, परळी वैद्यनाथ, सोमनाथ , वाराणसी येथील काशी विश्वनाथ, ओंकारेश्वर, मल्लिकार्जुन, औंढा नागनाथ,विष्णुपाद,महाकाळेश्वर अशा अनेक मंदिराचा समावेश या मध्ये होतो. राष्ट्र माता अहिल्यादेवी होळकर यांनी आपल्या कार्य काळात अनेक प्राचीन काळापासून अस्तित्वात असलेल्या परंतु विविध परकिय आक्रमणापासून नासधुस झालेल्या बहुतांशी मंदीराचे जीर्णोद्धार करण्याचा ऐतिहासिक निर्णय देशाच्या संस्कृती इतिहासाचा वसा आणि वारसा जपण्याचा जो अलौकिक अभिनव प्रयत्न केला आहे तो कौतुकास्पद असुन त्याच कालखंडात जलस्त्रोत बळकटीकरण असो कि पाणी साठे निर्माण करण्याची अभिनव कल्पना त्यांनी आपल्या कल्पकतेने भारत देशातील विविध पवित्र नदी तीरावर ज्या ज्या ठिकाणी पवित्र तीर्थक्षेत्र म्हणून प्रख्यात आहेत त्या ठिकाणी नदी घाट बांधले व देशाच्या वेगवेगळ्या भागात धर्म शाळा सुद्धा बांधल्या त्याच प्रमाणे पाणीपुरवठ्यासाठी अनेक चिरंबदी विहीरी, पाणवठे बांधले एक आदर्श शासक कसा असावा याच मुर्तीमंत उदाहरण त्यांनी आपल्या कार्यातून जगासमोर ठेवले.

# आठवले with आठवलये



भीमराव सरवदे
संपर्क क्र. 9405466441

आधुनिक केसरी

**यापूर्वी आठवणीचे पक्षी, बलुतं, उपरा, उचल्या, माझ्या जल्माची चित्तर कथा, कार्यकर्ता, अम्रान, मला उध्वस्त व्हायचंय इत्यादी मी वाचलेल्या आत्मचरित्रामधून वेशीबाहेरील जगण्याचा आक्रोश, संघर्ष आणि व्यवस्थेविरुद्धचा एल्गार ठासून भरलेला आढळून येतो. डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी लिहिलेले "वेटिंग फॉर ए विजा" हे आत्मचरित्र वाचल्यावर तर इथल्या कर्मठ चातुर्वर्ण्य व्यवस्थेने अस्पृश्य समजल्या जाणाऱ्या जातींना माणूस म्हणून जगण्याचे सर्व हक्कच कसे काढून घेतले होते, हे स्पष्ट होते. हा या देशाचा काळा इतिहास आहे. दुष्यंत आठवले यांचे आत्मचरित्र मात्र वेगळ्या धाटणीचे असल्याचे पदोपदी जाणवत राहते.**

**(मागील अंकावरून)** शेतात कधी काय पेरायचे याचा शास्त्रशुद्ध अभ्यास करून चिकू, पपई, मोसंबी व केळीची लागवड केली. केळीचा हंगाम सुरू असताना महाराष्ट्र शासन फलोत्पादन विभागाचे संचालक जैन देशमुख यांनी शेतावर भेट दिली. केळीचे क्रॉपिंग सुरू होते. शेतीचे शास्त्रशुद्ध प्रयोग पाहून देशमुख थक्क झाले. केळीच्या एका घडाचे वजन 52 ते 54 किलो पाहून तर त्यांचा विश्वासच बसेना कारण जगात सर्वाधिक केळी उत्पादन जळगावमध्ये होते. तेथील घडाचे वजन 45 ते 46 किलो पेक्षा जास्त भरत नाही. हे सर्व प्रयोगशीलतेस आधुनिकतेची जोड देऊन केलेल्या शेतीची किमया असल्याचा अभिमान वाटत होता. शेतीवरील सालदार शेख कदीरच्या कुटुंबीयांशी माझ्या कुटुंबियांचे जवळच्या नाते-संबंधाला लाजवेल असे घनिष्ट संबंध होते. शेख कदीरच्या मुलीच्या लग्नात आमचे कुटुंब स्वतःच्या घरचे लग्न समजून वावरत होते. सामाजिक बांधिलकी समजून शेखच्या मुलीचे लग्न माझ्या शेतातच करून संपूर्ण खर्च उचलला. या कुटुंबास कधीच सालदाराप्रमाणे वागवले नाही. त्यांच्या सर्व सुख-दुःखात अगदी धावून जात असे. लेखकाने व्यक्त केलेली सामाजिक बांधिलकी अनुसरणीय आहे. पुढे 2011-2012 या वर्षीच्या राज्यातील शेतकऱ्यांची देशाबाहेरील अभ्यास दौऱ्याकरिता निवड झाल्याची कृषी संचालकाद्वारे कळविण्यात आले. या दौऱ्यात युरोप खंड ग्रुप तीन ( जर्मनी हॉलंड, फ्रान्स व स्पेन ) या देशांना भेटी द्यायच्या होत्या. या निमित्ताने पहिल्यांदा विमान प्रवास घडला. या दौऱ्यात महाराष्ट्रातील 35 शेतकऱ्यांचा सहभाग होता. या दरम्यान असे वाटले की, यशस्वी होण्यासाठी नुसते शेतकरी असणं पुरेसं नाही, त्याबरोबर उद्योजक-शेतकरी, व्यापारी-शेतकरी, अभियंता-शेतकरी, जोडधंदा करणारे शेतकरी अशी बिरुदं असणे गरजेचे आहे. या युरोप दौऱ्यात हॉलंड येथील फुलांच्या बाजाराने खूप प्रभावित केले. या बाजारात जगभरातून विमानाने फुले येतात आणि इथूनच पॅकिंग होऊन जगभरात जातात. संपूर्ण बाजार वातानुकूलित असून जगभरातील व्यापारी आपापल्या जागेवर बसून लॅपटॉपवरच फुलांची बोली लावतात. आपल्या देशातील बाजार समितिकडून शेतकऱ्यांची पिळवणूक कशी करतात याचे वाईट वाटते. दलाल नावाचा प्रकार भारतातील शेतकऱ्यांच्या विकासातील मोठी धोंड आहे. याकडे सरकारही फारसे लक्ष देत नाही. अशी खंत लेखकाने व्यक्त केलेली आहे. हॉलंड येथील जगप्रसिद्ध बाजारात शेतकरी आपल्या फुलांची किंमत स्वतः ठरवतो. आपल्या मालाचा मालक शेतकरीच असतो. भारतात सारे काही उलटे आहे. बाजार समितीत माल गेला की त्या मालाचा मालक अडत्या बनतो. शेतकरी मात्र उपरा ठरतो. हमाली, तोलाई, पट्टी ( दलाली ) अडत्याच ठरवितो. शेतकऱ्याचा सहभाग कुठेही नसतो. या सर्व उलाढाली आणि गाडी भाडे जाऊन उरलेला पैसा शेतकऱ्याच्या हातात पडतो. हे निरीक्षण खूप मौलिक आहे. शेतीच्या आधुनिक प्रयोगामुळे शासन दरबारी शहानिशा झाली. औरंगाबाद जिल्हा परिषद कृषी विभागाचा 2007-2008 या वर्षीचा प्रगतिशील शेतकरी पुरस्कार मिळाला. 2007 मध्ये महाराष्ट्र शासनाचा कृषी विभागाचा उद्यान पंडित हा पुरस्कारही मिळाला. औरंगाबाद येथे इंदिरा गांधी राष्ट्रीय विद्यापीठाचे ( इग्नू ) शैक्षणिक कार्यक्रम प्रसारित करण्यासाठी स्वतंत्र प्रसारण केंद्र उभारण्यात आले होते. आकाशवाणी केंद्राच्या कर्मचाऱ्यांनी या केंद्राच्या प्रसारणाची जबाबदारी घेण्यास नकार दिल्यावर 2006 ते 2014 या कालावधीत प्रसारणाची निर्विघ्न जबाबदारीही पार पाडली. शेतीत विविध प्रयोग करून झाल्यावर आता शेतीतून मन उठत चालले होते. उद्योगात स्थिरस्थावर होण्याची स्वप्न पडू लागली होती. शेतीतून काढता पाय घ्यायचा म्हणजे काळी आईशी गद्दारीच! याचे आत्मभानही होते. अशा द्विधेमध्येच नवीन कंपनी सुरू करण्याचा विचार पक्का केला. शेती विकून कंपनी टाकण्याचा निर्णय सर्व मित्र व नातेवाईकांना आवडला नव्हता. कुटुंबाची शेती बद्दलची आसक्ती वाढली होती. तसेही बिनधास्त जीवन जगण्याची सवय लागली असल्याने कंपनी टाकण्याचा निर्णय घेतला. विशेषता वयाच्या पन्नाशीनंतर घेतलेला हा निर्णय अनेकांना आश्चर्यचकित करणारा होता. मेटल लेझर कटिंगचा व्यवसाय सुरू केला. औरंगाबादमध्ये तेव्हा ही सोय उपलब्ध नसल्याने व्यवसाय चांगला चालला. यासोबतच एका छताखाली फॅब्रिकेशन, शेअरिंग, बेंडिंग ही कामे सुरू केली. 2020 च्या लॉकडाऊनमध्ये सर्व कंपन्या बंद होत्या. लेखकाच्या कंपनीने सरकारी रुग्णालयास बेड, स्ट्रेचर, आय व्ही स्टॅन्ड, साईड लॉकर आदी वस्तू बनवून दिल्याने एक दिवसही कंपनी बंद नव्हती. या उद्योगाशीलतेची दखल घेऊन जिल्हा उद्योग केंद्रातर्फे दिला जाणारा उत्कृष्ट लघुउद्योक प्रथम पुरस्कार 2018 लेखकाच्या वैशाली लेझर कंपनीला मिळाला. अपग्रेडेशन ऑफ टेक्नॉलॉजी या केंद्र सरकारच्या योजनेअंतर्गत जपान, जर्मनी व चीनचे दौरे करण्याची संधी प्राप्त झाली. जपानच्या दौऱ्यात बौद्ध धम्माविषयी केलेले निरीक्षणही महत्वपूर्ण आहे. बौद्ध धम्म हा जपानचा प्राणवायू आहे. त्यामुळेच जपानच्या माणसांत शील, सदाचार आणि सद्धम्माला अनन्य साधारण महत्त्व आहे. भारततला बौद्ध धम्म जपान मध्ये गेला. त्यांनी अंगीकारला म्हणून जपानची प्रगती झाली आहे. याबाबत ही भारत खूपच मागे आहे. सर्जनशील अभियंता, प्रगतिशील शेतकरी व यशस्वी उद्योजक या सर्वच क्षेत्रात आपला वेगळा ठसा उमटविल्यानंतर समाजासाठीही काहीतरी करावे म्हणून समाजातील सुखदुःखात सहभागी होऊन कुठलाही गाजावाजा न करता अनेकांना मदतीचा हात दिला. राजकारणातून समाज कारण करावे हे खुळही डोक्यात घुसले आणि 2004 मध्ये लोकसभेची निवडणूक लढवली. लेखक म्हणतात, लवकरच भानावर आलो आणि राजकारण डोक्यातून कायमचे काढून टाकले. आता अनेक संघटनांच्या माध्यमातून समाजसेवेची कामे करण्यात धन्यता वाटत आहे. प्रत्येक क्षेत्रात झपाटल्यागत काम करत असल्यामुळे घरी वेळ देता येत नाही. बारा बारा घंटे कामच करत राहिल्यामुळे घरी वेळ देता आला नाही त्यामुळे गृहिणी नाराज. ती म्हणते, आमचा संसार आपोआपच होतोय. आम्ही त्यासाठी काही करत नाही. यांना घराची फिकीर नाही. कधी शॉपिंग नाही. फिरायला घेऊन जाणे नाही. घरात काय लागतं यांना काहीच माहित नाही. एवढंच नाही स्वतःसाठी ही काही आणावे असे वाटत नाही. घरच्या कोणत्याही गोष्टीला हो नाही आणि बाहेरच्यांना ना नाही अशी तक्रार घरच्यांची असते! या आत्मचरित्र लेखनाने आठवले यांनी साहित्य क्षेत्रात भक्कमपणे यशस्वी पाऊल ठेवले आहे. या आत्मचरित्रातून असे कळते कि आठवले यांनी ज्या क्षेत्रात पाऊल ठेवले आहे त्यात त्यांनी शिखरच गाठलेले आहे. या निमित्ताने मनःपूर्वक अभिनंदन करून त्यांना असे सुचवावेसे वाटते कि त्यांनी यापुढेही त्यांच्यातला लेखक निष्ठेने जपावा. देखणे मुखपृष्ठ आणि उठावदार मांडणी यासाठी प्रकाशकाचे अभिनंदन केल्यावाचून राहवत नाही.

# असहमतीचे रंग : अशोक पळवेकर



किरण डोंगरदिवे
संपर्क क्र. 7588565576

आधुनिक केसरी

**अशोक नामदेव पळवेकर हे समकालीन वास्तवाचे वेगवेगळे प्रस्तर उलगडणारे आंबेडकरवादी जाणिवेचे कवी म्हणून मराठी साहित्यविश्वात ओळखले जातात. तसेच ते एक चिंतनशील समीक्षक म्हणूनही ख्यातकीर्त आहेत. १९८० सालापासून ते वेगवेगळ्या नियतकालिकांतून व साहित्यपत्रिकांतून सातत्याने काव्यलेखन करत आहेत. या दीर्घ कालावधीतील त्यांच्या काही निवडक कवितांचा (एकूण कविता १००) असहमतीचे रंग; हा त्यांचा काव्यसंग्रह अलीकडेच प्रकाशित झाला आहे. या काव्यसंग्रहातून सभोवतालच्या समकालीन वास्तवाचा एक व्यापक पट उलगडत गेलेला आहे. तसेच पळवेकरांच्या या कवितेतून सभोवतालच्या एकंदरीत मानवी जगण्याचे आणि समकालीन व्यवस्थेच्या वास्तवरुपाचे विवेकनिष्ठ चित्रण अगदी सहजीभावाने व चिंतनशील वृतीने आविष्कृत झालेले आहे.**

**(मागील अंकावरून)**
यांतील फारकत जगणारी पिढी या दोन पिढ्यांमधील बदलत गेलेली वृत्ती आणि त्यांच्या वाट्यास येत गेलेले वास्तव यांतील ताण झाडाच्या अस्वस्थतेतून कवीने कमालीच्या सामर्थ्याने अधोरेखित केला आहे. हा ताण आजच्या सभोवतालच्या वातावरणात माणसाला सामाजिक अंगाने अंतर्मुख करणारा आहे. प्रस्तुत काव्यसंग्रह वाचताना या संग्रहात कवींने विविध विषयांना स्पर्श केला आहे. त्या सर्व विषयांतून अस्वस्थ वर्तमान आणि परिवर्तनाची दिशा याबाबत कवीने केलेले लेखन अधिक गंभीरतेने व प्रखरतेने आले आहे, असे आपल्या लक्षात येते. तूर्तास देशात जे वातावरण आहे, ते लोकशाही व्यवस्थेला अत्यंत मारक आहे. भारतीय संविधान निर्मितीच्या काळात ज्यांना भारतीय संविधानाची निर्मितीच मान्य नव्हती, अशा लोकांच्या हाती केंद्रीय सत्ता एकवटल्यानंतर त्यांनी देशातील विद्यमान लोकशाही यंत्रणांचा गैरवापर करत लोकशाही व्यवस्थेलाच सर्वात मोठा धोका उत्पन्न केला. त्यातून मीडिया आणि न्याय यंत्रणा सुद्धा सुटली नाही. या यंत्रणा सत्तेच्या बटिक झाल्या. हे वास्तव समोर आणताना वर्तमान काळात मीडिया कसा विकला गेला आहे हे स्पष्टच केले आहे. हा मीडिया पिपांत मेल्या उंदरावर आणि अयोध्येच्या राम मंदिरावर बोलतो. परंतु जनसामान्यांच्या प्रश्नांकडे तो सतत दुर्लक्ष करत असतो है सत्य कवीने अधोरेखित केले आहे. तसेच सत्तेच्या बळावर आणि भांडवलाच्या जोरावर बदलत चाललेले न्यायव्यवस्थेचे आजचे भ्रष्ट वर्तनरूप लक्षात घेतानाही कवीने थेट न्यायदेवतेलाच प्रश्न केला आहे. तो प्रश्न लाख मोलाचा आहे. ते म्हणतात

माझी अनाथ फिर्याद कुठल्या कोर्टात नेऊ की,
न्यायासाठी नागवलेला मीच कायदा हातात घेऊ... ?

या प्रश्नाने सामान्य माणसाच्या मनातील विद्रोहाची भाषाच या कवितेतून प्रकट झाली आहे. अशी भाषा बोलणारे लोक कमी आहेत. कारण दडपशाहीचे तंत्र सररास अवलंबिले जाते, असेच आजचे चित्र आहे. सभोवतालच्या वास्तवाचे कवीने विवेकवादी अंगाने काही कवितांतून मांडलेले चिंतनही अतिशय मौलिक स्वरूपाचे आहे. त्यात महात्मा गांधी : एक निमित्त ओ जीनियस रोहित वेमुला जोतीराव गोविंदराव फुले कबीरा सिद्धार्थ गौतम बुद्ध डॉ. माईसाहेब आंबेडकर रमाई डॉ. बाबासाहेब आंबेडकरांवरील तीन कविता, ब्रेख्त पाब्लो फिडेल जॉर्ज यांच्यासह हिटलरची चरित्रकथा इत्यादी कवितांचा समावेश करता येईल. या सर्व कवितांमधून कवीने संवादात्मक शैलीने चिंतनात्मक पातळीवर मांडलेले वास्तव वाचकाला उपरोध आणि उपहासाच्या अंगाने अंतर्मुख करणारे आहे. व्यक्तिविषयक काव्यातून कवींचा काव्यविचार जसा आपल्यला भेटतो, अगदी त्याच पद्धतीने सीरिया खैरलांजी अशी ठिकाणं आणि त्यावरील काव्यसंवाद माणसाला अवस्थ करणारा ठरतो. व्यक्ती किंवा ठिकाणे याबाबत लिहिलेल्या कवितांतून खऱ्याअर्थाने शोषणकर्ते आणि शोषित यांच्या वृत्ती-प्रवृत्तीवर कवीने सडेतोड हल्ला चढवलेला आहे. मात्र बरे झाले गांधी तुम्ही आज नाही, अन्यथा व्यवस्थेने तुम्हालाही फासावर लटकवले असते किंवा बरे झाले कबीरा आज तू नाहीस. अन्यथा तुलाही देशद्रोही ठरवले गेले असते, असे जेव्हा कवी म्हणतात तेव्हा त्यातून आपल्याला एका कालस्वभावाचे व हुकुमशाही प्रवृतीचे भयंकर दर्शन घडते. वर्तमान काळातील अनेक बाबींवर / घटना-प्रसंगांवर अशोक नामदेव पळवेकर यांनी अतिशय सूक्ष्मपणे व वेधकपणे या कवितासंग्रहात प्रकाशझोत टाकला आहे. व्यंग आणि उपरोध यांचा वापरही या कवितेत लीलया केला गेला आहे. गावात आलेल्या मदाऱ्याची गोष्ट राजकारण दे आर टोटली मिस्फीट फॉर दॅट कोण पेटवतोय देश जंतरमंतर हा देश विकणे आहे अशा विविध कवितांमधून आजचे राजकारण / त्यांची राजकीय खेळी, संविधानाला नाकारणारी वृती आणि लोकशाहीचा गळा घोटणारी प्रवृत्ती तसेच भांडवलशाहीचे मांडलिकत्व स्वीकारणारी सत्ता या सर्वांच्या संगनमताने देशात चाललेली कट कपट कारस्थाने कवीने बेछूटपणे उघड केलेली आहेत. जसे

पुराणवस्तू संग्रहालयातले
भुसा भरलेले प्राणी आणि कागदावरची लोकशाही
दोन्ही सारखेच असतात लोकांसाठी

-अशा शब्दात कवीने भारतीय लोकशाहीची अवस्था अधोरेखित केली आहे. खरे म्हणजे ही लोकशाही फार समर्थ आणि प्रबळ आहे. परंतु व्यवस्थेचा ठेकेदारांनी आणि केंद्रस्थानी असलेल्या आजच्या सत्ताधीशांनी स्वतःच्या मतलबासाठी लोकशाही यंत्रणांचा त्यांच्या सोयीने वापर करत लोकशाहीचा प्राणच नष्ट करून टाकला आहे. तूर्तास लोकशाही फक्त कागदावर आहे. लोकशाहीच्या नावाखाली आज सर्वत्र पुन्हा एकदा प्रत्यक्ष हुकूमशाही अस्तित्वात आली आहे, असा एकंदरीत सूर असहमतीचे रंग मधून ऐकायला येतो. या कवितासंग्रहात सरकारच्या फसलेल्या नोटबंदीपासून तर अणूचाचणीपर्यंत अनेक घटनांची अत्यंत परिणामकारक नोंद कवीने आपल्या कवितेत घेतली आहे. ती मुळात वाचण्यासारखी आहे. तसेच या संग्रहामध्ये झाड ही वेगळ्या पातळीवरची एक विलक्षण कविता आहे. त्याच पद्धतीने काही जुन्या लोकांच्या विचारठेवीतून किंवा लोकम्हणीतून किंवा तत्त्वचिंतनात्मक अभिव्यक्तीतून काही कविता जन्माला आलेल्या आहेत. जसे- एक मार्च या कवितेत बापाचे मुलाला शहाण्याचे जोडे डोक्यावर घे, पण मूर्खाच्या सावलीत उभा राहू नकोसअसे सांगणे असो, किंवा तत्वज्ञानाच्या पातळीवरील भूक ही कविता असो, त्या कवितांतील चिंतन फारच प्रभावी आहे. उदाहरणार्थ

भूक नसतेच मुळी
वाईट
वाईट
असते
तिची कोंडी
करणारे
व्यवस्था,
फक्त!




अशा ओळीतून जीवनाचे प्रभावी तत्त्वज्ञान मांडणारी समर्थ कविता आपल्याला सातत्याने या संग्रहात वाचायला मिळते. स्त्रीसूक्त तुमच्या नजरेत मी अशा कविता भारतीय स्त्रीजीवनातील काळोखे वास्तव मांडत स्त्रीच्या मानवीपणाची ओढ प्रकट करणाऱ्या आहेत. स्त्रीसूक्त या कवितेत तर

माझे अस्तित्व म्हणजे
फक्त एक योनी, दोन स्तन नि एक गर्भाशय बस्स,
एवढाच माझ्या अस्तित्वाचा आशय तुमच्या लेखी...!
हे नकोय मला मला हवंय विश्वजाहीरनाम्याच्या
पानावर उमललेलं All human beings are
boen free and equal in dignity and
rights. हे एवढंच एक सुगंधी मन !!

-असे स्पष्टच त्या स्त्रीमनाने बजावलेले आहे. तर फूलनदेवीने तिच्यावर केल्या गेलेल्या अत्याचाराच्या विरोधात घेतलेल्या भूमिकेचे समर्थन करणारी फुलन ही कविता सुद्धा स्त्रीच्या बंडखोरीचे दर्शन घडवणारी आहे. कुक्कुस गु-घाणीच्या राजकारणातील नौटंकी स्टिल विथ अस या कवितांमधून आलेले आजचे सामाजिक वास्तव माणसाला भयंकर अस्वस्थ करणारे आहे. ते मुळात समजून घेण्यासारखे आहे. तसेच, पळवेकरांची बकरा ही कविता आपल्या भांडवलीवृत्तीचे आणि सामान्यांच्या जगण्यातील हासमय स्थितीचे अत्यंत प्रभावी प्रकटन आहे. ते सांगतात

माणूसः मालक असो,
खाटीक असो की ग्राहक पैशाने
बकऱ्याची शिकार करत राहिला
बकरा जिवानिशी जात राहिला
माणूस नित्यनेमाने ढेकर देत
राहिला -


अशारीतीने अतिशय प्रभावीपणे बकऱ्याच्या प्रतीकातून शोषित आणि पीडित यांच्या जगण्यातील भांडवली वृत्तीने हिरावलेले त्यांचे सर्वस्व शेवटी त्यांना अत्यंत निर्दयपणे कोणत्या -हासमयतेकडे घेऊन जाते यासंबंधीचे अतिशय विदारक चित्रण बकरा या कवितेतून आले आहे. या कवितेत शेवटच्या चार ओळीतूनच सर्व सार सांगितले जाते, तरीही खाटकाच्या दुकानातील प्रसंगाचे अतिशय सूक्ष्मपणे केले गेलेले वर्णन खरोखर गरजेचे होते का ? असाही एक प्रश्न पडतो. प्रसिद्ध विचारवंत सुधाकर गायकवाड यांनी सुद्धा या कवितेच्या दुसऱ्या भागाबाबत हे वर्णन येणे गरजेचे होते का ? असा एक आक्षेप नोंदवलेला आहे. अर्थात, तो पळवेकरांच्या शैलीचाही एक भाग असू शकतो. कारण साहित्यात वास्तवाचे केवळ चित्रण असून भागत नाही, तर त्या चित्रणाची गतिमानता लेखकाला मांडता आली पाहिजे हा विचार खुद्द त्यांना मान्य आहे. तो त्यांनी अनेकदा बोलून दाखवलेला आहे. त्याचाही तो परिपाक असू शकतो. खरे पाहता, अशोक नामदेव पळवेकर ह्यांची प्रत्येक कविता ही एक कथानक घेऊनच वाचकांना भेटते. त्यांच्या प्रत्येक कवितेत एक स्टोरी असतेच! त्यामुळे त्या कवितेचा एक स्वतंत्र घाट आहे. त्यात आशय व सौंदर्यदृष्टीची एक सलगता आहे, विस्कळीतपणा नाही. म्हणूनच ती कविता सहज आकळली जाते. अनेकदा अनेक कवींच्या कविता वाचताना त्या कवितेत काय सांगितले गेले आहे ते वारंवार वाचूनही लक्षात येत नाही, परंतु ही बाब कवी पळवेकरांच्या बाबतीत मात्र घडत नाही. ही कविता वाचकाला सहज समजते. अट एवढीच, की ती पूर्ण कविता आपल्याला वाचावी लागते. एक-दोन ओळींतून संपूर्ण आशयाचा बोध या कवितेत संभवत नाही. मराठी साहित्यात बैल या विषयावर विठ्ठल वाघ, वसंत सावंत, लोकनाथ यशवंत वगैरे अनेक कवींनी कविता लिहिलेल्या आहेत. परंतु त्या सर्व कवींच्या तुलनेत अशोक नामदेव पळवेकरांची कविता वेगळी आहे. लोकनाथ यशवंत यांची बैल ही कविता शेतमजुरांच दुःख अधोरेखित करत व्यवस्थेला प्रश्न विचारते, तर अशोक नामदेव पळवेकर यांची बैल ही कविता शेतमजूर आणि शोषित यांच्या पलीकडे जाऊन शोषित आणि शोषणकर्ता हया अंगाने आपले लक्ष वेधून घेते. बैल ही शोषितांची आदिम काळापासूनची प्रतिमा आहे. परंतु व्यवस्थेने त्या प्रतिमारूपाचे सांस्कृतिक उदातीकरण केले आहे. कोणत्याही शोषणरूपाचे सांस्कृतिक उदात्तीकरण करून ते शोषण कायम सुरू ठेवणे हे शोषक व्यवस्थेचे शास्त्रच असते. ते शास्त्र धर्माच्या अंगाने त्या शोषणाला रूढ करते. त्यामुळे त्या शोषणाविरुद्ध शोषितसमूह बंड करून उठत नाही. याच धर्तीवर बैलाचा मालक ( शोषणकर्ता ) एक दिवस बैलाची पूजा करून त्याच्या शोषणाला सांस्कृतिक उदातीकरणाचा मुलामा देतो आणि त्याचे सर्वस्व खच्चीकरण करतो. हे खच्चीकरण पिढ्यानपिढ्या बिनबोभाट सुरू असते. म्हणूनच कवी अशोक नामदेव पळवेकर यांनी बैल या प्रतिमेतून गुलामी आणि शोषणाच्या सांस्कृतिक उदात्तीकरणाचे रूप लीलया नाकारले आहे. ऐतिहासिक व वर्तमानाच्या सत्यावर भाष्य करणाऱ्या भीमा कोरेगावची लढाई या विषयावरील दोन कविता या कवितासंग्रहात आहेत. त्यापैकी एक कविता भीमा कोरेगावची लढाई ही पोटासाठी नव्हती; तर समतेसाठी अस्मितेसाठी आणि न्याय हक्कासाठी होती याची जाणीव करून देणारी आहे; तर दुसरी कविता या विजयस्तंभाचा राजकीय षडयंत्रसाठी वापर करणाऱ्या व्यवस्थेविरुद्ध तसेच सत्तेच्या पक्षपाती धोरणाविरुद्ध आहे. यावरून आपल्या असे लक्षात येते की, **क्रमशः**



# आईसारखी काळजी घेणारी हरितकी

आई सारखी काळजी घेणारी वनस्पती म्हणजे हरितकी. बऱ्याच रोगावर हे वापरू शकतो काही उपयोग खाली देत आहे. मानसिक ताण कमी करण्यासाठी आणि हार्मोन्ससोबत लैंगिक शक्ती वाढवण्यासाठी याची मदत होते. यामुळे स्त्री-पुरुषांची प्रजनन क्षमता वाढते आणि प्रजननक्षमतेशी संबंधित असलेले अनेक आजार यामुळे दूर होतात, पचनास मदत होते. हिरडा हे पोट आणि पचनासाठी वरदान मानले जाते. छातीत जळजळ, गॅस, अल्सर, ॲसिड रिफ्लक्स, बद्धकोष्ठता हे सर्व आजार बरे होण्यासाठी हिरडा गुणकारी ठरतो. अन्नाचे योग्य पचन करण्यासाठीही त्याची मदत होते. पोट साफ होणे तसेच पोटदुखी आणि गॅसमुळे होणारे करपट ढेकरही कमी करते. कोरडे डोळे असलेल्या लोकांसाठी हिरड खूप फायदेशीर आहे. हिरडा पाण्यात टाकून उकळवून ते पाणी थंड करून डोळे धुतल्याने डोळ्यांच्या संसर्गापासून आराम मिळतो. त्वचेसाठी वरदान हिरड्यामध्ये व्हिटॅमिन सी असते. मॅग्नेशियम, पोटॅशियम असते त्वचा आणि केसांसाठी हे एकप्रकारे वरदान आहे, कारण हे त्वचेतील विषारी पदार्थ काढून टाकते आणि चेहऱ्यावरील पुरळ फोड, त्वचा रोग नाहीसे होतात भूक न लागणे म्हणजे च अग्निमांद्य, अरुची किंवा मंदाग्नी यावर घरगुती उपचार सुंठ मिरे पिंपळी 5ग्राम सम प्रमाणात आवळा 50 व शेदिमिठ 10 ग्राम एकत्र करून वाटण्या एवढ्या गोळया बनवून 2वेळ जेवणानंतर खावे पथ्य -- हलके,उकडलेले, गरम किंवा कोमट पाणी प्यावे, तोंडाला चव नसल्यास थोडीशी सुंठ चघळावी, भूक लागली की मुगाची खिचडी,ज्वारीची भाकरी, पालक , भोपळा, पडवळ, श्रावणघेवडा इ खावे वजन कमी असल्यास जेवणानंतर बल्यप्राश घ्यावे - आमवात हत्ती सारखा अवाढव्य त्रासदायक व्याधी कारणे - लक्षणे शरीरात आम नावाचे विषा सारखे द्रव्य तयार होते व मोठ्या सांध्या चा ठिकाणी जमा होते, विंचु चवल्या प्रमाणे तीव्र वेदना असतात रक्ता मधे R A फॅक्टर सापडतो , साधारण पणे हा व्याधी 14ते 40वयोगटात अढलतो आयुवेदानुसार उपचार याला 100% कंट्रोल करतो या प्रकारात रुग्णाला आयुष्भर औषधी घेणे आवश्यक असते Allopathy मद्ये पण हेच सागितलं आहे फक्त त्याचे औषधी केमिकल ची असतात आयुर्वेदाची 100%वनस्पती जन्य आहेत आयुवेदानुसार हा व्याधी ट्रीटमेंट चालू आहे तोपर्यंच कंट्रोल करता येतो ,जास्त गारठा,ढगाळ हवामान याव्याधीला वाढवतात योग्य चिकेस्ते साठी संपर्क करा डॉ मनोज जोशी 9822341176 ऑनलाईन कनसल्टींग 25 वर्षा चा अनुभव ,फी 300, औषधी वेगळे युरिक ॲसिड **(संधिवाताचा एक प्रकार)** या प्रकारात पायाचा किंवा हताचा आंगठया पासून वेदना किंवा अखडणे सुरू होते , व्याधी वढल्यास क्रमाने इतर साद्याना सूज व वेदना वाढतात, वेळेवर व दीर्घ काळ चिकिस्था घ्यावी व्याधी 100% बरा होतो. अमृता रसायन व गोक्षुर रसायन घ्या 2 ते 3 महिन्यात त्रास कमी होतो काही पेशंट मद्ये अधिक औषधी द्यावी लागु शकतात,दर दोन महिन्यांनी युरिक अँसिड टेस्ट करावी. फिशर, भगंदर , मूळव्याध गुदभागी वेदना, दाह इत्यादी लवकर बरे करता येते ऑपरेशन करण्या आधी अवश्य आमचा इलाज करून घ्या 99%लोकांना ऑपरेशन करावे लागत नाही इलाज खूप सोपा झाला आहे. - वेदना होणे, सूज येणे, टोचल्या सारखे वाटणे, चीर पडणे, रक्त पडणे, खाज , कोंब यावर शुद्ध वनौषधी पासून बनवलेले कॅपसुल लिकिविड व चूर्ण स्वरूपात उपलब्ध **किडनी चे अजार**

1-डॉक्टर,मला वारंवार किडनी स्टोन होतात? उत्तर-पाणी 5 लिटर कमीत कमी प्या नेहमी ,पालक ,टमाटे,कोबी दोन्ही बंद करा, रोज 999 तेलाने पोटाची मालिश करा. प्रश्न 2-- 1वर्षा पूर्वी 22 mm खडा असल्या मुळे किडनी स्टोन चे ऑपरेशन झाले आहे सोनोग्राफी मध्ये किंवा क्सरे मध्ये काहीच दिसत नाही तरी माझे पोट दुखते अजूनही मला स्टोन असतील का किंवा परत होऊ ,शकतात का? उत्तर- किडनी स्टोन वारंवार होऊ शकतात , कधी कधी काही स्टोन आकाराने लहान असल्यास सोनोग्राफी किंवा क्सरे मद्धे दिसत नाहीत पाण्याचं प्रमाण वाढवा किंवा योग्य आयुर्वेद डिग्री असणाऱ्या डॉक्टर कडून उपचार घ्या. गरोघर आयुर्वेद औषधीदेणारी फसवे वैदू खूप झाले आहेत आधा हकीम जान को खातर हे लक्षात ठेवा. प्रश्न 3-डॉ किडनी स्टोन मुळे किडनी खराब होऊ शकते का? जास्त दिवसाचे, 13 mm पेक्षा मोठया आकाराच्या स्टोन मुळे असे घडू शकते तसेच वारंवार स्टोन होण्याच्या शरीरा च्या स्वभावा मुळे काही वेळा किडनी खराब होऊ शकते याला उपाय म्हणजे वेळेवर आळस न करता ट्रीटमेंट घ्यावी प्रश्न 4-डॉ किडनी कोणत्या कोणत्या कारणाने फेल किंवा खराब होऊ शकते त्यावर आयुर्वेदीय उपचार आहेत का ?उत्तर किडनी स्टोन, पॉलिसिस्टिक किडनी,अनियत्रिंत मधुमेह,बीपी , पेन किलर घेण्याची जास्त सवय ,किंवा अलोपॅथी च्या काही मधुमेह व बीपी वरील काही प्रकारच्या औषधीनि( सगळ्या औषधी निनाही ) किडनी फेल किंवा खराब होऊ शकते. हो आयुर्वेदात किडनी स्टोन व किडनी फेल साठी उत्तम औषधी आहेत साधारण पणे 1 तो 2 महिन्यात उत्तम गुण दिसतो या साठी आयुर्वेदात असे बरेच औषधी आहेत पण हो डॉक्टरी सल्ला घेऊनच.




**डॉ मनोज जोशी आयुर्वेद तज्ज्ञ 9822341176**
**औरंगाबाद तपासणी 300 ,औषधी खर्च 1500 ते 3500 महिना**
**संपर्क डॉ. मनोज जोशी 9822341176**
**कुरिअर ने पण उपलब्ध**

# आरोग्याचा पाया सकस आहार!



शारीरिक प्रकृतीचा विचार शरीर रचना आणि शरीर क्रिया अशा दोन्ही बाजूंनी आवश्यक आहे. रचना आणि क्रिया एकमेकांवर अवलंबून असतात. रचना नीट नसली, तर क्रिया व्यवस्थित होणार नाही. उदाहरणार्थ- पायाचे हाड मोडले तर चालणे कठीण होईल. नेहमीत व्यायाम केला तर स्नायू आकाराने मोठे होतील. सुयोग्य शरीरचना आणि क्रिया सुरळीत चालणे या दोन्हीसाठी सकस आहार, नियमाने केलेला व्यायाम, अंतर बाह्य स्वच्छता, विकाराचे प्रतिबंधन, आजाराचे लवकर निदान आणि उपचार अवश्य असतात. त्यातील सकस आणि संतुलित आहार याला आरोग्याचा पाया म्हणता येईल. आहार शास्त्राच्या दृष्टीने उष्मांक, प्राथिनेक, स्निग्ध पदार्थ, कार्बोदके, जीवनसत्वे , क्षार व पाणी चौथा व तृप्ती अशा नऊ अंगाने विचार केला जातो. परिपूर्ण आहार या सर्व बाजूंनी निर्दोष असावा. आपल्या आहाराचा विचार तृणधान्य, डाळी, कडधान्य ,भाज्या कोशिंबिरी ,दूध दुभते, चवीसाठी वापरण्यात येणारी गुळ, चिंच, तिखट मिठासारखे पदार्थ, तूप, तेल व फळे अशा विभागात करणे अधिक उपयोगी पडते. मांसाहाराची ही दखल घेणे आवश्यक आहे. चहा कॉफी धूमपान व मद्यपान हे आहारात मोडता येत नसतीलही; परंतु त्याचाही विचार अवश्य आहे. भारतीय आहार तृणधान्यावर आधारित आहे. भात, पोळी, भाकरी हे आपले मुख्य अन्न आहे. त्याचबरोबर आपण आमटी, डाळ व भाज्या खातो. चटणी, कोशिंबिरी ही पूरक अन्नात मोजली जाते. आपण ब्रह्मशी भात खाणारे आहोत. भात विशेषता भात किंवा पेज पचवयास सोपी असते. गहू त्या मानाने पचण्यास कठीण कारण संकेत ग्लूटेन नावाचे प्राथिने असतात. भारतातील अनेकांना गुलटेन पचत नाही. ज्वारी मध्ये लुसिन नावाचे एक अमिनो ॲसिड असते. या मध्ये लुशिन प्रमाण खूप असते. या ल्युसिनमुळे शरीरात निकोटिनिक ॲसिड अमाईड जीवनसत्व बी सिक्स याचा अभाव होऊ लागतो.यातून पेलेगा नावाचा आजार उद्भवतो.बाजरीमध्ये लोहाचे प्रमाण चांगले आसते. ज्वारी, बाजरी ,नाचणी, वरी , बद्धकोष्ठता हा त्रास ज्या याचे सेवन अखंड दाण्याच्या स्वरूपात होते त्यामुळे या धान्याच्या टर्फलातील चौथा आहारातील उपलब्ध होतो. बद्धकोष्ठता हा त्रास ज्या व्यक्तींना असेल त्यांना अशा चौथ्या चा फायदा असतो. मक्यामध्ये बीटा कॅरोटी असते ;त्यापासून शरीराला अ जीवनसत्व मिळते शिवाय ते एक चांगले ॲटी ऑक्सीडेंट आहे. वरे आणि नाचणी यात कॅल्शियम भरपूर आहे; तर नाचणीत लोह ही विपुल असते. सगळ्याच तृणधान्यात लायसिन व मिथिओनिन ही अवश्य अमिनो ॲसिड कमी असतात. त्यांची भरपाई करण्याकरिता तृणधान्याच्या जोडीला थाळी, पालेभाज्या व दूध घेणे आवश्यक आहे यासाठी वरण-भात, ज्वारीची भाकरी व मेथीची भाजी, दहीभात, दूध पोहे ,खिचडी असे पदार्थ खाद्यपदार्थ जोड्या घेणे इष्ट होय. आपला आहार भाज्यांच्या शिवाय परिपूर्ण होणारच नाही ताज्या भाज्यातून जीवनसत्व आणि फॉलिक ॲसिड मिळते .ही जीवनसत्वे उष्णतेमुळे मोडकळीस निघू लागतात. फार वेळ शिजवल्याने वारंवार गरम केल्याने ती नष्ट होतात. कच्च्या भाज्या ती असतात. सर्व रंगीत भाज्या बिटा क्या रे टी असते. गाजर टोमॅटो हिरव्या पालेभाज्या हिरवी मिरची अशा रंगीबिरंगी कोशिंबिरी या दृष्टीने महत्त्वाच्या असतात शिवाय कोशिंबिरी मधून चोथा मिळतो. मोड आलेल्या कडधान्याचा वापर जीवनसत्व क मिळवण्याच्या दृष्टीने उपयुक्त आहे. शिवाय कडधान्यातून प्राथिने मिळतात. डाळी आणि उसळीतून मिळणाऱ्या प्राथिनेत मिथिओनिन आणि हे अमिनो ॲसिड कमी असते याकरिता पालेभाज्या व दुधाचा वापर अवश्य असल्याचा उल्लेख वर दिलेला आहे.



**- डॉ. सुचिता सावळे**






# गर्भधारणे दरम्यान करण्यात येणारे पंचकर्म


आयुर्वेदिक गर्भसंस्कारामध्ये गर्भधारणे दरम्यान करण्यात येणारे पंचकर्म हे फार विशिष्ट स्वरूपाचे आणि विचार करून करण्यात येणारे असते, खरं पाहायला गेलं तर प्रेग्नेंसी मध्ये फारसे पंचकर्म चालत नाहीत. वमन विरेचन हे पंचकर्म तर आपण प्रेग्नेंसी मध्ये करतच नाही, विशिष्ट अशा परिस्थिती मध्ये आपण नस्य, बस्ती आणि रक्त मोक्षण यांचा आधार घेऊ शकतो. प्रामुख्याने जास्तीत जास्त आयुर्वेदिक औषधी ही उष्ण स्वरूपाची असतात, याचा अर्थ अजिबात असा नाही की शीत औषधी आयुर्वेदात कमी प्रमाणात आहेत. परंतु विशिष्ट कारणावर अवलंबूनच प्रेग्नेंसी मध्ये दिले जाणारे पंचकर्म असते. यामध्ये सर्वात मोठे आणि महत्त्वाचे कारण म्हणजे गर्भ स्त्राव किंवा वारंवार होणारा गर्भपात, वारंवार होणाऱ्या गर्भपाताचे अनेक कारणे असतात त्यापैकी टॉर्च नावाची टेस्ट पॉझिटिव्ह असणे हे फार महत्त्वाचे कारण आहे, तसेच एखाद्या स्त्रीमध्ये जर उष्णतेचे प्रमाण अधिक असेल तर आपल्याला पंचकर्मचा आधार घ्यावा लागतो. परंतु नऊ ही महिने आपण सतत पंचकर्म करू शकत नाही, आपल्याला करावयाचे असते ते गर्भ संरक्षणा साठी पहिले तीन महिने, आणि गर्भिणी परिचर्या मध्ये आयुर्वेद शास्त्रामध्ये प्रामुख्याने उल्लेख केलेला आहे तो शेवटच्या तीन महिन्यांमध्ये करण्यात येणाऱ्या पंचकर्माचा. म्हणजेच याचा अर्थ असा होतो की पहिले तीन महिने बाळ टिकून राहावे बाळाची वाढ व्यवस्थित व्हावी अकाली गर्भस्राव होऊ नये किंवा वारंवार होणाऱ्या गर्भपाताचा धोका टळावा म्हणून बस्ती हे पंचकर्म करण्यात येते, आणि सातवा आठवा आणि नववा म्हणजेच लास्ट ट्रायमिस्टर किंवा थर्ड ट्रायमिस्टर, यामध्ये प्रामुख्याने नॉर्मल डिलिव्हरी सोपी व्हावी यासाठी बस्ती हे पंचकर्म करण्यात येते, हार्मोनल इम्बॅलन्स टाळण्यासाठी नस्य या पंचकर्माचा उपयोग केला जातो. तसेच जर प्रेग्नेंसी मध्ये काही विशिष्ट असे त्वचा विकार असतील किंवा जुनाट असे त्वचारोग असतील तर त्यासाठी आपण रक्त मोक्षणी




या पंचकर्मा मधील जलोका नावाची पद्धती वापरतो. जलौकामुळे पेशंटचे अशुद्ध रक्त काढल्या जाते आणि ते प्रेग्नेंसी मध्ये करण्यास ग्रंथकारांनी सांगितलेले आहे. प्रामुख्याने बीज शुद्धी द्वारे गर्भधारणा राहण्यापूर्वीच पंचकर्मचा प्रमुख उल्लेख आढळतो. परंतु जेव्हा स्त्री प्रेग्नेंट होते तेव्हा देखील विशिष्ट असे पंचकर्म हे तज्ञ वैद्यांच्या सल्ल्यानेच आणि त्यांच्या मार्गदर्शनानेच करत असतात, आणि हे सर्व पंचकर्म करत असताना विशेष काळजी देखील घ्यावी लागते. जेवढे पहिले तीन महिने बाळ टिकवणे महत्त्वाचे असते त्या हेतूने बस्ती हे पंचकर्म सर्वश्रेष्ठ पंचकर्म मानल्या जाते. त्याचप्रमाणे आजकाल आपण बघत आहोत की नॉर्मल डिलिव्हरी चे प्रमाण खूप कमी होत चालले आहे, मग जर नॉर्मल डिलिव्हरी चे प्रमाण वाढवायचे असल्यास किंवा स्त्रीच्या योनी भागाला जर आपल्याला बळ द्यायचे असल्यास जेणेकरून नॉर्मल डिलिव्हरी सुकर आणि सहजरित्या होईल तर आपण बस्ती हे पंचकर्म करू शकतो परंतु ती तज्ञ वैद्यांच्या सल्ल्यानेच. जेव्हा टॉर्च नावाची टेस्ट पॉझिटिव्ह असते तेव्हा प्रामुख्याने स्त्रीच्या शरीरात कुठले तरी इन्फेक्शन दडलेले असते, हे इन्फेक्शन काढण्यासाठी रक्तातील दोष खोलवर जाऊन निर्हरण करावे लागतात, म्हणजे स्त्रीच्या शरीरातील उष्णता कमी होऊन बाळ राहण्यासाठी मदत होते. टॉर्च टेस्ट मध्ये पाच वेगवेगळ्या प्रकारचे इन्फेक्शन किती प्रमाणात आहे याचा देखील अंदाज घेतल्या जातो. या टॉर्च टेस्टमध्ये पुढील पाच प्रकारचे जंतू रक्तामध्ये सापडू शकतात. टॉर्च - 1. Toxoplamosis 2. Others ( syphilis, hepatitis B ) 3. Rubella 4. Cytomegalovirus 5. Herpes simplex. या इन्फेक्शन चा नीट अभ्यास करून आयुर्वेदिक डॉक्टर शीत गुणांची द्रव्य रुग्णास देऊन आणि त्याच्या विशिष्ट औषधी कल्पना चा बस्तीसाठी वापर करून रुग्णाची ट्रीटमेंट करतात. शेवटच्या तीन महिन्यांमध्ये जेव्हा बाळ वाढीस लागणे गरजेचे असते, तेव्हा जर बाळाचे पाणी कमी झाले, किंवा बाळाचं वजन कमी असलं, किंवा बाळाची हवी तेवढी वाढ आपल्याला सोनोग्राफीमध्ये दिसत नसली तर बाळाची वाढ झपाट्याने होण्यासाठी आणि सुरळीत होण्यासाठी इथे देखील आपल्याला विविध औषधींचा आणि बस्तीचा वापर करता येतो, परंतु हे सर्व तज्ञ आयुर्वेदिक डॉक्टरांच्या सल्ल्यानेच करण्यात येते. पुढील भागात आपण पाहूया डिलेवरी नंतर कोणते पंचकर्म करण्यात येते.

**वैद्या. मंगल सुरेश ताठे**


M. D. आयुर्वेद, संचालिका - शाश्वत आयुर्वेद व पंचकर्म चिकत्सालय पिसादेवी, छत्रपती संभाजीनगर
Associate Professor
CSMSS आयुर्वेद रुग्णालय व महाविद्यालय, छत्रपती संभाजीनगर
संपर्क - 9168101060

# गर्भवती मातेचा असा असावा आहार

जन्माला येणारे मूल आधी आईच्या पोटात वाढत असते. मूल पुढच्या आयुष्यामध्ये निरोगी, सक्षम, कार्यक्षम रहावे यासाठी त्याच्या आईला गरोदर अवस्थेत चांगला आहार दिला पाहिजे. याच काळात या मातांना फळे आणि पोषण द्रव्य युक्त अन्न दिले पाहिजे. गरोदरपणी गर्भाचे पोषण हे आईच्या अन्नावरच होत असते. त्यामुळे आईने दीडपट आहार घेतला पाहिजे. पण जेवणाच्या वेळी गच्च पोट भरून जेवू नये. दोन घास कमीच खावेत. थोडे थोडे करून ३-४ वेळा खावे. प्रथिनांसाठी अंडी आणि दूग्धजन्य पदार्थ दिले पाहिजेत. रोज निदान एक कप दूध सकाळी व संध्याकाळी प्यावे.
कोणत्याही डाळीचे वरण किंवा आमटी जेवणात असावी. मटकी, मूग, हरभरा, चवळी, वाटाणा यापैकी कशालाही मोड आणून त्याची उसळ रोजच्या जेवणात असावी. भाकरी किंवा पोळी तसेच मेथी, शेपू, करडई, अळू, शेवग्याची पाने, अगस्तीचा पाला, आंबटचुका, पानकोबी, राजगिऱ्याची भाजी, कोथिंबीर अशा प्रकारची कोणतीही पालेभाजी रोज दोन्ही वेळच्या जेवणात पाहिजे.
पेरू, चिकू, केली, सफरचंद, पपई, संत्री, मोसंबी अशा प्रकारची फळे रोजच्या जेवणानंतर खावीत. जांभूळ, करवंद, बोरं, आवळा, कवठ ही स्वस्त फळेही आरोग्याच्या दृष्टीने चांगली असतात. गवार, दोडका, घोसावली, भोपळा अशा प्रकारच्या फळभाज्याही मधून मधून असाव्यात. मुळा, टोमॅटो, बीट काकडी वगैरे कच्चे खाणे अधिक चांगले. दररोज ६ ते ८ ग्लास पाणी (१.५ ते २ लिटर) आवश्यक असते. शरीर नेहमी पाण्याचे संतुलन ठेवत असते.



# राजमाता - राष्ट्रमाता अहिल्यादेवी होळकर



मल्हारराव डोणगांवकर
संपर्क क्र. ९६३७९३७५७९

आधुनिक केसरी

**वीरमाता अहिल्यादेवी होळकर भारतीय स्त्री समाजातील एक महान स्त्री रत्न होते. या सती साध्वीने इंदोरच्या इतिहासाला कलाटणी देऊन स्व-कर्तृत्वाने परिस्थितीवर मात करुन कठीण काळात राज्याची धुरा सांभाळली. इंग्रजांनी सुध्दा या वीरमातेच्या कुशलतेची मुक्तकंठाने प्रशंसा केली. मोगल साम्राज्याचा सूर्य अस्त पावत होता वीर मराठयांची शक्ती कमी होत होती. सर्व देशभरात उपद्रव चालू होते. प्रजेच्या हिताच्या बाबी कोणीही लक्षात घेण्यास तयार नव्हते अशा दुर्धर व कठीण प्रसंगी बीड जिल्हयातील आष्टी तालुक्याच्या चौंडी या गावी श्री माणकोजी शिंदे व सुशीलाबाई या मल्हारी मार्तंन्ड कुलदैवत असलेल्या धनगर समाजातील पाटील घराण्यातील धर्मनिष्ठ दांपत्यांच्या पोटी इ.स. १७२५ मध्ये (वैशाख शुध्द ५ शके १६४७) एका सुलक्षणी कन्यारत्नाचा जन्म झाला.**

देवीच्या सेवेचे फळ म्हणून लाभलेल्या या कन्येचे थाटामाटाने बारसे झाले व नाव आहिल्यादेवी ठेविले. मल्हारराव या थोर मावळयाच्या प्रजापतीच्या मोठया मुलाबरोबर ( खंडेराव ) आहिलेचे लग्न ठरले, हा लग्न सोहळा १४ मे १७३३ रोजी पुणे येथे थाटामाटात माणकोजी शिंदे पाटलांची आहिल्या, सभेदार होळकराची सून झाली. मराठवाडयाचे हे माणिक मध्य भारताच्या कोंदण विलसू लागले. माणकोजी शिंदे यांना काय माहित की पुढे चालून आहिल्या होळकर घराण्याचे नाव साऱ्या राज्यात प्रसिध्द करतील, इ. स. १७५४ मध्ये जाटाशी युध्द करीत असता आहिल्यादेवीचे पती खंडेराव होळकर यांना वीर मरण आले. आहिल्याबाईचा पायगुण चांगला होळकरांचे भाज्य वाढले "देवाच देणं - देवाच लेणं" असे म्हणून ती पती सेवा करी, आहिल्याबाई धार्मिक व सदाचारीवर्तन यामुळे सासु सासरे व इतरजनांना प्रिय झाली. ज्वलंत धर्मनिष्ठा व प्रतिनिष्ठा यामुळे आहिल्याबाई सती जाण्यास तयार झाली, तेंव्हा तिचे सासरे सुभेदार मल्हारराव होळकर आहिल्यास म्हणाले "तू माझ्यावर कशाला आग पाखंडतेस" आहिल्या तर मेलीस आता माझा खंडू तूच आहेस ! मला खात्री आहे "माझे सर्व सौभाग्य कायम ठेवणे हे केवळ तुझ्याच हातात आहे याचा तू अवश्य विचार कर" आपल्या सास-याच्या या गोष्टीचा आहिल्याबाईच्या मनावर विलक्षण परिणाम झाला, स्वर्गात जाण्यापेक्षा लोकसेवा करण्यामध्येच खरे हित आहे, हे आहिल्याबाईने ओळखून सती जाण्याचा विचार सोडून दिला. १७६७ पासून आहिल्याबाई होळकर शाहीचा राज्यकारभार पाहू लागली, पुढे ३० वर्षे बाईने स्वतः राज्यकारभार चालविला. जहांगिरी व खाजगी अशा दोन भागात कारभार केला सुभयाचे ११ प्रांत केले. महाल, परगणे गावाचे विभाग केले.

सर्वांच्या हक्काचे रक्षण केले महेश्वर ही राजधानी केली नर्मदेकाठी किल्ल्यामध्ये आहिल्यादेवी राहू लागली कारभारात सात खाती सात जणकडे सोपविली कारभारी, दिवाण, वकिल नेमले. कारभारात शांतता, सुव्यवस्था, सुबत्ता आणखी सर्व राज्याशी स्नेहसंबंध जोडून विविध ठिकाणी वकिल नेमले. कायद्यात अनेक सुधारणा केल्या, भिक्का गोंड यांच्याशी स्नेह संपादिला धर्मकारण व राजकारण यांचे व्यवस्थापन केले, फौज व संरक्षण तुकोजीकडे व खाजगी दौलतीचा कारभारत स्वतःकडे घेतला. आहिल्याबाई रामपूरचे चन्द्रावंताचे बंड मोडले. तेंव्हा नाना फडणीस म्हणाले शापहपि शरदपि आहिल्याबाई ! अहिल्याबाइच्या अंगी तेज व युध्दोत्साह होता, आहिल्याबाईंनी माधवराव सवाई माधवराव, नाना फडणीस, हरीपंत फडके यांच्या मैत्रीचे संबंध जोडले.

ज्यावेळी आहिल्याबाइनी राज्यकारभार हाती घेतला त्यावेळी १६ कोटी रुपये हे निजीकोषात होते, या संपत्तीवर राज्याचा काहीच अधिकार नव्हता. एवढया मोठया रक्कमेचा वापर कसा करायचा याचा आहिल्याबाईने धीर-गंभीरतेने विचार करुन स्वतःच्या स्वार्थासाठी वापर न करता जनतेच्या हिताची कामे करण्यासाठी ठरविले. आहिल्याबाइंनी अनेक राज्याचा अभ्यास केला, त्यांच्या अंतरात्म्यास जनसेवेची कास लागली होती, म्हणून त्यांनी धनसंपत्तीचा उपयोग राज्याच्या कल्याणाकरीता करण्याचे निश्चित केले. त्यांच्या उदार व उदात्त भावनेने त्यांनी सर्व संपत्तीवर तुळशीपत्रक ठेऊन दिन-दुबळयांच्या उध्दारासाठी हा पैसा खर्च केला,



त्यांचा स्वतःचा खर्च हा फारच थोडा होता. त्या आपले सर्व दान परोपकारासाठी खर्च करीत. सदैव दानधर्म करणे, लोकहिताची, जनकल्याणाची कामे करणे हेच त्यांच्या जीवनाचे एकमेव उद्दिष्ट होते. सर्व भारतभर धर्मशाळा, मंदीरे, अनेक नद्यावर घाट बांधून पुण्याची कामे त्यांनी केली. एकदा प्रसिध्द कवी मोरोपंत गंगेवर स्नालाला गेले गंगेच्या पवित्र व शीतल प्रवाह पाहून त्यांच्या भावूक ह्दयातून खालील बोल ओठावरती आले। "देवी आहिल्यादेवी यावी भेटावयास सत्वरती तू पुण्यकिर्ती, ही गंगोजी दोघी जगी सत्वरती"

हे गंगे मी आहिल्यादेवीचे दर्शन घेतो, जशी तू जगामध्ये जनसामान्याची माता आहे पशू-पशांची जननी आहे, तशीच आहिल्यादेवी आहे, कारण तुम्ही दोघीपासूनही जगाचे कल्याण होत आहे. तुम्ही दोघीही परोपकारी आहात, लोकमाता आहिल्यादेवीच्या पूर्वकाळापासून पूर्ण देशात अत्याचार वाढीस लागले होते, लहान मोठी अनेक राज्ये होती ते एक दुस-याचे राज्य बळकविण्याकरीता धडपड करीत होते. यातच ते आपले वैभव मानीत होते अशा आणीबाणीसारख्या कठीण समयी पुण्यश्लोक आहिल्यादेवी होळकरांनी मोठया धैर्याने सतत ३० वर्षे राज्य केले, त्याकाळी त्यांच्या बाबतीत लोक असे म्हणत की, त्यांचे ह्दय गरीबासाठी कमळाहूनही अधिक कोमल तर अत्याचारी लोकाकरीता वज्राहुनही कठीण होत असे.

आहिल्याबाइच्या जीवनात अनेक अशा घटना घडल्या की, ज्यावरुन सिध्द होते त्यांच्यात परोपकारीतेचे, कर्तव्यनिष्ठतेचे आदम्य साहसतेचे गुण होते, या सर्व गुणांमुळेच त्या पुण्यश्लोक आहिल्यादेवी होऊ शकल्या. गुण असून त्या बरोबर देवी गुणाच्या बरोबर मानवावरही अमाप श्रध्दा होती. त्यांनी आपले संपूर्ण जीवन जनतेचे दुःख दूर करण्याकरीता वाहिले. आहिल्यादेवीचे राज्य गिळंकृत करण्याकरीता रामपूरचे चंद्रावत, राघोबा दादा पेशवा, गंगाधर यशवंत, चमपूर आणि महादजी शिंदे यांनी आपापले डावपेच पणास लावले, परंतु आहिल्यादेवीने त्यांना समर्पक उत्तरे देऊन शांत केले. त्यांची उत्तरे संक्षेपाने अशी होती - १ ) आपण लक्षाते ठेवा की, सुभेदार मल्हाररावांची मी पुत्र-वधू आहे.

२ ) सुभेदारीच्या पुण्याईने येथे मी काही बांगडया घालून बसलेली नाही, मी मार्तंड (ईश्वर) समर्थ आहे. ३ ) मी जे काही सार्थ्यावर व राज्याच्या बळावर कामे करीत आहे त्याचे उत्तर मला ईश्वरालाच द्यावे लागणार आहे, हाच माझ्या जीवनातला आदर्श आहे. होळकर राजघराण्यातील स्त्री रत्ने खालील प्रमाणे : १ ) गौतमाबाई होळकर, २ ) आहिल्याबाई होळकर, ३ ) तुळसाबाई होळकर, ४ ) कृष्णाबाई होळकर, ५ ) बीरांगुणा भिमाबाई सुळे, ६ ) चंद्रावती माँ साहेब होळकर, ७ ) इंदिरा माँ साहेब होळकर, ८ ) महाराणी शर्मिष्ठदेवी होळकर, ९ ) संयोगिता राजे होळकर, १० ) उषाराजे होळकर. जेथे जावे तेथे गर्जे आहिल्या नाम निजकरणीने चिरंजीव हा इथे आहिल्या राम अन्न, वस्त्र, गज, स्वर्णदानही केले किती निष्काम सप्तपुण्या अन द्वादशलिंगे तसे जाहले चारीधाम पत्नी, माता, सुस्वाच उत्तम निती जाणी भेद, दंड व साम सावित्री कधी दुर्गा, लक्ष्मी, रणचंडी तर राज्यदेवी शंभू सिनेश्वर चौंडीदेवी आहिल्याश्वेर चौंडी हे नाम जगा व इतरास जगू द्या या उदार व उदात्त धोरणाचे शांती समृध्दीपूर्ण, सुजलाम, सुफलाम असे आहिल्यादेवीने राज्य केले. आहिल्यादेवीने केलेले हे चिरंजीव कार्य काळालाही पुसता येणार नाही, स्वतः दुःख आणि कष्ठ सोसून प्रजेला सौख्य व आनंद देणारी ही पावन जीवन ज्योत, आहिल्याबाई १३/०८/१७९५ ( श्रावण १४ शके १७१७ ) वयाच्या ७० व्या वर्षी नर्मदेच्या काठी महेश्वराच्या राजवाडयात अनंतात विलीन झाली. धर्मचारी, प्रजावत्सल, मध्यम उंचीची, वर्णाने सावळी, प्रकृतीने यथायोग्य, बेताचेच रुप, डोळयात कर्तृत्वाचे पाणी, सतेज चेह-याची पुण्यश्लोक आहिल्यादेवी इथेच किर्ती रुपाने अमर झाली.

# लोकमाता अहिल्याबाई होळकर

आधुनिक केसरी

**31 मे हा दिवस म्हणजे लोकमाता अहिल्याबाई होळकर यांचा जन्मदिवस होय. या वर्षी 31 मे ही त्यांची 298 वी जयंती होय. त्यानिमित्याने अहिल्याबाई होळकर यांचे जीवन कार्य समाजाला माहीत व्हावे म्हणून या लेखाच्या माध्यमातून त्यांचा जीवन प्रवास मांडण्याचा हा प्रयत्न. अहिल्याबाई होळकर यांचे धार्मिक, सामाजिक, राजकीय व कौटुंबिक कार्याचा आदर्श घ्यावा असेच आहे.**

अहिल्याबाई होळकर सर्वधर्मसमभाव, अस्पृश्यता निवारण, स्त्री-पुरुष समानता, सामाजिक एकात्मता, गोरगरिबाविषयी कळवळा, हुंडा पद्धतीचे उच्चाटन, अनिष्ट चालीरिती, रूढी परंपरेचा बिमोड करणे, दत्तक मुल वारसा हक्क प्रथेविषयी तळमळ असे कितीतरी समाज सुधारणेचे कृतिशील कार्य त्यांनी करून दाखविले. म्हणून त्यांचा उल्लेख लोकमाता अहिल्याबाई होळकर असा केला जातो.

लोकमाता अहिल्याबाई होळकर यांचा जन्म 31 मे 1725 रोजी अहमदनगर जिल्ह्यातील चौंडी या छोट्याशा गावात माणकोजी शिंदे या धनगर समाजाच्या कुटुंबात झाला. आईचे नाव सुशिलाबाई शिंदे होय. माणकोजी शिंदे हे सर्वसामान्य परिस्थितीतीलच होते. तेव्हा आजच्यासारखी शिक्षणाची सोय नव्हती, तरीपण अहिल्याची जाणकोजी यांनी शिक्षणाची घरीच व्यवस्था केली होती. अहिल्याचे जीवन घडवण्यात जाणकोजींचे योगदान महत्त्वाचे होते हे दिसून येते. अहिल्या अवघ्या आठ वर्षांची असताना विवाह होळकर घराण्याचे मल्हारराव होळकर यांचा मुलगा खंडेराव होळकर यांच्याशी झाला. लग्न वेळी खंडेरावांचे वय हे फक्त बारा वर्षाचे होते. अहिल्याबाई या स्वभावाने शांत व संयमी होत्या त्यांनी कुटुंबातील सर्वांची मने जिंकून घेतली. त्यांना पुढे मालेराव व मुक्ताबाई अशी दोन अपत्य झाली. मल्हाररावांनी अहिल्याबाईंची हुशारी पाहून त्यांना तत्कालीन दरबाराची मोडी भाषा, मराठी लिहिणे व वाचने शिकवले. तसेच घोड्यावर बसणे, दांडपट्टा फिरवणे, युद्धाचे व राजकारणाचे धडे दिले. लढाया करणे, पत्रव्यवहार करणे, न्यायनिवाडा करणे इत्यादी प्रशिक्षणही दिले यामुळे दिवसेंदिवस अहिल्याबाई राजकीय व सामाजिक कार्यात अधिकच परिपक्व होऊ लागल्या. पुढे 1754 मध्ये कुंभेरीच्या लढाईत अहिल्याबाईंचे पती खंडेराव यांना वीरमरण आले. वयाच्या अवघ्या 29 व्या वर्षी वैधक्य आले असतांना जुन्या रुढी परंपरेनुसार सती जाण्याचे नाकारून त्यांनी त्या काळात पूरोगामित्वचा परिचय करून दिला. या गोष्टीला मल्हाररावांचीही सहमती होती. आपण सती गेलो तर स्वर्ग मिळेल की नाही माहित नाही, परंतु जगलो तर लाखो प्रजा जणांना सुख देता येईल असा विचार करून



अहिल्याबाईंनी हा निर्णय घेतला होता. पुढे सासरे मल्हारराव यांचा मृत्यू 20 मे 1766 मध्ये झाला. त्यानंतर लगेच वर्षाच्या आतच मुलगा मालेराव याचा मृत्यू 27 मार्च 1767 रोजी झाला. अशी एका मागून एक दुखे येत असताना त्यांनी अत्यंत धिराने व समजूतदारपणाने आपली प्रजा सुखी, समाधानी आणि संपन्न कशी होईल याचाच विचार केला. इतर राज्यकर्त्यांना वाटले की, आता अहिल्याबाई एकटीच आहे. तेव्हा त्यांना स्वार्थ दिसू लागला आणि त्यांनी अहिल्याबाईवर दबाव टाकायला सुरुवात केली. रघुनाथराव पेशवे यांनी तर होळकरांचे राज्य पेशवाईत विलीन करावे असा प्रस्ताव पाठवला. 50 हजारांची फौज घेऊन रघुनाथरावांनी इंदोरवर चढाई केली. हे वृत्त अहिल्याबाईंना कळाले तेव्हा त्यांनी अतिशय धीराने रघुनाथरावांना खलिता पाठवला आणि त्यात त्या म्हणतात, आपण माझे राज्य हिरावून घेण्याचे कपट रचून आलात, तुम्ही मला दुबळी समजला की खुळी ? दुःखात बुडालेल्यास अधिक बुडवावे हा तुमचा दृष्ट हेतू दिसुन आला आहे, आता आपली गाठ रणांगणात पडेल माझ्याबरोबर युद्धात पारंगत असणाऱ्या स्त्रियांची फौज असेल मी हरले तर कीर्ती करून जाईल पण आपण हरला तर आपल्याला तोंड दाखवायला जागा उरणार नाही. म्हणून आपण लढाईच्या भानगडीत न पडाल तर बरे. मी अबला आहे असे समजू नका मी भाले खांद्यावर घेऊन समोर उभे राहिले तर पेशव्यांना भारी पडेल, अशा अहिल्याबाई या न डगमगणाऱ्या मुत्सदद्दी तळपत्या समशेरी सारख्या होत्या.

अहिल्याबाई होळकर यांनी प्रदेशाची अट न ठेवता संपूर्ण भारतभर काम केलं संपूर्ण भारतात अनेक विहिरी, तलाव, कुंड, घाट, रस्ते, पूल निर्माण केले. भारतात जे काम आज शासन व्यवस्थेच्या मार्फत केले जाते ते काम लोकमाता अहिल्याबाई होळकर यांनी केलेले आपणास दिसून येते. मल्हाररावांच्या मृत्यूनंतर संस्थानाची राजधानी त्यांनी इंदोर वरून महेश्वर या ठिकाणी आणून कारागीर, मजूर, विणकर, कलावंत, साहित्यिक अशा गुणी लोकांच्या विकासासाठी जमीन, पैसा, घर इत्यादी सोयी उपलब्ध करून दिल्या. आजही महेश्वरी साड्या, पैठणी, धोतर प्रसिद्ध आहे. एवढेच नव्हे तर राज्यात पशु पक्षी यांना चरणासाठी कुरण राखली मुंग्यांना साखर, माशांना कणकेचा गोळा, उन्हाळ्यात वाटसरूंना पिण्यासाठी पाणपोह्या, हिवाळ्यात गरजूंना गरम कपडे यांची सोय केली. आपल्या राज्यात लहानातला लहान जीवही उपाशी राहू नये यासाठी त्या दक्ष असत दिव्यांग अनाथ व असाह्य लोकांचे पुनर्वसन केले. गोरगरिबांसाठी अन्नछत्रे चालवली वस्त्रांचे वाटप केले. प्रवाशांसाठी मार्गावर अंबराई, बगीचे, वृक्षारोपण व विश्रांतीसाठी ओटे धर्मशाळा बांधल्या. अहिल्याबाई होळकर यांनी केवळ हिंदू धर्मांसाठीच नव्हे तर सर्व जाती-धर्मांसाठी काम केले. मंदिरे तर बांधलीच काही मंदिरांचा जीर्णोद्धार केला, पण त्यासोबतच मशिदी, दर्गे व विहारही बांधले. रस्ते महारस्ते बांधल्यामुळे पर्यटनाला गती मिळाली मजुरांनाही काम मिळाले सर्व जाती धर्मांचे लोक एकत्र येऊन काम करू लागले त्यामुळे एकात्मता निर्माण झाली. राज्यातील दरोडेखोरांचा बंदोबस्त करणाऱ्या यशवंत फणसे या बहादुरा सोबत स्वतःच्या एकुलत्या एक मुलीचा आंतरजातीय विवाह लावून दिला. अहिल्याबाई या फक्त बोलक्या सुधारक नव्हे तर कर्त्या सुधारक होत्या हे दिसून येते. त्यांनी धर्मातील रूढी परंपरा यांचा आंधळेपणाने कधीही स्वीकार केला नाही. त्यांनी एकच धर्म पाळला आणि तो म्हणजे मानवता धर्म होय. अशा या महान कल्याणकारी लोकमातेला जयंतीनिमित्त त्यांच्या सर्व समावेशक कार्याला विनम्रपणे अभिवादन...!

प्रा. डॉ. हरी कोकरे
7588165595


# 'मनरेगा'च्या मजुरीत पाच वर्षांत ७० रुपयांची वाढ

## मजुरांना आता मिळणार २७३ रुपये

आधुनिक केसरी न्यूज

**सोयगाव :** महात्मा गांधी राष्ट्रीय ग्रामीण रोजगार हमी योजनेच्या कामांवर कार्यरत मजुरांच्या मजुरीत गेल्या पाच वर्षात ७० रुपयाची वाढ केल्याने रोजगार हमी मजुराना मोठा दिलासा मिळाला आहे. यावर्षी सन २०२३- २४ मध्ये प्रतिदिवस मजुरीमध्ये १७ रुपयांनी वाढ करण्यात आली आहे. त्यामुळे आता मजुरांना प्रतिदिवस २५६ ऐवजी २७३ रुपये मिळणार आहेत. ही दरवाढ १ एप्रिलपासून लागू करण्यात आली आहे. गेल्या काही दिवसांमध्ये जीवनावश्यक वस्तूंमध्ये भाववाढ होऊन महागाई वाढलेली असताना महात्मा गांधी राष्ट्रीय ग्रामीण रोजगार हमी योजनेचे मजुरीमध्ये केलेल्या वाढीमुळे या योजनेतून रोजगार मिळवणाऱ्या सर्वसामान्यांना काहीसा दिलासा मिळाला आहे. बेरोजगारांचा हाताला काम देण्याच्या उद्देशाने केंद्र शासनाने महात्मा गांधी राष्ट्रीय ग्रामीण रोजगार हमी योजना सुरू केली आहे. राज्यात ती महाराष्ट्र ग्रामीण रोजगार हमी योजना या नावाने सुरू आहे. या योजनेत ५० टक्के कामे ग्रामपंचायत स्तरावर, तर ५० टक्के कामे इतर यंत्रणांच्या माध्यमातून केली जातात. या योजनेचा केंद्रबिंदू ग्रामीण परिसर असल्यामुळे कामांचे नियोजन, देखरेख व सनियंत्रणाचे काम ग्रामपंचायतींकडे सोपवले आहे. ग्रामसेवकाच्या मदतीसाठी ग्रामसभेत रोजगार सेवकाची निवड करण्यात आली आहे. या योजनेतून सर्वसामान्य आणि गरजवंतांना वर्षभरातील किमान १०० दिवस रोजगार उपलब्ध झाला असून, त्यातून त्यांचे जगणे सुसह्य झाले आहे. सध्या जीवनावश्यक वस्तू व इतर वस्तूंमध्ये कमालीची भाववाढ झाल्याने महागाई वाढली आहे. त्यातून, २५६ रुपये प्रतिदिवस मजुरीत मजुरांना काम करणे परवडेनासे झाले आहे. त्याची दखल घेऊन केंद्र शासनाने १ एप्रिल २०२३ पासून रोजगार हमी योजनेचे कामावर काम करणाऱ्या मजुरांच्या मजुरीत प्रतिदिवस १७ रुपयांनी वाढ केली आहे. त्यामुळे महात्मा गांधी राष्ट्रीय ग्रामीण रोजगार हमी योजनेतील कामांवर कामे करणाऱ्या मजुरांना आता २५६ रुपयांऐवजी २७३ रुपये प्रतिदिवस मजुरी मिळणार आहे. त्यामुळे गेल्या काही दिवसांमध्ये वाढलेल्या महागाईमध्ये मजुरांना काहीसा दिलासा मिळाला आहे.

केंद्र सरकारने मनरेगाच्या मजुरीत गेल्या पाच वर्षांत ७० रुपयांची वाढ केल्याने मोठा दिलासा मिळाला आहे .



शेतकऱ्यांसाठी मनरेगात अंतर्गत फळबागांसाठी राज्य सरकारने केळी पिकाचा सामवेश केल्याने केळी उत्पादक शेतकऱ्यांना हेक्टरी २ लाख ४३ हजार रुपयांचे अनुदान मिळणार आहे . त्याच बरोबर वन्यप्राण्यांमुळे होणारे नुकसान टाळण्यासाठी शेतीसाठी तार कूंपण योजना मनरेगात सामाविष्ट करण्याची मागणी आमदार यांच्या मार्फत कृषीमंत्री यांच्याकडे केली आहे . त्यामुळे राज्यभरातील शेतकऱ्यांना शेती पिकाचे होणारे नुकसान टाळता येणार असल्याने मोठा दिलासा मिळणार आहे .

**जयप्रकाश चव्हाण, जिल्हा उपाध्यक्ष, भाजपा छत्रपती संभाजीनगर, ता .सोयगाव**

# मनमाडकरांना दिलासा, करंजवण धरणातून आवर्तन

आधुनिक केसरी न्यूज

**मनमाड :** ऐन उन्हाळ्यात मनमाड शहराला महिन्यातून एकदाच पाणीपुरवठा होत आहे. वाघदर्डी धरणातील जलसाठा खालावत चालल्याने शहराला महिन्यातून एकदा पाणी पुरवठ्याचे नियोजन सुरू आहे. या पार्श्वभूमीवर करंजवण धरणातून आवर्तन सोडण्यात आल्यामुळे मनमाडकरांना दिलासा मिळाला आहे. शहराला आता पूर्ववत १० ते १२ दिवसाआड पाणीपुरवठा होईल, अशी अपेक्षा आहे.

आठवडाभरात हे पाणी पाटोदा साठवणूक तलावात येईल. गेल्या महिन्यात शहराला पाणी पुरवठा करणार्या वाघदर्डी धरणातील पाणी साठ्यात मोठी घट झाली. पालखेड धरणात अपुरा पाणीसाठा असल्यामुळे पालखेड धरणातून मनमाडसाठी पाणी सोडता येत नव्हते. त्यामुळे पालिका प्रशासनाने शहराला १० ते १२ दिवसाआड ऐवजी थेट २० ते २१ दिवसांनी म्हणजे महिन्यातून एकदा पाणी सोडण्याचा निर्णय घेतला. त्यामुळे तीव्र पाणी टंचाई निर्माण होऊन पाण्यासाठी भटकंती करण्याची वेळ मनमाडकरांवर आली. या पार्श्वभूमीवर करंजवण धरणातून मनमाड आणि येवला शहरासाठी आवर्तन सोडण्यात आले.



# आ. सतीश चव्हाण यांची खुलताबाद तालुक्यासह ममुराबाद येथे भेट

आधुनिक केसरी न्यूज

**खुलताबाद :** आ.सतीश चव्हाण यांनी सुलतानपूर खांडी पिंपळगाव बाजार सावंगी येसगाव नंबर दोन त्यानंतर त्यांनी ममुराबाद येथे भेट दिली असता त्यांचा भव्य दिव्य सत्कार करण्यात आला राष्ट्रवादी काँग्रेसचे तालुका अध्यक्ष जावेद पटेल यांनी नियोजन कार्यक्रम ठेवला होता राजकीय क्षेत्रात पदार्पण करीत सर्वसामान्यांचा मदतीला धावणारे नेतृत्व जाती धर्माचा विचार न करता मदतीला धावून जातात अनेक राजकीय पक्षाच्या नेत्याशी जवळीक निर्माण केली आहे त्यांचा खूप सहभाग आहे यावेळी गावकऱ्या सोबत आमदार यांनी चर्चा करून त्यांच्या समस्या विचारले असता जाणेफळ जवळील पूल ममुराबाद ते शिर्डी रस्ता मंदिराचे काम स्मशानभूमी समस्या गावकऱ्यांनी सांगितली.

आ. चव्हाण यांनी गावकऱ्यांना आश्वासन दिले. यावेळी महेश उबाळे, गंगापूर खुलताबाद तालुकाध्यक्ष राष्ट्रवादी काँग्रेस पार्टी, अनिल चव्हाण, न्यानेश्वर दुधारे, विठू महालकर तालुका अध्यक्ष संत परिषद रंगनाथ आटोळे सरपंच कृष्ण गावंडे उपसरपंच रोप पटेल सोसायटी चेअरमन अप्पासाहेब मा. सरपंच जावेद पटेल राष्ट्रवादी काँग्रेस पार्टी तालुका अध्यक्ष खुलताबाद अल्पसंख्यांक नजर पटेल राष्ट्रवादी काँग्रेस उपाध्यक्ष ग्रामपंचायत सदस्य जनार्दन वेता ग्रामपंचायत सदस्य अफसर शेख पत्रकार सोमीनाथ आडबणे शिवसेना शाखाप्रमुख शिवाजी जेठे, वी. का. सोसायटी सदस्य नामदेव गायकवाड, सुखदेव वेताळ, भाजपा कोषाध्यक्ष खुलताबाद नामदेव जेठे, पंडित जेठे, भानुदास जेठे, लक्ष्मण जेठे, एकनाथ जेठे सुखदेव जेठे, सूर्यभान जेठे, कारभारी जेठे प्रकाश जेठे जनार्धन जेठे अधिक गावकऱ्यांची उपस्थिती होती.

# फुलंब्री शहरातील पाच कृषी सेवा केंद्रांना कारणे दाखवा नोटीस

## कृषि विभागाची धडक कारवाई सुरू

आधुनिक केसरी न्यूज

**फुलंब्री :** खरीप हंगाम तोंडावर आला असल्याने शेतकऱ्यांची बियाणं खत खरेदीची लगबग सुरू झाली आहे, अशा घाई गर्दीत शेतकऱ्याला कमी प्रतीचे बियाणं, निकृष्ट दर्जाचे खत दिल्या जाण्याची शक्यता नाकारता येत नाही .यासाठी कृषी विभागाच्या भरारी पथकाने फुलंब्री शहरातील कृषी सेवा केंद्रांची कसून तपासणी सुरू केली आहे. सोमवारी सकाळपासून कृषी सेवा केंद्रांची तपासणी धडाक्यात सुरू होती . यामध्ये कृषी सेवा केंद्र चालकांना कारणे दाखवा नोटीस बजावण्यात आल्या. यात साठा नोंदवही प्रमाणित नसणे, परवाना वैधता संपलेली असणे, परवानगी बाह्य बियाणे विक्री करणे इत्यादी बाबी प्रामुख्याने आढळून आल्या .सदर कृषी सेवा केंद्र चालकांना आपले म्हणणे मांडण्यासाठी सात दिवसाची मुदत देण्यात आली असून त्यांचेवर नियमानुसार कारवाई करण्यात येईल. येत्या महिन्यात कारवाई अजून कडक केली जाईल असे तालुका कृषी अधिकारी भारत कासार यांनी सांगितले. सदर तपासणी पथकात लिपिक विखार शेख, चालक जहीर पठाण व कार्यालय कृषी अधिकारी काकासाहेब इंगळे यांचा समावेश होता.






# खुलताबाद तहसीलदार मार्फत मुख्यमंत्र्यांना वंचिततर्फे प्रमुख मागण्या संदर्भात निवेदन

आधुनिक केसरी न्यूज

**खुलताबाद :** 29 मे रोजी वंचित बहुजन आघाडी खुलताबाद येथे बैठक आयोजित करून खुलताबाद तालुक्यातील विविध प्रमुख मुद्द्यावर चर्चा करून तहसीलदार मार्फत मुख्यमंत्र्यांना निवेदन पाठवण्यात आले. वंचित बहुजन आघाडीचे राष्ट्रीय अध्यक्ष श्री मा.खा. प्रकाश तथा बाळासाहेब आंबेडकर व प्रदेशाध्यक्षा रेखाताई ठाकूर यांच्या आदेशावरून मराठवाडा अध्यक्ष अशोक हिंदी पाटील व महीला प्रदेश महासचिव व जिल्हा प्रभारी अरुंधतीताई शिरसाट यांच्या सूचनेनुसार औरंगाबाद पश्चिम जिल्हा अध्यक्ष योगेश बन व जिल्हा महासचिव मिलिंद बोर्डे जिल्हा संघटक बाबा पटेल यांच्या प्रमुख उपस्थिती व खुलताबाद तालुका अध्यक्ष मुक्तार भाई सय्यद यांच्या नेतृत्वात खालील मुद्द्यावर निर्णय घेण्यात यावे. गायरान अतिक्रमण आजपर्यंत कायम करण्यात यावे व गायरान धारकांना नोटीस देण्यास थांबवाव्या, कांद्याला किमान दोन हजार रुपये तर कापसाला दहा हजार रुपये हमीभाव जाहीर करण्यात यावा, एम आर इ जी एस मार्फत रस्त्यांना मंजूरी देऊन शेत रस्ते वस्ती रस्ते करण्यात यावे, शेतकऱ्यांना दिवसा लाईट व ट्रान्सफॉर्मर अर्ज करताच सुविधा देण्यात यावी, शेतकऱ्यांना अतिवृष्टीमुळे झालेल्या नुकसानीचे पैसे तात्काळ देण्यात यावे, तालुक्यातील शेतकऱ्यांना या हंगामात खते बियाणे उपलब्ध करून देण्यात यावेत टंचाई निर्माण होणार नाही यासाठी भरारी पथके स्थापन करण्यात यावे. तसेच वंचित युवक आघाडीचे मुंबई अध्यक्ष नामे परमेश्वर रणशूर आणि गौतम हराळ यांच्यावर प्राण घातक हल्ला करणाऱ्या वर प्रशासनाने कठोर कारवाई करण्यात यावी जर या मुद्द्यावर प्रशासनाने पंधरा दिवसाच्या आत कारवाई न केल्यास वंचित बहुजन आघाडी खुलताबाद तर्फे धरणे आंदोलने व इत्यादी मार्गास भाग पडेल याची प्रशासनाने नोंद घ्यावी असे निवेदनात नमूद केले आहे. यावेळी, जिल्हा अध्यक्ष औरंगाबाद पश्चिम योगेश बन, जिल्हा महासचिव मिलिंद बोर्डे, जिल्हा संघटक बाबा पाटेल, तालुका अध्यक्ष मुक्तार भाई सय्यद,, तालुका उपाध्यक्ष गणेश तांदळे, महासचिव अण्णा बनकर, राजाराम घुसाळे, कैलास बनकर, अरुण गायकवाड, दिनकर शिरसाट, कलीम पठाण, सुरेश गवळे, रवी रत्नपारखे, सुरेश नवघरे, वसंतराव मेंगाळ ,गजानन भालेराव, वाल्मीक गवळे, नागेश गायकवाड, कडुबा बनकर, विठ्ठल कातवारे व इतर वंचित बहुजन आघाडीचे पदाधिकारी कार्यकर्ते मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर यांची जयंती प्रत्येक ग्रामपंचायतमध्ये साजरी करा

आधुनिक केसरी न्यूज



**सोयगाव :** तालुक्यात व सावळदबारा परिसरात राजमाता श्लोक अहिल्यादेवी होळकर यांची जयंतीप्रमाणे या वर्षी सुद्धा बुधवार दि. ३१ मे २०१३ रोजी करण्यात येणार आहे. पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर यांचा इतिहास हा संपूर्ण जगात प्रसिद्ध आहे. पुण्यलोक अहिल्यादेवी चे संपूर्ण चरित्र प्रेरणादायी आहे. राजकारण समाजकारण, अर्थकारण, विकासकारण आधी मध्ये त्यांनी आपल्या कार्याचा ठसा उमटविला आहे. त्यांनी अनेक जाणकारी कार्य केले आहे. मंदिर, घाट, धर्मशाला संपूर्ण देशभरात बांधले आहे. अनेक असलेल्या परंपरांना प्रतिबंध घातला आहे. प्राणिमात्रांची निसर्गाची विशेष काळजी घेतली आहे. ज्यांनी केलेल्या कार्याची जनजागृती म्हणून ३१ मे २३ रोजी महाराष्ट्रातील सर्व शासकीय कार्यालयात प्रत्येक गावातील ग्रामपंचायतमध्ये शहरामध्ये लोक अहिल्यादेवी होळकर यांची जयंती साजरी मोठ्या उत्साहात करण्यात यावी. तसेच १ मे २०२३ च्या महाराष्ट्र शासनाच्या परिपत्रकानुसार प्रत्येक ग्रामपंचायतमध्ये दोन कर्तबगार महिलांना पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर पुरस्कार देण्यात यावा. राजमाता अहिल्यादेवी होळकर यांची जयंती महाराष्ट्रातील प्रत्येक शासकीय कार्यालयात प्रत्येक ग्रामपंचायतमध्ये प्रत्येक गावात, शहरामध्ये सोयगाव तालुक्यामध्ये करण्यात यावी असे आवाहन जिल्हा परिषद सदस्य गोपीचंद जाधव यांनी केले आहे.




# पैठणला पत्रकार संरक्षण कायद्यानुसार चार जणांविरुद्ध गुन्हा दाखल

आधुनिक केसरी न्यूज

**पैठण :** 4 फेब्रुवारी 2023 रोजी रमेश लिंबोरे हे बस स्थानक जवळील पत्रकार कार्यालयात बसले असता त्यांना प्रतिष्ठान महाविद्यालयाच्या मागील बाजूस निम्म बंधाऱ्या लगत गोदावरीच्या पात्रातून सुरु असलेल्या अवैध वाळू उपसाची माहिती मिळाल्या वरून ते साडेपाच वाजेच्या दरम्यान वर्तमानपत्रासाठी वृत्त संकलन करण्यासाठी गेले असता ते वृत्त संकलन करत असताना( छाया चित्र व व्हिडिओ शूटिंग ) करत असताना याठिकाणी तौशीफ सिदबल कादरी, नवाज अस्लम पठाण, बरकत ऐसान कादरी, अजय दीपक सिंग करकोटक सर्व राहणार पैठण हे गोदावरी नदीच्या पात्रातून ट्रॅक्टरने केनी द्वारे वाळू उपसा करीत असताना वरील लोक रमेश लिंबोरे यांच्या जवळ गेले व त्यांनी त्यांना छाया चित्र व व्हिडिओ शूटिंग काढण्यास विरोध केला व फोटो व्हिडिओ शूटिंग काढू नकोआम्ही वाळू उपसा करून पोट भरतो असे सांगून त्यांना बळजबरीने पैसे देण्याचा प्रयन्त केला. त्यांनी पैसे घेण्यास नकार देऊन वृत्त संकलन करण्याचे काम सुरू ठेवले. त्यावेळी वरील लोकांनी रमेश लिंबोरे यांना अश्लील भाषेत शिवीगाळ करून धक्काबुक्की करून जीवे मारण्याची धमकी दिली.पत्रकार रमेश लिंबोरे यांनी त्यांच्या मोबाईल मध्ये सदर लोक अवैध वाळू उपसा करत असताना चे फोटो व्हिडिओ शूटिंग करून पैठण पोलीस स्टेशन येथे गेले असता या दिवशी पोलीस निरीक्षक पवार हे पोलीस स्टेशनमध्ये नसल्याने ते घरी निघून गेले. त्यानंतर घरगुती कामानिमित्त पोलीस स्टेशनला तक्रार देण्यासाठी जाऊ शकले नाही त्यांनी दिनांक 27 मे रोजी 2023 रोजी सदर घटनेबाबत पोलीस स्टेशनला सविस्तर तक्रार दिली. या तक्रारीनुसार उप विभागीय पोलीस अधिकारी विशाल नेहुल यांनी घटनास्थळी जाऊन दोन पंचा समक्ष घटनास्थळाचा पंचनामा केला. रमेश लिंबोरे यांच्या तक्रारी नुसार पोलिसांनी तौशीफ सिदबल कादरी, नवाज अस्लम पठाण, बरकत ऐसान कादरी, अजय दीपक सिंग करकोटक सर्व राहणार पैठण यांच्या विरुद्ध भादवी दंड संहिता 1860 नुसार कलम 294,506,पत्रकार संरक्षण अधिनियम क्र.3,4 प्रमाणे गुन्ह्याची नोंद केली. पैठण तालुक्यात पत्रकार संरक्षण कायद्यानुसार गुन्हा दाखल होण्याची ही पहिली घटना आहे.




# महिलांनी पाण्यासाठी काढली प्रेतयात्रा

## तीनही ॠतूत नागरिकांना दहा ते बारा दिवसाआड पाणी, ते ही अत्यंत कमी दाबाने

आधुनिक केसरी न्यूज

**धुळे :** महानगर पालिका प्रशासनाची शिवसेना ठाकरे गटाच्या वतीने महिलांनी काढली पालिकेच्या नावाची प्रेतयात्रा. धुळे शहरात पिण्याच्या पाण्याचा किमान दोन वर्ष पुरेल इतका जलसाठा असताना देखील तीनही ॠतूत शहरातील नागरिकांना दहा ते बारा दिवसाआड पाणी ते ही अत्यंत कमी दाबाने मिळत आहे धुळे शहरातील पाण्याची समस्या सुटावी या करीता सत्ताधारी भाजपा करून नागरिकांना दररोज उल्लु बनविण्यात येत असल्याचे आरोप ह्या ठिकाणी करण्यात आला आज उद्या परवा करत अजुनही साधे पाच दिवसाआड सोडाच पन दहा दिवसाआड देखील पाणी देण्यास सत्ताधारी भाजपा व मनपा प्रशासन असमर्थ ठरत आहे, अक्कलपाडा पाणी पुरवठा योजना कार्यान्वित होण्यास अजुन अनेक महिने लागतील हि सत्य स्थिती असतांना अक्कलपाडा पाणी पुरवठा योजनेच्या कामावर लोकसभेचे खा.डॉ.सुभाष भामरे हे दोन चार दिवसात पहाणी दौरे करत असुन ते देखील धुळेकरांना दररोज भुरथापा देत आहेत, धुळे शहरासाठी तापी पाणीपुरवठा, नकाणे, हरण्यामाळ, डेडरगाव, या जलस्रोतात किमान दोन वर्ष दररोज पाणी पुरवठा केला तरी तेथील पाणी संपणार नाही इतके पाणी आजमितीस उपलब्ध आहेत. शहरातील देवपुर, मिल परिसर, साक्रीरोड, पेठ, आझाद नगर या भागात 12 दिवसानंतरही नागरिकांना पाणी भेटत नाही याला मनपाचा पाणीपुरवठा विभाग तेथील ओव्हरसिअर व नव्यानेच नेमलेले अकार्यक्षम इंजिनिअर कारणीभूत असुन योग्य नियोजन करण्यात मनपा प्रशासन अपयशी ठरत आहेत. या प्रेतयात्रेवर हंडे व बादली तसेच आग्या कडे कळशी असे साहित्य ठेवण्यात आले होते, सदर प्रेतयात्रेची सुरुवात शिवसेना जिल्हा मध्यवर्ती कार्यालय येथुन राणा प्रताप चौक, फुलवाला चौक, जे.टीप.कराचीवाला खुंट, पोलीस चौकी, जे.बी.रोड मार्गे नविन महानगरपालिका इथ पर्यंत काढण्यात आली, या ठिकाणी मनपा प्रशासन विरोधात जोरदार घोषणाबाजी करण्यात आली व मनपाच्या नावाने बोंब ठोकण्यात आली. या प्रेतयात्रेने रस्त्यावर बाजारात आलेल्या महिला भगिणी व नागरिकांचे लक्ष वेधून घेतले. अनेक महिलांनी या प्रेतयात्रा आंदोलनाचे स्वागत करून त्यांनी देखील शिवसेनेच्या या आंदोलनाचे सर्मथन केले. धुळे मनपा प्रशासनाच्या या ढिसाळ कारभारा वर गेल्या चार वर्षांत कुठलाच अंकुश भाजपाचे महापौर ,नगरसेवक व पालिकेचा रिमोट कंट्रोल हाती असणाऱ्या भाजपाचे जिल्हाध्यक्ष अनुप अग्रवाल यांना ठेवता आला नाही, त्या मुळे मोठ्या विश्वासाने धुळेकरांनी निवडुण दिलेले भाजपाचे नगरसेवक यांना देखील जनतेच्या या महत्त्वाच्या प्रश्नावर काहीच करता आलेले नाही, त्याच्या निषेधार्थ धुळे मनपा प्रशासन व सत्ताधारी भाजपा यांच्या विरोधात आज शिवसेना धुळे महानगर व महिला आघाडीच्या वतीने मनपा प्रशासन व पाणीपुरवठा विभाग यांची प्रतिकात्मक प्रेतयात्रा काढण्यात आली, या आंदोलनात शिवसेनेचे सहसंपर्कप्रमुख महेश मिस्त्री, जिल्हाप्रमुख अतुल सोनवणे उपजिल्हाप्रमुख किरण जोंधळे महानगरप्रमुख धीरज पाटील डॉ.सुशील महाजन, महिला आघाडीच्या हेमाताई हेमाडे, डॉ.जयश्री महाजन, अरूणा मोरे, देविदास लोणारी, ललित माळी, भरत मोरे, दिपक मोरे, प्यारेलाल मोरे, शुभम रणधीर, निलेश चौधरी, निलेश कांजरेकर, प्रतिभा सोनवणे ,कुदांताई मराठे, सिमा मराठे, शंकुतला खैरनार ,संतोष शर्मा, संगीता भागवत ,सुरेश चौधरी, किशोर पालेकर, मुकेश भोकरे, लक्ष्मी आदित्य बगन, शिवसैनिक मोठ्या संख्येत उपस्थित होते.

# व्ही.एम.भोजने यांना डॉ. बाबासाहेब आंबेडकर समाजसेवा पुरस्कार

आधुनिक केसरी न्यूज

**खामगाव :** आंबेडकर चळवळीतील जेष्ठ नेते व्ही.एम. भोजने यांचा रविवारी दि.२८ मे रोजी आंबेडकर जनतेच्या वतीने सपत्नीक सत्कार करण्यात आला. यावेळी आयोजन समितीच्या वतीने डॉ.बाबासाहेब आंबेडकर समाजसेवा पुरस्कार प्रदान करून शॉल, पुष्पहार व ८० हजार रुपये रोख रक्कम देऊन गौरव करण्यात आला. तर भीमनायक पदवीही त्यांना बहाल करण्यात आली. सर्वप्रथम महापुरुषांच्या प्रतिमांचे पूजन करून त्रिसरण पंचशीलाने कार्यक्रमाची सुरुवात झाली.सत्काराला उत्तर देताना व्ही.एम. भोजने म्हणाले की, आंबेडकर चळवळीमध्ये १९७३ पासून सक्रीय आहे.कधीही नावासाठी काम केले नाही.नेहमीच चळवळीसाठी संपूर्ण आयुष्य झोकून दिले. मग ग्रामीण नागरिकांच्या समस्या असतील किंवा अन्यायग्रस्त व कार्यकर्त्यांना मदत असेल, चळवळीत काम करत असतांना आलेल्या



गोड व कडू आठवणींचा थरारक अनुभव त्यांनी उपस्थितांना सांगितला. पुढे बोलतांना म्हणाले, नवं तरुणांनी नावासाठी चळवळीत काम करू नये.अन्यायग्रस्त लोकांना मदत करा, त्यांच्या समस्या सोडवा.गाववस्तीवर जाऊन धम्म चळवळ व सामाजिक चळवळ समजावून सांगा. व्यसनमुक्ती वर काम करा. काही कार्येकर्ते नावासाठी रुसून बसतात अश्या लोकांनी आपले कार्य तपासून घ्यावे. चळवळीमध्ये तरुणांनी पुढे यावे सामाजिक कार्यक्रमाचे आयोजन करावे. एक दिवस हा समाज नक्कीच तुमचा आदरसत्कार करेल असा मौलिक सल्लाही त्यांनी तरुणांना दिला. कार्यक्रमाचे अध्यक्ष डॉ.सुरेश सिरसाट होते. कार्यक्रमाचे प्रास्ताविक गौतम गवई यांनी केले. तर दादासाहेब कविश्वर, एम.टी. इंगळे, रमेश भाई भोजने, भाई बाबुराव सरदार, रमेश सिरसाट, दत्ता हिवराळे, प्रा.एम.आर. इंगळे, ॲड. रविंद्र भोजने, ॲड.अनिल इखारे, ॲड. अभिजित वानखडे, ॲड. अविनाश इंगळे, डी. एस. वानखडे, माया दामोदर, गौतम सुरवाडे, जाकीराम तायडे यांची भाषणे झाली. यावेळी मनोज भोजने, अभय इंगळे, अँड रविंद्र मुळे, ॲड. प्रकाश समदूर, ॲड. एम.पी.वाकोडे, विक्रम नितनवरे, प्रवीण पहुरकर, विशाखा सावंग, देवा हिवराळे, विजय बोदडे, भीमराव गवई, प्रकाश धुंदळे, संजय गव्हांदे, सुरेश वावगे, संजय खंडेराव, किरण मोरे, ॲड.अजाबराव भोजने, ॲड.प्रशांत दाभाडे, मिलिंद हिवराळे, धम्मपाल गवई, सुभाष सुरवाळे, अमित तायडे, प्रवीण विरघट, विश्वनाथ वानखडे, प्रशांत तायडे, महेंद्र खंडारे, मनोज बोदडे, रवी मोरे, गणेश मोरे, संजय बगाडे, राजू वानखडे, सुमनबाई थाटे, भागाबाई हिवराळे, महादेवराव नाईक, राजेश तेलंग उपस्थित होते. सुत्रसंचालन आर.एन.वानखडे तर आभार अतुल सिरसाट यांनी मानले.

# पंचवटीत अतिक्रमण निर्मूलन पथकावर दगडफेक

आधुनिक केसरी न्यूज

**नाशिक :** महानगरपालिकेच्यावतीने पंचवटी विभागात मंगळवारी सकाळी अनधिकृत झोपड्या हटविण्याची कारवाई सुरू असताना जमावाने मनपा पथकासह पोलिसांवर दगडफेक केल्याने एकच गोंधळ उडाला. यात काही जण जखमी झाले असून जेसीबीचे नुकसान झाल्याचे सांगितले जाते. पोलिसांनी दगडफेक करणाऱ्यांना ताब्यात घेतले. पंधरवड्यापासून शहरात अनधिकृत बांधकामे जमीनदोस्त करण्याची कारवाई सुरू आहे. त्या अंतर्गत रस्त्यावरील लहान-मोठ्या टपरीधारकांपासून ते अनधिकृत दुकाने, बंगले वा तत्सम बांधकामे हटविली जात आहेत. मंगळवारी सकाळी १० वाजता मनपाचे पथक मखमलाबाद-पेठ रस्त्याला जोडणाऱ्या कॅनॉल रस्त्यावर पोहोचले. या ठिकाणी कालव्याच्या आसपास अनधिकृतपणे २० ते २२ झोपड्या उभारल्या गेल्या आहेत. पोलीस बंदोबस्तात पथकाने त्या हटविण्याची कारवाई सुरू केली. काही वेळात मोठा जमाव जमा झाला.

गुप्तरोगाबाबत
काहीही लपवू नका



(रविवारी मोफत तपासणी)



डॉ. शेख ए.एच.

या अशा अडचणी असतात ज्या कोणाला सांगता येत नाहीत व न सांगितल्याने त्या वाढत जातात पण काळजी करू नका डॉक्टरपासून काहीही लपवू नये, ते आपले सर्व प्रश्न सहज सोडवितात. डॉ. शेख आजपर्यंत 200 पेक्षा अधिक पुरस्काराने सन्मानित, प्रचंड अनुभवी व अत्यंत माफक खर्चात इलाज करतात, आजपर्यंत लाखों पेशंटनी याचा अनुभव घेतलाय, आपली माहिती अत्यंत गुप्त ठेवली जाते, आयुर्वेदाने सर्व रोग नष्ट होतात, (रविवारी मोफत तपासणी).
आपल्या सर्व चिंताचा एकमेव उपाय म्हणजे डॉ. शेख यांचे नवजीवन आयुर्वेदीक डीस्पेंसरी. आजच भेट द्या व खात्री करा.

नवजीवन आयुर्वेदिक डिस्पेन्सरी

सेंट्रल बसस्टँड समोर, हॉटेल मिर्झा जवळ, औरंगाबाद.
फोन : (0240) 2350042, मो. : 9021111549 www.drshaikhah.in

शहरातील विश्वसनीय बिग सुपर मार्केट

महावीर
घर संसार



किराणा | सुका मेवा | मसाले | क्रॉकरी
प्लास्टिकच्या वस्तू | स्टीलच्या वस्तू | ॲल्युमिनियमच्या वस्तू
घरगुती उपकरणे | साफ सफाईचे सर्व साहित्य | आणि बरेच काही

सुमित 7620111118
राजेश जैन 7588348738
रमेश जैन (क्रॉकरी) 9860481142 7620111117
व्हॉट्सअपवर ऑर्डरसाठी 9850017181
वितरण स्थितीसाठी 9021395308
घाऊक चौकशीसाठी 7620111118

www.mahavirbestprice.com
sumitparakh73@gmail.com

S.P. रोड, चेलीपुरा, शहागंज, छत्रपती संभाजीनगर
प्लॉट क्रमांक A25, MIDC पोलिस स्टेशन समोर, चिकलठाणा, छत्रपती संभाजीनगर